नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी



खामगांव येथे भरलेल्या सोळाव्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय सारस्वती जन्मभू

जानेवारी १९५४ किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र **युगवाणी** संपादक–पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वर्ष ८ वें] जानेवारी १९५४ [अंक १० वा

अनुक्रमणिका

हें मासिक श्री. **पां. ना. बनहट्टी** यांनी नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. **ना. रा. शेंडे**, सरचिटणीस वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रोड, नागपूर येथे प्रकाशित केलें.

यु ग वा णी

वर्ष ८ वें जानेवारी १९५५ अंक १० वा

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित

मित्रपरिचय

तारुण्यांत प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं काव्यवृत्ति जागृत होते असें म्हणतात. पण, कधी कधी असाहि अनुभव येतो की, कांहींना कधीमधी काव्यरचनाहि करावीशी वाटते. अशाच एका संध्याकाळीं माझ्या-सारखी वृत्तपत्र व्यवसायाच्या रुक्ष रगाड्यांत नुकतीच पदार्पण केलेली व्यक्ति नागपूरच्या महाराजबागेसारख्या सार्वजनिक बगीच्यांत एका आम्रवृक्षाखाली राणी दुर्गावतीसारख्या वीररसप्रधान चरित्रावर काव्य करीत बसली असेल हें कोणास खरें वाटेल! मी आपला काव्यरचनेंत स्वतःचा विसर पडण्याइतका दंग झालों असतांना माझ्या समाधिसुखाचा एकाएकी भंग केला कुणाच्या तरी 'नमस्कार' ह्या उद्‌गारांनी! पहातों तों केवळ आठदहा दिवसांपूर्वीच ज्यांना मी 'विहंगम' कार्यालयांत आयुष्यांत प्रथमच पाहिलें होतें ते प्राध्यापक भ. श्री. पंडित एका सुहृदावरोबर दत्त म्हणून समोर उभे! मला केवढा आनंद झाला!! कविता करण्याचा नाद लागलेला, कवितेचे कांही चरण लिहून झालेले, आणि अशा वेळीं सहवास लाभावा महाराष्ट्रांतील एका सुप्रसिद्ध कलाकवीचा! कांही प्रास्ताविक बोलणें झाल्या-वर प्रा. पंडितांनी माझ्याविषयी इतकी आत्मीयता दाख-विली की, मी लागलीच नवख्या कवीच्या उत्साहानें केलेल्या कवितेचे दोन चरण त्यांना वाचून दाखविले.—

रजपुत बाला चंदेलाची, राणी दुर्गावती
निज शौर्यानें रणीं झुंजतां, तळपे ती युवती
समृद्ध तियेचें राज्य ऐकुनी, वदला नृपयवन
निजबल सारें पणासि लावुनि, जिंकू तिजला
जोडुं धन ॥

कोमलांगी ती भुवनीं विलसे, कुसुमाहुनि सुंदर
मधुपुष्पाची शय्या तिजला, त्रास देइ अनिवार
एकच धरुनी आस मनीं मग, नृपसर्वहि थोर
वरण्यास्तव त्या शुभांगिनीला, तळमळती
बहु फार ॥

हे दोन चरण ऐकल्यानंतर या रसिक कवीनें त्या साध्या शब्दांचें ज्या आत्मीय भावानें स्वागत केलें त्यामुळे त्यांच्या अव्याजमनोहर व्यक्तित्वाकडे मी लोहचुंबकासारखा आकर्षिला गेलों.

१९३३ सालीं झालेला हा आमचा परिचय शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणे आजतागायत सारखा वाढ-ताच राहिलेला आहे. विहंगम कार्यालयांत असतांनाच मी 'प्रगति' नांवाचें एक छोटें मासिक काढीत असें. त्याचें स्वरूप अगदीच मर्यादित होतें. पण माझी महत्वा-कांक्षा मात्र अमर्याद होती. विहंगमासाठी मी पंडितां-कडे कविता अगर लेख मागावयास गेलों आणि ते त्यांनी दिलें नाही असा एकहि प्रसंग घडला नाही. त्यामुळे आपल्या स्वतःच्या 'प्रगति'साठीहि त्यांना एक कविता मागण्याचें मी धाडस केलें. 'विहंगमा'चें स्वरूप

प्रतिमा नसेल असे कोण म्हणता येईल ! आपल्या जीवनपटांतील आणि सभोवारच्या वातावरणांतील काव्यप्रसंगाची मोठ्या कुशलतेने वेचणी करून पंडितांनी आजवर फार मोठी काव्यरचना केली आहे. त्यांत लहान मुलांसाठी आणि लहान मुलांविषयी केलेल्या काव्याचा भाग वराच वैशिष्ट्यपूर्ण आहे. 'बीजेची कोर', 'चवथीचा चांद', 'अष्टमीचा चंद्र' आणि 'पौर्णिमेचें चांदणे' हे त्यांच्या शिशुगीतांचे संग्रह एक तपापूर्वीच प्रसिद्ध झाले असून महाराष्ट्रांत त्यांना चांगली लोकप्रियता लाभली आहे. 'सदाफुली' नांवाचा त्यांचा आणखी एक शिशुगीतांचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. या सर्व संग्रहांतील कविता नुसत्या चाळल्या तरी बालवृत्तीशीं आणि स्वभाववैशिष्ट्याशीं पंडित किती समरस झालेले आहेत याचें प्रत्यंतर येतें. त्यांच्या या शिशुगीत संग्रहांतील कांही कविता बहुतेक सर्व क्रमिक पुस्तकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्या शाळेंत आणि घरींहि विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी गात असतांना ऐकून साश्चर्य आनंद वाटतो. त्यांच्या या शिशुगीतांबद्दल महाराष्ट्राचे विख्यात कवि श्री. नारायण गंगाधर लिमये यांनी एका खाजगी पत्रांत "I have been an old reader of your happy juvenile poems for the last so many years." असे उद्गार काढले आहेत, ही गोष्ट मुद्दाम नमूद करावीशी वाटते. १९३३ सालीं 'पिचलेला पावा' आणि दोन तीन वर्षांपूर्वी 'उन्मेष आणि उद्रेक' हे दोन प्रौढ गीतांचे संग्रह पंडितांनी प्रसिद्ध केले. महाराष्ट्र, केसरी, ज्ञानप्रकाश इत्यादि प्रमुख नियतकालिकांनी त्यांची मुक्त कंठाने स्तुति केली आहे. उर्दु भाषेची पंडितांना चांगली तोंडओळख असल्यामुळे नझीर या उर्दु कवीवर कांही वर्षांपूर्वी त्यांनी महाराष्ट्रशारदेंत एक लेख आणि महमद इकबल यांच्या काव्याचीं 'विहंगमां'तून भाषांतरेंहि प्रसिद्ध केलीं आहेत.

पद्याशिवाय पंडितांनी गद्यहि वरेंच लिहिलें आहे. 'मुक्तच्छंद कसा असावा' 'ओवीचा विकास व नियमन' असे कांही तांत्रिक लेख तर त्यांनी लिहिलेच; पण उखाणे व कोडीं, वाहन, पंखा, आरसा इ. आटोपसर विनोदी लेखहि त्यांनी मनोहरांतून प्रसिद्ध केले आहेत. त्यांचाच 'सवडीचे क्षण' हा निवंधसंग्रह पुढे पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला. याशिवाय लहान मुलांसाठी 'सोन्याची गाडी' ही त्यांची गोष्टहि पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली आहे. या सर्व गद्य-पद्य लिखाणाने पंडित हे एक थोर साहित्यिक म्हणून त्यांचा परिचय होत असला तरी १८१८ पासून तों १९५२ पर्यंतच्या १३४ वर्षांच्या कालांतील कवितेचें समग्र दर्शन घडविणाऱ्या त्यांच्या 'आधुनिक मराठी कविता' या चालू वर्षारंभीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाने पंडितांच्या पांडित्याची कीर्ति सबंध महाराष्ट्रांत चांगलीच पसरली. "आधुनिक मराठी कवितेचा इतिवृत्तांत जितका सर्वांगपरिपूर्ण करतां येईल तितका करण्याचा मी प्रयत्न केला आहे" असे विनयशील उद्गार जरी पंडितांनी आपल्या या ग्रंथाबद्दल प्रस्तावनेंत काढले असले तरी आख्या महाराष्ट्रांतील विद्वत्जनांनी आणि बहुतेक सर्वच वृत्तपत्रांनी त्याची जी मनसोक्त तारीफ केली, त्यामुळें त्यांच्या कीर्तीचा सुगंध महाराष्ट्रांत सर्वत्र दरवळला. विविध प्रकारांनी पंडितांनी केलेली साहित्यसेवा त्यांच्या मर्मज्ञ आणि रसज्ञ पांडित्याची निःसंशय कुणालाहि साक्षच पटवील.

* *

लहान वयांत अनेक जबाबदाऱ्या शिरावर पडल्या असतांना व जगाचा कटु अनुभव आला असतांहि पंडितांचा स्वभाव तुसडा किंवा माणुसघाणा बनला नाही. तरी पण त्यांना एकांत फार प्रिय असून त्या दृष्टीनें त्यांनी नागपुरांत आपलें श्रीधर सदन वस्तीपासून फार दूर (श्रद्धानंद नगर) बांधलें आहे. गजबजीपेक्षा निवडक मित्रांच्या सहवासांत ते चांगले रमतात. ते स्वभावाने सरळ, प्रेमळ असून असत्य, दंभ इत्यादींचा त्यांना मोठा तिटकारा आहे. आणि असा प्रकार कोठें आढळल्यास त्याचा ते सडेतोड वृत्तीने निषेध करण्यास बिलकुल कचरत नाहीत. थोडक्यांत पंडितांचें व्यक्तित्व दुहेरी (Double personality) नाही तर त्यांचें व्यक्तित्व एकसंध (single personality) आहे. निवडक मित्रांच्या मेळाव्यात हा श्रेष्ठ नि तो कनिष्ठ असा भेद त्यांच्या मनाला कधी शिवणार देखील नाही. त्यामुळे त्या मेळाव्यांत सहजपणेंच नेतृत्वाची माळ त्यांच्या गळयांत पडत असली तरी ती माळ ते स्वतः स्वीकारणार नाहीत. तर

देऊन स्वतः मात्र नामानिराळे राहतील. असें जरी असलें तरी अशा मित्र–मेळाव्यांत जर पंडितांची अनुपस्थिति झाली की, मग त्या मेळाव्यांत प्राणच नाही असें दृश्य दिसलेंच म्हणून समजा! पंडितांना कोणतेंच व्यसन नाही. पण मित्र–मेळाव्यांत ते आले आणि माझ्या सारख्या मित्राने डबींतून अर्धवट बाहेर काढलेली सिगारेट त्यांच्या समोर केली तर तिचा अव्हेर न करतां मित्रमंडळींच्या मेळाव्यांत ते तिचे दोन झुरके मारतील. हातांत काठी घेऊन सकाळ संध्याकाळ ते एकटेच दूरवर फिरायला जातील, फावल्या वेळीं वाङ्मयावरील पुस्तकें चाळतील, आल्यागेल्याचें ते मोठ्या प्रेमानें व आस्थेने स्वागत करतील. स्वतःच्या घरांत आनंदाने राहून साहित्यसेवा करणारे ते एक गृहस्थाश्रमी आहेत.

अध्यक्षपदीं निवडणूक झाली ही घटना अनेक दृष्टींनी इष्ट व स्वागतार्ह वाटते. वि. सा. सं. चे व्यवहार सुनियंत्रितपणें कुरकुर न करतां प्रगतिपथावर चालण्याच्या दृष्टीनें या आदर्श मित्राचा व पंडित साहित्यिकाचा सर्वसमावेशक स्वभाव निश्चित लाभदायी झाला. गोंदिया संमेलनांतच पंडितांना पुढील वर्षीचें अध्यक्षपद देण्यांत येण्याची दक्षता घ्यावी अशी इच्छा मी स्वतः माझ्या मित्रमंडळीजवळ व्यक्त केली होती. तो योग त्यावेळीं जुळून आला नसला तरी सुदैवानें गेल्या वर्षी हा मान त्यांना आपोआप मिळाला. आणि तेव्हापासून आजतागायत त्यांनी आपल्या अध्यक्षीय कारकीर्दीची नाव कुशल नावाड्याच्या करामतीनें वल्हविली याबद्दल कुणालाहि समाधानच वाटेल.

ज. रा. जोशी

*   *

व्यक्तिदर्शन

माणसाची खरी ओळख त्याच्या नित्याच्या बैठकींत होते व तेथेच त्याचें खरें व्यक्तिदर्शन घडतें. निकटचा सहवास लाभल्याशिवाय कोणत्याहि व्यक्तीसंबंधी लिहिणें योग्य होणार नाही. एखादी व्यक्ति आपल्या आयुष्यांत लेखक म्हणून पुढे आलेली असली आणि त्या व्यक्तीला न बघतां जर कांही तिच्यासंबंधी लिहिण्यांत आलें तर तें साहित्यिक व्यक्ति या नात्याचें मूल्यमापन ठरेल. त्या दृष्टीने पाहातां अशा व्यक्तींचा विचार करतांना दोन भाग पडतात. एक साहित्यिक व्यक्ति म्हणून आणि दुसरा सामाजिक व्यक्ति म्हणून. व्यक्तिदर्शनाचे हे दोन ठोकळ भाग समजण्यास हरकत नाही. यांपैकी मी या ठिकाणीं दुसऱ्या भागाचाच विचार प्रामुख्याने करणार आहें.

'दिसतं तसं नसतं' म्हणतात तें कांही खोटं नाही. आता आमच्या प्रा. पंडितांसंबंधीच पाहाना. अपरिचितांना प्रथमदर्शनीं ते दिसायला उग्र व करारी वाटतील. उपमाच द्यावयाची झाली तर त्यांचें बहिरंग एखाद्या काटेरी फणसासारखे भासेल. पण अंतरंग मात्र निराळेंच म्हणजे गोड आणि ओलाव्याने भरलेलें. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा स्थायी भाव. एखाद्याला तोंडावर त्याचे दोष स्पष्टपणें दाखवायला ते कमी करणार नाहीत. पण मनांत कपट नाही किंवा त्या व्यक्तीबद्दलचा आपलेपणा कमी व्हावयाचा नाही. वेळेपुरते लोक जरी नाराज झाले तरी ते दुसऱ्याक्षणीं विसरून जातात. म्हणूव त्यांचें शत्रुत्व कोणीहि करीत नाही. उलट सर्व लोक त्यांना चाहतात.

श्री. भ. श्री. पंडित हे कवि आणि प्राध्यापक आहेत. कवि म्हटला की व्यवहाराच्या बाबतींत शून्य असा सार्वत्रिक समज आहे. पण पंडितांच्या बाबतींत मात्र आपल्याला असें म्हणतां येणार नाही. ते व्यवहारचतुर असून अत्यंत चोख आहेत. जशास तसें हा त्यांचा वागणुकीचा दंडक आहे. बोलतील एक आणि करतील दुसरेंच असे मुत्सद्दी डावपेच त्यांच्या जवळ नाहीत ते एक शिपाई गडी आहेत. ठोशाला ठोसा हें त्यांचें व्यवहारांत वागण्याचें तत्त्व आहे.

पंडितांचें वाचन फार दांडगें आहे. तसेच ते बहुश्रुतहि आहेत. समाजांत वावरतांना जें दृष्टीस पडेल तें सर्व त्यांच्या लक्षांत राहतें. त्यांची स्मरणशक्ति फारच दांडगी आहे. पंधरा वीस वर्षांपूर्वीचा प्रसंग जणूं कांही आजच घडल्याप्रमाणे ते खुलवून सांगतील. ऐतिहासिक आणि कौटुंबिक माहिती त्यांचेजवळ भरपूर प्रमाणांत सापडेल.

अनुक्रमणिका

थट्टा व विनोद करणें आणि मिळून मिसळून वागणें या त्यांच्या स्वभावामुळे सर्वांना ते आवडतात. त्यांच्याजवळ अहंमन्यता नाही; बुद्धीचा गर्व नाही किंवा दुसऱ्याला क्षुद्र समजण्याची अगर कमी लेखण्याची वृत्ति नाही. ते कधी दुर्मुखलेले दिसणार नाहीत. स्वत: नेहमी प्रसन्न राहून दुसऱ्यालाहि ते आनंदी करतील. सरळ व निष्कपटी असल्यामुळेच मित्रपरिवारांत ते प्रिय आहेत.

पंडितांची खरी ओळख त्यांच्या मित्रांच्या मेळाव्यांतच होईल. अपरिचितांशीं ते फारसें बोलणार नाहीत. कोणाशीं मुद्दाम ओळख करून घेणें किंवा कामापुरताच संबंध ठेवणें हें त्यांना माहीत नाही. एखाद्या प्रसंगानें ओळख झाली तर मात्र ती ते टिकवतील. मित्रांपैकी कोणी आपल्याकडे आला तरच त्याचेकडे जावयाचें असा औपचारिकपणा त्यांचेजवळ नाही. अंत:करणांतील जिव्हाळ्यामुळे ते स्वत: होऊन सर्वांकडे जातील आणि विचारपूस करतील.

मर्यादित मित्रांच्या मेळाव्यांत ते रमून जातात. मग काव्यशास्त्रविनोदाला भर येतो. स्वत:च्या काव्याशिवाय इतर अन्य नव्याजुन्या कवींचीं काव्यें त्यांना मुखोद्गत आहेत. त्यांच्या सहवासांत काव्यांचीं मूल्यें सहज जाणतां येतात. मित्रांच्या सहवासांत ते इतके रमतात की गप्पांना त्यांचेजवळ तोटाच नसतो. त्यांच्या सहवासांत दोन तास घालवणें म्हणजे आनंद लुटणें होय. ते स्वत: हसतील, दुसऱ्यांना हसवतील. घडलेल्या प्रसंगाचें हुबेहुब वर्णन करण्यांत त्यांची सूक्ष्म दृष्टि प्रत्ययास येते. अवलोकनशक्ति व स्मरणशक्ति या दोन्हींचें साहचर्य त्यांचेजवळ आहे. एखादे वेळीं एकच गोष्ट एखाद्याला ते दहा वेळां सांगूनहि त्यांना पुन्हा ती नव्याने सांगण्याची लटक येते. अशावेळीं फक्त त्यांच्या विस्मरणशक्तीची आठवण होते. एरव्ही नाही.

दांडगें वाचन, सूक्ष्म अवलोकन, अभ्यासू वृत्ति आणि सडेतोडपणा हे त्यांचे गुणविशेष होत. पद्याप्रमाणें गद्यामध्येहि त्यांनी मोलाचें लिखाण केलें आहे. काव्य, इतिहास, नाटक, कादंबरी इ० कोणताहि विषय घ्या ते त्यांतील खाचाखोचा समजावून सांगतील आणि इतरांचीं दूषित मतेंहि निदर्शनास आणून देतील. स्तुतिपाठकपणा त्यांच्या स्वभावांत नाही. भीड व मुर्वत तर त्यांना माहीतच नाही. ते हिंदीचेहि चांगले अभ्यासक आहेत. प्रत्येक विषयाकडे ते समतोल दृष्टीने पाहतील. सारासार विचार करतील आणि नंतरच आपलें स्पष्ट मत व्यक्त करतील. एकांगी विचार आणि दूषित दृष्टि यांचें त्यांना वावडें आहे. ते एक चांगले वक्तेहि आहेत. स्वत:च्या कामासाठीं इतरांची खुशामत करणें त्यांना माहीत नाही. सरळ मार्ग सोडून आडमार्गाने जाणें त्यांना आवडत नाही. त्यांना डावपेच अवगत नाहीत, व ते अवगत व्हावेत म्हणून पद्धतशीर प्रयत्नहि पण त्यांनी कधी केला नाही.

सामाजिक कार्यांत आवश्यक म्हणून जी एक निर्लेप वृत्ति असावी लागते ती त्यांच्रेजवळ असल्यामुळे कार्य करूनहि ते अलिप्त राहतात. मुंगळ्याप्रमाणें चिकटून राहत नाहीत. प्रसिद्धीची हावहाव नाही किंवा तिजसाठी ते स्वत: धावधाव करून प्रयत्नहि करणार नाहीत. अनायासें मिळाली तर ती त्यांना मात्र हवी असते. स्वत:च्या गुणावर पुढे येणारी ती एक व्यक्ति आहे. अशा या व्यक्तीला वि. सा. संघाच्या सोळाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाच्या मान मिळाला तो यथायोग्य असून प्रा. पंडितांनी आतापर्यंत साहित्यक्षेत्रांत जी कीर्ति मिळविली तिला साजेसाच आहे. ईश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो आणि दिवसेंदिवस त्यांचेकडून अशीच भरीव सेवा घडो हीच हार्दिक इच्छा व्यक्त करून त्यांचें व्यक्तिदर्शन पुरें करतों.

रा. पु. सगदेव

प्रा. पंडितांचें व्यक्तिमत्व

आमचें महाविद्यालयीन जीवन संपून आज सुमारें १९–२० वर्षें झालीं आहेत. पण त्या काळच्या आमच्या मॉरिस कॉलेजमधील जीवनाची आठवण झाली म्हणजे मन आनंदाने आणि स्वाभिमानाने भरून येतें, त्या काळांत शारदा मंडळांत उत्साहाने भाग घेणारे विद्यार्थी, पंडित, कोलते, गर्दे, खेर्डेकर, देशपांडे, वेडेकर, पाठक, शिदोरे, तायडे, जुनानकर, आज महाराष्ट्रांत प्रथितयश लेखक, कवि, संशोधक विद्वान म्हणून विख्यात आहेत. उत्साहाने, नवचैतन्याने काठोकाठ भरलेल्या त्यावेळच्या शारदा मंडळाच्या आठवणी

आम्हाला जन्मभर अवीट असा आनंद देण्यास समर्थ आहेत. अशा आठवणींशीं संबद्ध असलेल्या व्यक्तींत भवानीशंकर पंडित यांचाहि समावेश होतो.

पंडितांचा आणि माझा त्यावेळीं थोडाफार संबंध आला असला तरी तो इतका निकटचा नव्हता. परंतु परस्परांत निरपेक्ष स्नेहभाव वाढावा असें आमचें नातें त्यावेळेपासूनच जुळलें म्हणावयास हरकत नाही. आणि आज तें गाढ स्नेहांत परिवर्तित झालें आहे.

त्या काळांत तरी पंडितांच्या नांवाशीं पांडित्याचें नातें कुणी जोडलें असावेसें मला वाटत नाही. कविवर्य तांब्यांच्या संप्रदायांतले एक भावकवि याच नात्याने मी त्यांना ओळखत असें. पण केवळ कवि म्हणून मात्र मला पंडितांसंबंधी स्नेहभाव कधीच वाटला नाही. आज पंडित साहित्याच्या क्षेत्रांत मानाच्या स्थानावर अधिष्ठित असले तरी त्याच्या आकर्षणामुळे माझा व पंडितांचा स्नेहभाव गाढ झाला आहे असें खोटें विधान मला करावयाचें नाही. पंडितांप्रमाणे साहित्यक्षेत्रांत मानकरी होऊन बसलेले अनेक विद्वान फार पूर्वीपासून माझ्या परिचयाचे आहेत. पण त्यांच्यासंबंधी अकृत्रिम नैसर्गिक गाढ स्नेहभाव मला कधीच वाटला नाही. कित्येकांपासून तर 'अरे बाबा हा साहित्यिक' या कल्पनेने मी कटाक्षाने दूर राहिलों आहें. पण पंडितांबरोबर ४-२ महिन्यांतून एखादा दुसरा दिवसांचे वर राहण्याचे प्रसंग मला आले नसतांहि त्यांच्या संबंधी मला नैसर्गिकरीत्या स्नेहभावच वाटत आला आहे.

पंडित हाडाचे कवि आहेत. कवि हा इतरांपेक्षा अधिक संवेदनाक्षम असतो. सहभावनेने समरस होण्याचें त्याचें सामर्थ्य इतरांपेक्षा अधिक असतें. अखिल विश्वाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन अधिक सहानुभूतिपूर्ण व भावनाशील असतो. इतरांपेक्षा आत्मौपम्य बुद्धि त्याच्या ठिकाणीं अधिक असते. त्या आत्मौपम्य बुद्धीमुळे इतरांच्या सुखदुःखाच्या भावनेशीं तो सहज समरस होऊं शकतो.

सारांश इतरांशीं वागतांना अवश्यक असणारे सौजन्य स्नेहभाव, आत्मीयता, जिव्हाळा हे गुण खऱ्या कवीच्या ठिकाणीं उपजतच असतात असें मला वाटतें. निदान पंडितांत तरी ते मला आढळले. याचा अर्थ पंडित केवळ गोडबोले आहेत असा मात्र नव्हे. किंबहुना कुणाच्या आवडी निवडीची विशेष फिकीर न करतां आपल्याला वाटतें तें फटकन सांगून टाकण्यास ते कधीच कचरत नाहीत. कित्येकदा तर त्यांना प्रसंगाच्या औचित्याचें व वेळकाळाचेंहि भान राहत नसावें. एका कोल्हटकरांच्या स्मृतिदिनाच्या प्रसंगीं तर कोल्हटकरांच्या वाङ्मयावरील अप्रीति त्यांनी अशाच प्रकारें व्यक्त केली होती. पण तें केवळ तेवढ्यापुरतें. तो क्षण निघून गेल्यावर पंडित पुनः आपल्या प्रसन्न मनोवृत्तींत. पंडितांच्या जवळ अशा अनेक प्रसंगांच्या स्मृतींचा संग्रह आढळूं शकेल. याच गुणामुळे वा अवगुणामुळे स्वतःलाहि त्यांनी व्यक्तिमहात्म्य लाभूं दिलें नाही. आणि कोणत्याहि व्यक्तिमहात्म्याचा प्रभाव त्यांनी आपल्यावरहि पडूं दिला नाही.

पंडित आणि कोलते एकमेकांचे बहिश्चर प्राण. पण असे प्रसंग अनेक आले असतील की जेव्हा पंडितांच्या या निर्भीड फटकळपणावजा स्पष्टतेबद्दल कोलत्यांना देखील आश्चर्यचकित व्हावें लागलें असेल. याचा परिणाम असा झाला की साहित्याच्या क्षेत्रांत आज जे कांही वेगवेगळे गट व संप्रदाय आढळतात त्यांपैकी एकांतहि ते पडत नाहीत पण त्यासाठी पंडितांना आपल्या आयुष्यांत फार मोठी किंमत द्यावी लागली आहे.

पंडितांचें काव्य ते महाविद्यालयांतून बाहेर पडण्यापूर्वीच मान्यवर झालें होतें. असें असतांहि आपल्या पात्रतेप्रमाणे व्यवसाय मिळावयास त्यांना तपश्चर्या करावी लागली. अगदी खालच्या पायरीवर उभे राहून प्राध्यापकाची जागा त्यांना कष्टाने मिळवावी लागली. पंडित बरेच दिवस प्रथम हायस्कुलांत शिक्षक होते. चांदा येथे ज्युबिली हायस्कूलांत असतांना त्यांना हिस्लॉप कॉलेजांत दीर्घ कालावधीनंतर जागा मिळाली व तेथे कांही वर्षे राहून १९४५ सालीं त्यांना सरकारी कॉलेजांत जागा मिळाली.

कोणत्याहि गटांत न पडणाऱ्या माणसाला सहजासहजी कोणत्याच क्षेत्रांत मान्यता मिळणें दुष्कर असतें. मग साहित्याचें क्षेत्र तरी त्याला कसें अपवादवजा असूं शकेल ? स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर पुढे येणाऱ्या माणसासंबंधी मला नेहमीच आदर वाटत आला आहे.

अनुक्रमणिका

गेल्या ३० वर्षांत साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या प्रांतांत वावरणारे बहुसंख्य साहित्यिक गु. प्रा. बनहट्टी यांच्या शिष्यमंडळीपैकी आहेत. पंडितहि त्याच शाखेंत वसतात. त्यामुळेहि त्यांच्या माझ्या स्नेहाला आणखी एक कारण मिळालें.

प्राध्यापकाच्या जागेवर त्यांची योजना झाल्यानंतर काव्य सोडून त्यांनी अनेक विषयांवर लेखन केलें आहे आणि आधुनिक काव्यावरील त्यांचा एक ग्रंथ नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांचीं मतें सर्वांनाच मान्य होतीं अथवा आहेत असें म्हणतां येणार नाही. परंतु तीं सर्वांना मान्य व्हावीं अशी त्यांनी कधीच अपेक्षा बाळगली नसावी. परंतु या स्फुटलेखनानें व त्यांच्या या ग्रंथाने काव्याखेरीज अन्यक्षेत्रांतहि त्यांचें स्थान निश्चित झालें आहे.

'पिचलेला पावा', 'चवथीचा चांद' व शिशुगीतांचे संग्रह वाचत असतांना कल्पनांची गगनोड्डाणें किंवा भव्य उत्कट भाव त्यांत आढळणार नाहीत हें खरें. पण प्रसन्न, संथ, आणि मनोहरी असें सामान्य जनांच्या जीवनाशीं निगडित असणारे भाव त्यांत सहज आढळून येतील. प्रापंचिकाच्या जीवनांत घडून येणारे रोजचे प्रसंग, त्या प्रसंगांतून उत्पन्न होणारे रम्यभाव व त्यांचा मनोहर आविष्कार त्यांच्या काव्यांत आपल्याला भरपूर आढळतो. तांब्यांची कविता जशी श्रुतिमधुर व प्रापंचिकांच्या जीवनाशीं संवद्ध तशीच पंडितांच्या काव्याची गोष्ट आहे. तांब्यांच्याच कवितेंत कधी कधी आढळणारी भव्यता आणि ओजोगुण मात्र पंडितांच्या काव्यांत फारसा आढळत नाही. त्यांची कविता सहजमनोहर आहे. तिच्यांत विद्युल्लतेची चमक नाही किंवा प्रखर दीप्ति नाही. पण रोजच्या रटाळ जीवनाला कंटाळलेल्या प्रापंचिकाला क्षणभर इतर जगाला विसरायला लावून त्याचें मन आपल्या सहसंवेदनेनें प्रसन्न करण्याचें सामर्थ्य त्यांच्या कवितेंत खास आहे. अफाट कल्पकतेपेक्षा जीवनानुभूतीचा आनंदच त्यांच्या कवितेंत अधिक मिळतो. आणि त्या कवितेच्या वाचनाने प्रतीत होणारी सौंदर्यानुभूति सोज्वल, निर्मळ असते. प्रसादगुणहि तिच्यांत पुरेपूर भरला आहे.

विचाराने पंडित प्रगतिशील नाहीत असें म्हणतां यावयाचें नाही. तसेंच हीन अभिरुचीच्या आहारींहि ते कधीच गेले नाहीत.

पंडितांना आडवाटेनें जाऊन मोठेपणा मिळविण्याची हावच नाही, त्यामुळे साहित्याच्या क्षेत्रांत प्रत्यहीं आढळणाऱ्या गटबाजीपासून ते कटाक्षाने दूर आहेत. तत्वाचा प्रश्न असेल तेथेहि पंडितांनी दूरदृष्टि ठेवून आपल्या जिव्हेला कधीहि कुलूप लावून ठेवलेलें आढळणार नाही. पण स्वतः होऊन वाद निर्माण करण्याची त्यांची प्रवृत्ति नाही. समाजांत वावरतांना आवश्यक असणारी प्रामाणिक देवाण घेवाण त्यांना मान्य आहे. नव्हे, त्यासाठी वृथा वाद घालत बसण्याची मात्र त्यांना मनापासून नावड आहे.

म्हणूनच त्यांच्या साहित्यापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्वाचें महत्त्व मला अधिक वाटतें. कारण प्रामाणिक प्रांजल आणि सौजन्याने ओथंबलेलें व्यक्तिमत्व साहित्याच्या क्षेत्रांत दुर्मिळ वस्तु झालेली आहे, अशी माझी खात्री होत आहे. आजच्या साहित्यांत गुणसंपदेची उणीव आहे असें धाडसपूर्ण विधान मला करावयाचें नाही, पण आजच्या साहित्यांत माणूस या नात्याने अपेक्षा करतां येण्यासारखें व्यक्तिमत्व मात्र अपवादवजा मिळणारी गोष्ट आहे, असा माझा विश्वास आहे. बुद्धि आणि हृदय यांची तफावतच अधिक आढळून येत आहे. आचारविचारांची संगति दुष्प्राप्य झाली आहे. आणि म्हणूनच साहित्य सौंदर्यप्रसाधनांनी परिपूर्णतेनें सजलेलें दिसत असतांहि त्या सौंदर्यप्रतीतींत निर्मळतेचा, पावित्र्याचा अभावच अधिक दिसून येतो. विकाराधिष्ठित मादकतेचा प्रभावच अधिक.

हेवेदावे, परस्परांविषयी असूया, अपप्रचार, अपप्रवाद आणि अहंभाव या धूलिकणांनी साहित्याचें सारें वातावरण अगदी भरून गेलें आहे. साहित्यमूल्यापेक्षा साहित्यिकाची वैयक्तिक प्रतिष्ठा, मानमरातब, हितसंबंध यांचीच मातबरी आज अधिक आहे. या मोहमयी वातावरणांत प्रतिष्ठेच्या उच्चभागीं–प्रलोभनाच्या कड्यावर बसले असतांहि ज्यांनी संयमानें संमोह टाळला आणि आपलें प्रामाणिक व्यक्तिमत्व कायम राखलें अशा पंडितांबद्दल मला नितांत आदर वाटला तर त्यांत कुणाला आश्चर्य करण्याचें कारण नाही.

द. रा. गोमकाळे

अनुक्रमणिका

खामगांवचें सार्वजनिक जीवन व सांस्कृतिक क्षेत्रांतील कामगिरी

प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे

खामगांव हें विदर्भांतील एक लहानसें पण विख्यात गाव आहे. हें नगर म्हणजे बुलडाणा जिल्ह्यांतील सर्वांत मोठें व प्रमुख केंद्र असून या प्रदेशांतील कापसाच्या व्यापाराची सर्वांत मोठी पेठ म्हणून सर्वत्र खामगांवची माहिती आहे. मात्र ब्रिटिश राजवटींत वड्या गौरकाय अधिकाऱ्यांना थंड हवेचीं ठिकाणें जास्त पसंत असत, त्यामुळे खामगांवला जिल्हयाचें ठिकाण न बनवतां तें महत्त्व बुलडाण्यास देण्यांत आलें, या कारणानें जिल्हयांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कचेऱ्या व वरिष्ठ न्यायालय बुलडाण्यास राहिलें व त्यायोगें खामगांवचें महत्त्व कांहीसें कमी झालें. परंतु राज्यकारभाराच्या क्षेत्रांत हें वैगुण्य राहून गेलें असलें तरी इतर क्षेत्रांतील विकास व प्रगति या दृष्टीनें पाहतां खामगांवच या जिल्हयांतील प्रमुख शहर बनलें आहे.

खामगांवच्या प्रगतीच्या मार्गांतील दुसरी मोठी अडचण अशी आहे की या ठिकाणीं रेल्वेमार्ग असला तरी हें शहर मुख्य मार्गावर नसून येथे येण्यासाठी सहा मैलावरील जलंब या ठिकाणाहून लहानशा फाट्याच्या गाडीनें यावें लागतें. ही अडचण नसती व रेल्वेचा मुख्य मार्ग खामगांववरून गेलेला असता तर आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत खामगांवची आज आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक प्रगति झालेली आढळली असती.

खामगांवच्या प्रगतीच्या मार्गांत आणखीहि एक अडचण अप्रत्यक्षपणे अडथळा उत्पन्न करीत आली आहे. ती म्हणजे पाण्याची टंचाई. गेल्या उन्हाळ्यांत तर पाण्याच्या दुष्काळानें उच्चांक गाठला व नगरपालिकेनें बराच पैसा व श्रम खर्च करून लोकांना जेमतेम जिवंत राहाण्याइतकें पाणी पुरविलें. परंतु आता खामगांवच्या हल्लींच्या ३५ हजार, लोकवस्तीच्या दुप्पट लोकांना भरपूर पाणी मिळू शकेल अशी पाणीपुरवठ्याची योजना येथील नगरपालिकेनें राज्यसरकारच्या मदतीनें हातीं घेतली असून ती योजना सुमारें दोन वर्षांत पूर्ण होईल व पाणी टंचाईचा प्रश्न कायमचा निकालांत निघेल अशी आशा आहे.

खामगांवच्या प्रगतीच्या मार्गांतील या अडचणींची कल्पना आली म्हणजे इतक्या अडचणी असूनहि येथील जनतेनें सर्वच क्षेत्रांत, विशेषेंकरून शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रांत केलेल्या प्रगतीचें कौतुकच करावेसें वाटतें. इतक्या लहान व कमी वस्तीच्या दुसऱ्या गावांत इतकी प्रगति झालेली क्वचित्‌च आढळेल.

शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रांतील खामगांवनें केलेल्या प्रगतीचा विचार केला म्हणजें खामगांवनें विदर्भाला दिलेल्या तीन दिवंगत सुपुत्रांची नांवें प्रथम समोर आल्यावांचून राहत नाहीत. या तीन थोर व्यक्ति म्हणजे **कै. रावबहादूर केशवराव देशमुख, कै. त्र्यंबक केशव उर्फ दादासाहेब भडंग व कै. श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकर.** आज खामगांवची जी कांही सांस्कृतिक सामाजिक व प्रगति झालेली दिसते तिचा पाया या तिघांनी घातला असें म्हटलें तरी फारशी

अतिशयोक्ति होणार नाही. जुन्या पिढींतील या तीन दिवंगत नेत्यांखेरीज हल्ली हयात असलेल्या अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ नागरिकांचें कार्यहि या प्रगतीला कारणीभूत झालेलें आहे, त्यांचा उल्लेख पुढे येईलच.

खामगांवच्या शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या क्षेत्रांतील सर्वांतील महत्वाची संस्था म्हणजे येथील **गोविंदराम सेकसरिया विज्ञान महाविद्यालय.** येथील **विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ** या प्रमुख शिक्षण-संस्थेने हें महाविद्यालय चालविलें असून कै. गोविंदराम सेकसरिया यांनी आरंभींच मोठी देणगी दिल्यामुळे त्यांचें नांव महाविद्यालयाला देण्यांत आलेलें आहे.

हें महाविद्यालय १९४७ सालीं स्थापन झालें तेव्हापासून १९५२ पर्यंत या संस्थेंत विज्ञान व कृषि दोन्ही विभागांचें शिक्षण दिलें जात असे, परंतु आर्थिक अडचणीमुळे सध्या कृषिविभाग बंद ठेवण्यांत आलेला आहे. विज्ञान विभागांत बी. एस्‌सी. पर्यंत शिक्षण दिलें जातें व त्यासाठी पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र यांच्या अभ्यासाला आवश्यक असलेल्या लाखों रुपयांच्या सामग्रीने सुसज्ज अशा प्रयोगशाळाहि आहेत. गणित विभागांत Applied mathematics शिकवण्याचीहि सुरुवात करण्यांत आली आहे. महाविद्यालयाला एक लहानसें वसतिगृहहि जोडलेलें असून त्यासाठी मोठी इमारत बांधण्याकरिता निधि गोळा करण्यांत येत आहे. या महाविद्यालयावर विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाने आतापर्यंत इमारत, प्रयोगशाळा, उपकरणीं व यंत्रसामुग्री व इतर खर्च मिळून सुमारें दहा लाख रुपयांची प्रचंड रकम खर्च केली असून सेकसरिया कुटुंबाखेरीज विदर्भांतील अनेक ठिकाणचे व्यापारी व नागरिकांनी आणि अनेक स्थानिक व्यापारी व नागरिकांनी अत्यंत सढळ हाताने मदत केली आहे. आजहि हें महाविद्यालय म्हणजे खामगांवचें मोठें भूषण आहे, या जाणिवेने सर्व नागरिक संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी सक्रिय साहाय्य करीत असतात. या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची संख्या ३०० वर असून प्राध्यापकांची संख्या २३ आहे.

• या महाविद्यालयांत पदवीपरीक्षेपर्यंतच्या परीक्षांसाठी दिल्या जाणाऱ्या वैज्ञानिक शिक्षणाखेरीज तरुण पिढीच्या शारीरिक व सांस्कृतिक विकासाचें कार्यहि होत असतें. महाविद्यालयांतील युनियन, **वाङ्मय** मंडळ व कलाविकास मंडळ वगैरेंच्या द्वारें होणाऱ्या साहित्य व कलाविषयक कार्यक्रमांचा स्थानिक जनतेलाहि लाभ होत असतो.

या संस्थेशीं स्थानिक व्यापारी व सुशिक्षित लोकांपैकी बहुतेक सर्वांचाच संबंध असला तरी या महाविद्यालयाच्या स्थापनेचें व विकासाचें सर्वांत जास्त श्रेय येथील सुप्रसिद्ध नागरिक व समाजसेवक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष **श्री. सोमनाथ रावजी ऊर्फ बाळासाहेब भाटे** यांनाच द्यावें लागेल. या कार्याची मूळ स्वल्पना त्यांचीच, व तिला मूर्त स्वरूप देण्यासाठी अनेक कार्यकर्ते व निधि यांचा संचय करण्यासाठी सर्वांत जास्त परिश्रमहि त्यांचेच कारणीभूत झालेले आहेत.

श्री. भाटे यांच्याशिवाय खामगांवचे आमदार **डॉ. एकबोटे,** दानशूर शेट **श्री. मोहनलालजी पुर्वार,** शिक्षण प्रसारक मंडळाचे चिटणीस **श्री. ठोंबरे** वकील व खजीनदार **श्री. भाऊसाहेब ओझरकर** वकील, श्री. भाऊसाहेब भिडे यांचे व इतरहि अनेकांचे **परिश्रम** या महाविद्यालयाच्या उन्नतीस कारणीभूत आहेत.

संस्थेच्या अत्यंत आणीबाणीच्यावेळीं आमदार **डॉ. एकबोटे** यांनी आपल्या खांद्यावर ही जड धुरा घेऊन संस्था वाचविली. मुख्य मंत्री पं. शुक्ल यांची ह्या संस्थेस भेट म्हणजे मृतात्म्यास अमृतसिंचनच होय. तसेंच सी. पारेख आणि कंपनीचें **श्री. हिंमतलाल मेहता** हे हल्ली महाविद्यालयाच्या व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष असून तेहि इमारतनिधि जमविण्याच्या व इतर बाबतींत कळकळीने कार्य करीत आहेत.

प्राचार्य **के. मा. मुन्शी** हे महाविद्यालयाचे प्रमुख आहेत.

खामगांवांतील दुसरी एक वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण-संस्था म्हणजे १९२१ सालापासून कार्य करीत असलेलें **टिळक राष्ट्रीय विद्यालय.** या संस्थेंत राष्ट्रीय वृत्तीने व सर्वसाधारण शिक्षणापेक्षा निराळ्या प्रकारचें, बेसिक पद्धतीला अनुसरून मॅट्रिकपर्यंत शिक्षण दिलें जातें. बौद्धिक अभ्यासक्रमाखेरीज हस्तव्यवसाय, चित्रकला, मूर्तिकला, शेती, विणकाम, संगीत या विषयांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येतें. तसेंच सर्व

विद्यार्थ्यांना संस्थेच्या वसतिगृहांत राहाणें आवश्यक असून तेथे स्वावलंबन, शिस्त व राष्ट्रीय वृत्ति त्यांच्या अंगीं बाणावी अशा प्रकारें त्यांचा दिनक्रम चालविण्यांत येतो.

या संस्थेच्या कार्याची गांधीजींपासून अनेक राष्ट्रीय नेत्यांनी प्रशंसा केली असून राज्यसरकारकडूनहि विद्यालयास मदत मिळूं लागली आहे.

खामगावांत आल्यावर महाविद्यालयाप्रमाणेच या संस्थेलाहि भेट देणें आवश्यक वाटावें असें या संस्थेचें कार्य नमुनेदार आहे. विशेषेंकरून चित्रकलाविभाग अत्यंत प्रशंसनीय आहे.

या संस्थेचें संचालन विश्वस्त मंडळाकडून होतें, त्या मंडळाचे अध्यक्ष नगरांतील वयोवृद्ध देशभक्त डॉ० **भाऊसाहेब पारसनीस** यांचेकडे आहे. **श्री. मु. श्री. पंधे** गुरुजी हे विद्यालयाचे प्रमुख आहेत. 'Through Gandhiji's eyes' हाच ह्या संस्थेचा अमलांत आणण्याचा कार्यक्रम आहे.

वरील दोन संस्थांखेरीज सरकारी मुलांचें व मुलीचें विद्यालय, तसेंच **न्यू ईरा हायस्कूल, नॅशनल हायस्कूल, केला हिंदी हायस्कूल व अंजुमन हायस्कूल** अशीं सहा विद्यालयें असून नगरपालिकेच्या ए. व्ही. स्कूलचेंहि क्रमशः हायस्कुलांत रूपान्तर होत आहे. पैकी न्यू ईरा हायस्कूलच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष **श्री. कुंजीलालजी सावणा** हे आहेत. महाविद्यालया-प्रमाणेच न्यू ईरा हायस्कूलच्या उन्नतींतहि **श्री बाळासाहेब भाटे** यांचे परिश्रम मोठ्या प्रमाणावर कारणीभूत झालेले आहेत. **नॅशनल हायस्कूल** या संस्थेच्या विकासाचें मोठें श्रेय **श्री रायचंदभाई मेहता** यांना आहे. ॲडव्होकेट **श्री. चांदे** हे या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

केला हिंदी हायस्कूल या संस्थेचे अध्यक्ष श्री **नवलकिशोर मोहता** हे असून **श्री. गोविंदशेठ भाटिया** हे उपाध्यक्ष व **श्री. अग्रवाल** वकील हे कार्यवाह आहेत.

वरील प्रमुख शिक्षण संस्थांखेरीज नगरांतील जनतेच्या सांस्कृतिक उन्नतीसाठी झटणाऱ्या इतर संस्थाहि खामगांवांत बऱ्याच आहेत.

दस्तुर रतनजी लायब्ररी ही संस्था १८८९ सालीं स्थापन झालेली असून गेलीं ७५ वर्षे ही संस्था खाम-गांवच्या जनतेची वाचनाची आवड व अभिरुचि यांच्या विकासासाठी झटत आहे. हल्ली **डॉ. त्र्यं. र. साने** हे या संस्थेचे अध्यक्ष व **श्री. दा. शि. शेकदार** हे कार्यवाह आहेत.

जीवन विकास मंडळ नांवाची एक संस्था दोन वर्षांपूर्वीच स्थापन झाली असून या संस्थेतर्फे गेलीं दोन वर्षे नवरात्र व्याख्यान मालेचा अभिनंदनीय उपक्रम सुरू झालेला आहे, गेल्या दोन वर्षांत मिळून बाहेरच्या १५–२० विद्वानांच्या व्याख्यानांचा लाभ या व्याख्यान-मालेमुळे खामगांवकरांना झाला आहे. तसेंच हस्त-लिखित मासिक, क्रीडांचे सामने, सहली, वगैरे उप-क्रमहि या मंडळातर्फे सुरू झाले असून स्थानिक उत्साही तरुण त्यांत भाग घेत असतात. महाविद्यालयाचे **प्राचार्य मुन्शी** हे या मंडळाचे अध्यक्ष आहेत आणि **प्राध्यापक मनोहरपंत परांजपे व श्री. गोविंद भिडे** हे कार्यवाह आहेत.

सांस्कृतिक विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थांत **श्री. मुक्तेश्वर नाट्य मंडळ व संगीत विकास मंडळ** या दोन आणखी प्रमुख संस्था आहेत. यांपैकी नाट्य मंडळा-चें कार्य १९२२ पासून सुरू असून आजवर या संस्थेंतील हौशी कलावंतांनी २५ वर अधिक नाट्यप्रयोग येथील जनतेला सादर केले आहेत. या मंडळाचे अध्यक्ष **डॉ. पु. म. पारसनीस** हे स्वतः कसलेले नट व दिग्दर्शक असून **श्री. त्रिं. वि. महाजन** हे संस्थेचे चिटणीस आहेत. संगीत विकास मंडळाचे अध्यक्ष **डॉ. एकबोटे** हे असून **डॉ. पु. म. पारसनीस, श्री. ठोंबरे व श्री. महाजन** हे कार्यवाह आहेत.

याखेरीज सांस्कृतिक विकासासाठी प्रयत्न कर-ण्याच्या उद्देशाने **ज्ञानोपासक मंडळ** नांवाची संस्था १९४६ सालीं स्थापन झालेली असून **श्री. गोविंद माधवराव गोसावी व श्री. मुरलीधर गणपतराव पाटील** हे या मंडळाचे प्रणेते व प्रमुख कार्यवाह आहेत.

भजनप्रेमी मंडळींच्या **श्री गुरुदत्त भजन मंडळ** नामक संस्थेचें अध्यक्षपद डॉ. एकबोटे यांचेकडे आहे.

येथील क्रीडाप्रेमी लोकांनी चालविलेल्या 'खाम-गांव फ्रेंड्स जिमखाना' व 'टेनिस क्लब' या दोन संस्थांचें सामाजिक जीवनांतील स्थानहि उपेक्षणीय नाही.

तसेंच डॉ. एकबोटे यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणारें **निनाद** हें मराठी साप्ताहिक हेंहि

खामगांवच्या सार्वजनिक जीवनाचें एक अंग आहे. यांखेरीज 'समाचार' नांवाचें एक साप्ताहिक अलीकडेच प्रसिद्ध होऊं लागलें आहे (संपादक श्री. **श्रीराम शेळके**). 'सर्वोदय' नांवाचें एक हिंदी साप्ताहिकहि येथे प्रसिद्ध होतें.

स्थानिक जनतेच्या शारीरिक उन्नतीसाठी झटणाऱ्या संस्थांमध्ये नगरपालिकेच्या व्यायामशाळेखेरीज **श्री. त्रिबकलालजी पुरवार** यांच्या नेतृत्वाखालील **श्री. शिवाजी व्यायाम शाळा व तानाजी संघ** या संस्था प्रमुख आहेत.

खामगांवांतील भगिनीवर्गानेहि आपल्या सर्वांगीण विकासासाठी **टिळक स्मारक महिला मंडळ व शारदा समाज** अशा दोन संस्था चालविल्या आहेत. दोन्ही संस्थांच्या स्वतःच्या मालकीच्या इमारती असून शारदोत्सव, व्याख्यानें, प्रदर्शनें, शिवणकाम, रांगोळी व इतर हस्तकौशल्याच्या कामाच्या स्पर्धा, खेळ, सहली वगैरे कार्यें या संस्थांमार्फत होत असतात. यांपैकीं टिळक स्मारक महिला मंडळाचें अध्यक्षपद **सौ. मथूताई भिडे** यांचेकडे असून सौ. जोशी, भगिनीहि संस्थेच्या कार्यांत प्रामुख्याने भाग घेत असतात.

शारदा समाजाचें अध्यक्षपद **श्री. सौ. इंदिराबाई एकबोटे** यांचेकडे असून समाजाच्या कार्यवाह **श्री. सौ. राजनेकर** या आहेत.

या दोन्ही संस्थांच्या कार्यांत व इतर सामाजिक कार्यांत भाग घेणाऱ्या भगिनींमध्यें **श्री. कर्वे, सौ. पार्वतीबाई पारसनीस, सौ. खांडेकर, सौ. कोठार, सीतादेवी झुनझुनवाला, सौ. सुगंधाबाई पवार** आदि नांवें प्रामुख्याने पुढे येतात.

टिळक स्मारक महिला मंडळाची स्थापना करण्यांत व इमारत उभी करण्यांत कै. तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या पत्नी **कै. रमाबाई कोल्हटकर** यांनी फारच महत्त्वाचा वाटा उचलला हें नमूद करणें आवश्यक आहे.

या संस्थांखेरीज खामगांवांतील आणखी एक मुद्दाम उल्लेख करण्याजोगी व जनतेला अत्यंत उपयुक्त अशी संस्था म्हणजे **ज्युबिली मेमोरिअल हॉस्पिटल.** खास स्त्रिया व मुलांसाठी असलेलें हें इस्पितळ अद्यावत साधनांनी व उपकरणांनी युक्त असून त्याच्या **इमारतीची** बांधणी व पुष्कळसा खर्च जनतेनेच गोळा केलेल्या निधींतून झालेला आहे व होत आहे. या इस्पितळाच्या स्थापनेसाठी त्यावेळीं जिल्हाधिकारी असलेले **श्री. डी. व्ही. रेगे** (हल्ली मध्यभारतांत पब्लिक सर्विस कमिशनचे अध्यक्ष) व **कै. बाबासाहेब भडंग** यांनी कमालीचे परिश्रम घेतले. हल्ली या इस्पितळाच्या समितीचे कार्यवाह **डॉ. सावजी** हे आहेत.

वर दिलेल्या संस्थांच्या त्रोटक माहितींत येथील शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यांत भाग घेणाऱ्या प्रमुख व्यक्तींचा निर्देश आहेच, तरीसुद्धा कांही व्यक्तींचा थोडा अधिक परिचय व इतर कांहींची माहिती करून घेणें आवश्यक आहे.

येथील जुन्या पिढींतील कार्यकर्त्यांपैकीं **डॉ. महादेव नारायण उर्फ भाऊसाहेब पारसनीस** यांचें वय सध्या ८० वर्षांचें आहे. त्यांनी १९०८ सालापासून कॉंग्रेसचें कार्य केलेलें असून प्रांतिक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष, अ. भा. कॉं. कमिटिचे सभासद राहिलेले आहेत. स्थानिक नगरपालिकेचे ते पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होते व इतरहि सर्व सामाजिक कार्यांत त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे. येथील सर्वच कॉंग्रेस कार्यकर्ते त्यांना गुरुस्थानीं मानतात.

येथील सामाजिक कार्यांत पुढाकार घेणाऱ्या व्यक्तींत आणखी दोन नांवें. प्रामुख्याने पुढे येतात. तीं म्हणजे **श्री. बाळासाहेब भाटे व आमदार डॉ. एकबोटे** यांचीं. खामगांवांतील कुठल्याहि शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यांत हे दोन कार्यकर्ते नाहीत असें बहुधा व्हावयाचेंच नाही. श्री. भाटे यांनी महाविद्यालय व न्यू ईरा हायस्कूल यांच्या विकासासाठी केलेलें कार्य वर नमूद केलेंच आहे. या कार्यांत त्यांनी फार झीज सोसली असून सार्वजनिक जीवनांत त्यांचें स्थान फार वरचें आहे.

डॉ. एकबोटे हे राजकीय व इतर सार्वजनिक कार्याखेरीज थोडीबहुत साहित्यसेवाहि करतात. 'अहिंसाच कां ?' नांवाचें पुस्तक त्यांनी लिहिलें असून 'निनाद' साप्ताहिकाचे संपादक या नात्याने पुष्कळच लिखाण करीत असतात. नाट्य, संगीत यांचीहि त्यांना

आवड आहे. ते स्वतः क्रीडाप्रेमीच नव्हे तर क्रिकेटपटु व टेनिसपटु आहेत व स्थानिक जिमखान्याचे चिटणीस आहेत.

येथील व्यापारी मंडळींत **श्री. मोहनलालजी पुर्वार** यांची दानशूर म्हणून ख्याति असून ज्युबिली मेमोरिअल हॉस्पिटल, राष्ट्रीय विद्यालय व इतर संस्थांना त्यांनी फार मोठी मदत केलेली आहे.

कॉटन मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष श्री. **रामचंदभाई मेहता** हे कॉंग्रेसच्या अत्यंत जुन्या कार्यकर्त्यांपैकी एक असून सार्वजनिक कार्यांत त्यांनी मोठा वाटा उचललेला आहे.

गजानन मोटार सर्विसचे एक मालक श्री. **गोविंदशेट भाटिया** हे कॉंग्रेसच्या व इतर सार्वजनिक संस्थांच्या कार्यात अत्यंत उत्साहाने भाग घेतात व त्यासाठी स्वतः पडेल ती झीज सोसून सर्वांस मदत करण्याला नेहमी तत्पर असतात.

श्री. **नवलकिशोर मोहता** यांचा उल्लेख केला हिंदी हायस्कूलचे अध्यक्ष म्हणून वर आलाच आहे.

स्थानिक वकील मंडळींपैकी श्री. भाटे यांच्याखेरीज **श्री. भाऊसाहेब भिडे, श्री. ठोंबरे, श्री. ओझरकर, श्री. चांदे** हे स्थानिक महाविद्यालयाशीं आरंभापासून निगडित असून इतरहि सार्वजनिक कार्यांत ते नेहमी पुढे असतात. वार असोसिएशनचे अध्यक्ष **श्री. डोंगरे** हेहि सार्वजनिक कार्यांत भाग घेतात. **श्री टिपरे** हे नगरपालिकेचे अध्यक्ष आहेत.

येथे सध्या असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांपैकी सिव्हिल जज्ज **श्री. द. रा.** गोमकाळे हे तर मध्यप्रदेशांतील एक प्रमुख साहित्यिक व नाटचविषयक टीकाकार म्हणून प्रसिद्धच आहेत. शिवाय सध्या अॅडि. डेप्यु. कमिशनर असलेले **श्री सुरडकर** हेहि वाङ्मयप्रेमी रसिक असून सर्व प्रकारच्या सांस्कृतिक कार्याला मदत करण्यास तत्पर असतात.

शिक्षणखात्यांतील ए. डी. आय. **श्री. अडावदकर** हे स्वतः कवि व रसिक आहेत. तसेंच सरकारी हायस्कुलांतील एक शिक्षक **श्री. बेनोडेकर** हे व्यासंगी व विद्वान म्हणून ओळखले जातात.

स्थानिक महाविद्यालयांतील **प्राचार्य मुन्शी** हें सर्वच सांस्कृतिक कार्यांत पुढाकार घेतात व त्यांचा साहित्याचा व्यासंगहि आहे. प्राध्यापकांपैकी येथे आलेले **प्रभाकर ऊर्ध्वरेषे** व **पद्माकर डावरे** हे तरुण पिढींतील प्रमुख लेखकांपैकी आहेत. **प्रा. मंगेश नाईक** हेहि लेखक आहेत याखेरीज महाविद्यालयाचे **प्रा. तारे, प्रा. विद्वंस, श्री. काणे**, श्री. **घत्ते** हेहि सार्वजनिक कार्यांत प्रामुख्याने भाग घेतात.

येथील टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. पंधे गुरुजी यांची एक नामवंत चित्रकार, रसिक, साहित्य व कलाप्रेमी म्हणून प्रसिद्धी आहे.

येथील डॉक्टरांपैकी **डॉ. प्रल्हाद माधव काळे** हे रा. स्व. संघाचे संघचालक आहेत. **डॉ. साने** हे स्थानिक ग्रंथालयाचे अध्यक्ष, डॉक्टरांच्या संघटनेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे वैद्यकीय सल्लागार आहेत. **डॉ. सावजी** हे ज्युबिली मेमोरिअल हॉस्पिटलचे सेक्रेटरी व **डॉ. पु. म. पारसनीस** हे नाटचमंडळाचे अध्यक्ष असल्याचा उल्लेख वर आला आहेच.

याखेरीज आर्यसमाजाचे जुने व विद्वान कार्यकर्ते **श्री. पन्नालालजी व्यास, संत पांचलेगांवकर महाराज**, एक जुने पट्टीचे विद्वान **श्री. प्रभाकरशास्त्री अग्निहोत्री**, कीर्तनकार, चित्रकार व नट म्हणून प्रसिद्ध असलेले **श्री. नानासाहेब मेरेकर**, आदींचेंहि खामगांवच्या सार्वजनिक जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत महत्त्वाचें स्थान आहे.

यांखेरीजहि इतर अनेक वृद्ध व तरुण स्त्री–पुरुष कार्यकर्ते खामगांवच्या सार्वजनिक जीवनांत कार्य करीत असतात; आजहि विदर्भ साहित्य संघाच्या अधिवेशनाच्या निमित्तानें हे सर्वच कार्यकर्ते एकत्र आले असून आपापल्या परीनें अधिवेशन यशस्वी करण्यासाठी झटत आहेत; त्या सर्वांचा नामनिर्देश येथे करणें शक्य नसलें तरी त्यांचें कार्य महत्त्वाचें व प्रशंसनीय आहे यांत शंका नाही.

खामगांवचें साहित्यवृत्त—

' क्षेमेन्द्र '

खामगांव हें मुळांत क्षेमगाव असावें. जें जवळ नसेल तें मिळवणें हा योग. मिळवलेलें रक्षण करणें याला म्हणावयाचें क्षेम. वाङ्मयदृष्टचा खामगांवांत योगक्षेमापैकी फक्त 'क्षेमच' शिल्लक दिसतें. व्यवहारांत योगक्षेम याचा अर्थ आयव्यय असा होतो. हा आयव्यय हें व्यापाराचें लक्षण आहे. आजतरी निदान खामगांव हें व्यापारी केंद्र आहे.

येथील वाङ्मयविषयक उलाढालींची नोंद करावयाची झाल्यास अडचणीच्या वेळीं 'गुप्तमंजुष' उघडल्याप्रमाणे कुणालाहि श्रीपाद कृष्णांकडे वळावें लागतें. श्रीपादकृष्णांनी आपले 'पसाभर पोहे' कोणत्या कृष्णाला दिले याची कल्पना नाही; पण या 'सुदाम्याला' मिळालेल्या वाङ्मय 'सुवर्ण नगरींतच' अद्यापहि येथील लोक वावरत आहेत. हा 'मतिविकाराचाच' एक प्रकार ! 'माझे गुण जाणणारा समानधर्मा पुढे निर्माण होईल' असें भवभूतीप्रमाणे श्रीपाद कृष्णांनी म्हटलें नसलें तरी त्यांचेवरच पुस्तक लिहून पुढे आलेला एक या दृष्टीने श्री. द. रा. गोमकाळे यांचाही त्यांचा 'समानधर्मा' म्हणून उल्लेख करावयास हवा. नाटक, नाटककार आणि नाटकी लोक यांच्या बद्दल श्री. गोमकाळे हे नेहमीच आपुलकीची भावना बाळगतात. त्यांनी 'शारदे'ला प्रस्तावना लिहून सजविलें व श्री. रांगणेकरांवर साधकबाधक टीकेचें समरांगण निर्माण केलें.

चिवडा हें जसें एक चटोर खाद्य आहे तसेंच तें आवडायला-खायला व तयार करायलाही-एक प्रकारची धावती उडती कलंदरी वृत्ति लागते. या वकाल वृत्तीला थंडपणा मानवत नाही. श्रीपाद कृष्णांना द्रष्टे कुणी ठरविल्याचें माहीत नाही. पण त्यांनी 'पोहे' म्हणून जो माल निर्माण केला त्यांत खामगांवच्या पुढील साहित्याची सूचना आहे. 'चिवडा-साहित्य' निर्माण करायला वर्तमानपत्राच्या चावडीसारखी खरपूस जागा कोणती ? आश्चर्य हें आहे की श्रीपाद कृष्णांनंतर तसें विपुल साहित्य येथे कुण्या एका व्यक्तीनें निर्माण केलें नाही. आणि जे सामाजिक साहित्य जीव धरून राहिलें तें सारें वर्तमानपत्र रूपानें. येथे जास्तींत जास्त टिकलेलें व गाजलेलें पत्र म्हणजे 'निदान'. 'निदान'चें संस्थापक व संपादक श्री. एकबोटे हेच येथील साहित्य संमेलनाचे स्वागत-अध्यक्ष आहेत. श्री. एकबोटे हे नांवाने 'एकबोटे' असले तरी अनेक हातांचें सामर्थ्य त्यांचे ठिकाणीं आहे. या त्यांच्या 'एकबोटी' पण 'अनेक हाती' सामर्थ्यामुळेच कोणत्याहि संस्थेच्या कार्याचें पान त्यांच्याशिवाय हालत नाही. 'अहिंसाच कां ?' 'डॉ. पारसनीस' वगैरे पुस्तकें त्यांनी लिहिलीं आहेत. 'समाचार' हें येथील दुसरें पत्र. या धावत्या वकाल वृत्तीच्या नेमका विरुद्ध असा दुसरा वर्ग म्हणजे कवींचा. प्रत्येक जण मनांतल्या मनांत कवि असतो ही अतिशयोक्ति बाजूला ठेवून जरी पाहिलें तरी ज्यांनी आपलें मन उघडून दाखविलें आहे तेहि येथे बहुसंख्येने कवि या सदरांतच मोडतात. कर्मप्रमाणेच कवींतही नित्य व नैमित्तिक असे दोन भाग पाडले तर नित्यापेक्षा येथे नैमित्तिक कवी अधिक आढळतील. नैमित्तिक दोन अर्थांनी. एक म्हणजे लग्न-मुंजीसारख्या कांही निमित्ताने जे काव्य लिहितात ते व दुसरे म्हणजे ज्यांचें काव्य कांही निमित्ताने लोकांपुढे येतें ते.

या नैमित्तिक साहित्यांतील पहिल्या वर्गाची नोंद अर्थातच शक्य नाही. दुसऱ्या वर्गातील लोकांनी सामुदायिक साहित्यनिर्मितीचा जो प्रयत्न केला तो जीवनविकास मंडळाच्या हस्तलिखित मासिकाने जनते-

पुढे आणला. जीवनविकास मंडळाची प्रेरणा जबर. त्यांनी चालविलेली नवरात्रव्याख्यानमाला प्रसिद्ध आहे. दुसरेंही एक हस्तलिखित श्री. खानोले यांनी प्रसिद्ध केलें आहे. शाळांतून निघणारीं किरण, नवजागरण वगैरे हस्तलिखितें वेगळींच. सुट्या कवींमध्ये श्री. अडावदकर, श्री. नाना महाजन, श्री. राजा जोशी वगैरे मंडळींचा समावेश करायला हवा. सामुदायिक वाङ्मयवाचन करणारी आणखी एक संस्था म्हणजे ज्ञानोपासक मंडळ ही होय. श्री. गर्गे, श्री. गोसावी, श्री. क्षीरसागर वगैरे मंडळींनी ही संस्था चालविली आहे. येथील आर्य-समाजाप्रमाणेच ही संस्था कधी वाङ्मय तर कधी तत्त्वज्ञान अशा दोन्ही विभागांत संचार करीत असते. श्री. क्षीरसागरांचा अप्रसिद्ध निबंधसंभारहि मोठा आहे. येथील कॉलेजमध्ये नव्यानेच आलेले श्री. डावरे हे आपल्या 'अल्‌मिनार' या लघुकथासंग्रहाने अनेकांच्या परिचयाचे असतील. श्री. उर्ध्वरेषे यांचे किर्लोस्करमध्ये आलेले लेख बहुतेकांनी वाचले असतीलच. श्री. राहुडकर या कॉलेजमध्ये होते तेव्हापासूनच उद्यम मासिकांत लिहीत. या कालेजमध्ये असतांनाच श्री. हरिवल्लभ जोशी यांनी आपलें बहुतेक हिंदी लिखाण केलें. या लेखकाबरोबरच कांही बाललेखकांचा उल्लेख करावयास हवा. कै. बंडू (वसन्त पांडुरंग) हेडाऊ याच्या अपमृत्यूने एक होतकरू कवि नाहीसा झाला. त्याच्या वडिलांनी त्याच्या कवितांचें एक पुस्तकहि छापून प्रसिद्ध केलें आहे. कु. अनंत अडावदकर यानेहि गोष्टी लिहिण्याचा प्रयत्न निनाद मध्ये करून पाहिला आहे. कु. सरला जोशी इच्याहि कविता मुलांचें व इतर मासिकांत येतात. शिक्षकांपैकी श्री. केळकर हे अधूनमधून रहस्यकथा हाताळतात.

पण वर उल्लेखिलेल्या साहित्यिकांबरोबरच जर रावसाहेब गोरे व श्री. वि. भि. कोलते यांचा उल्लेख केला नाही तर गावांतील साहित्यवृत्त पूर्ण झालें असें म्हणतां येणार नाही. श्री. गोरे यांची अलंकारचंद्रिका व काव्यदोषदीपिका हीं दोन पुस्तकें अजूनहि मराठीच्या अभ्यासकाला मोलाचीं वाटतात. पण रावसाहेबांची खरी वाङ्मयसेवा म्हणजे त्यांनी श्री. कोलते यांच्या रूपाने निर्माण केलेल्या अभिजात वाङ्मयसेवक. कोलते यांची वाङ्मयसेवा इतकी विपुल व विविध आहे की तिचा उल्लेख या लहानग्या लेखांत करतां येणें शक्य नाही. खामगांवांत स्त्री–लेखिका नाहीत असा आरोप कुणी घेईल. पण तो योग्य नाही. कुण्याहि कां क्षेत्रांत होईना पण 'रीत' लावणें हाच वैदर्भीय स्त्रियांचा बाणा होता व आहे. कधी काळीं जी 'वैदर्भीय रीती' प्रचारांत आली ती या विदर्भांतील स्त्रियांच्या रूप–माधुर्यादिगुणांवरूनच होय, असें म्हणावयाला हरकत नाही. ते सारे गुण कायम असतां या स्त्रिया लिहावयास कशाला जातील ? 'वाङ्मय' हा शब्द अक्षरशः विचारांत घेतल्यास वक्तृत्वाची अमोघ देणगी असलेल्या संत श्री. पांचले-गांवकर महाराज यांचाहि येथे उल्लेख करावा लागेल. तसेंच 'वाङ्मयांत' शब्दप्रतिमांप्रमाणेच जर चित्र प्रतिमांचा समावेश करतां येत असेल तर श्री. पंधे गुरुजी यांचाहि मोठ्या मानाने येथे उल्लेख करावा लागेल. 'चित्रकाव्या'ला साहित्यांत तात्त्विक अर्थ कांहीहि असो पण पंधेगुरुजींनी जीं 'काव्यात्मक' चित्रें काढलीं आहेत त्यांमुळे अनेकांना काव्यस्फूर्ति सहज लाभेल,–नव्हे त्यांच्या रूपाने खामगांवांत, काव्य चालतें बोलतें होऊन वावरतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही.

गलेलठ्ठ पहेलवानाने तुरपाईचे कपडे शिवणें व एखाद्या काडीबहाद्दराने हमाली करणें या दोन घटनांचा उल्लेख करून कार्लाईलने आपली जागा चुकलेल्या माण-सांचें दुर्दैव जगापुढे मांडलें आहे. वृत्तीने साहित्यिक पण पेशा चुकलेल्या कितीतरी व्यक्ती खामगांवांत दाखवितां येतील. नाटकाचे दर्दी श्री. बापूराव इंगळे हे येथे म्युन्सिपल सेक्रेटरी आहेत आणि विनोदी वक्तव्यासाठी श्रीपाद कृष्णांनीहि ज्यांची पाठ थोपटावी ते श्री. मयेकर फक्त क्रिकेट खेळूनच आपल्या खेळाडू वृत्तीला वाव देऊं शकतात.

हें उपेक्षितांचें अंतरंग पाहाण्यासाठी अधिक खोलांत न शिरणेंच बरें !

वाकाटकांच्या राजधान्या

प्रा. वा. वि. मिराशी

'युगवाणी'च्या गेल्या ऑक्टोबरच्या अंकांत श्री. सदाशिवराव काकडे यांनी 'वाकाटकांच्या राजधानीचीं शहरें' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला आहे. चांद्याचे श्री. अ. ज. राजूरकर यांनीहि याच विषयावर गेल्या जुलै महिन्यांत मध्यप्रदेश संशोधन मंडळांत आपला लेख वाचला होता. दोन्ही लेखांतील प्रमाणें, विवेचन व निगमन हीं एकाच प्रकारचीं आहेत. त्यामुळे 'हें संशोधन कोणाचें ?' असा प्रश्न मंडळाच्या कांही सभासदांच्या मनांत उत्पन्न झाला. त्या प्रश्नाशीं आपणांस कांही कर्तव्य नाही. पण आपल्या लेखाच्या शेवटीं श्री. काकडे यांनी 'नन्दोरी आणि वरोरा, हीं वाकाटकांच्या राजधानीचीं शहरें होत याविषयी आम्ही दिलेल्या कारणांच्या युक्तायुक्ततेबद्दल विचार व्हावा' अशी विनंती केली असल्यामुळे या विषयावर अद्ययावत् उपलब्ध साधनांच्या साहाय्याने थोडक्यांत लिहावयाचें आहे. श्री. काकडे यांनी नन्दिवर्धन व प्रवरपुर या दोन राजधानींच्या स्थलनिश्चयाविषयी लिहिलें आहे. याशिवाय पुरिका, चनका, पद्मपुर व वत्सगुल्म अशाहि वाकाटकांच्या राजधान्या होत्या, पण त्यांविषयी चर्चा न करतां उपरिनिर्दिष्ट दोन राजधान्यांविषयीच प्रस्तुत लेखांत ऊहापोह केला आहे.

वाकाटकांच्या राजधान्यांविषयी थोडीबहुत माहिती अलीकडेच उपलब्ध झाली आहे. सुमारें वीस वर्षांपूर्वीपर्यंत नन्दिवर्धनाचा उल्लेख एकाच प्रभावती-गुप्तेच्या पुण्यास सापडलेल्या-ताम्रपटांत* आला होता. त्यामुळे नन्दिवर्धन हें वाकाटकांच्या राजधानीचें शहर असावें अशी कल्पना त्या ताम्रपटाचे संपादक कै. प्रा. का. वा. पाठक व कै. रा. ब. का. ना. दीक्षित यांस सुचली नाही. त्यांनी त्या ताम्रपटाच्या आरंभीं आलेल्या 'नन्दिवर्धनात्' या पदाचा अर्थ 'प्रभावतीगुप्तेचा नन्दिवर्धनीं मुक्काम असतांना' असा केला आहे. या नन्दिवर्धनाचा स्थलनिश्चय करतांना त्यांनी नन्दिवर्धन हें रामटेकजवळचें नगरधन होय ह्या कै. रा. ब. हिरालाल यांच्या मताचा अनुवाद केला आहे. त्यानंतर गेल्या पंधरावीस वर्षांत प्रभावती गुप्तेचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याचे आठ ताम्रपट जांब, बेलोरा (दोन), इंदूर, तिरोडी, वडगांव, पट्टन व पाटणा म्युझियम् येथें सापडले आहेत. हे सर्व ताम्रपट मूळचे आपल्या मध्यप्रदेशांतीलच आहेत. यांपैकी बेलोऱ्याचा एक ताम्रपट आणि इंदूर व पाटणा म्यूझियम्चे ताम्रपट हे अपूर्ण असल्याने त्यांत जेथून ते दिले होते त्या स्थलांचा निर्देश नाही. बाकीच्या ताम्रपटांपैकी जांबचा ताम्रपट व बेलोऱ्याचा दुसरा ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाने नन्दिवर्धनाहून दिले होते. बेलोऱ्याचा हा ताम्रपटहि अपूर्ण असल्याने त्यांत प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या वर्षांचा उल्लेख नाही. पण जांबचा ताम्रपट द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या वर्षी दिला होता असा त्यांत निर्देश आहे. याप्रमाणें नन्दिवर्धनाचा उल्लेख वाकाटकांच्या नन्दि ताम्रपटांत आला आहे.* नन्दिवर्धन या स्थलनामाबरोबर 'वासकात्' 'स्थानात्' या सारख्या पदांचा प्रयोग केला नाही. शिवाय यांपैकीं एक ताम्रपट प्रभावतीगुप्तेने स्वतः रीजंट असताना व दुसरा तिचा

* एपिग्राफिया इंडिका, पु. १५, पृ. ३९

* ए. इं., पु. २६, पृ. १५५.

मुलगा द्वितीय प्रवरसेन याने आपल्या कारकीर्दीच्या आरंभीं दिला होता. त्यावरून नन्दिवर्धन ही वाकाटकांची आरंभींची राजधानी होती असें प्रस्तुत लेखकास वाटलें व त्याने तें मत तेरा वर्षांपूर्वी तिरुपति येथे भरलेल्या प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनाकरिता पाठविलेल्या 'वाकाटकांच्या राजधान्या' या लेखांत प्रथम मांडलें.* प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या १८, १९, २३ व २७ या वर्षी दिलेल्या चम्मक, सिवनी, दुदिया व पट्टन या गावीं सापडलेल्या ताम्रपटांत आरंभीं 'प्रवरपुरांत' असा निर्देश आहे. त्यावरून त्याने आपल्या कारकीर्दीच्या १८ व्या वर्षापूर्वी केव्हा तरी आपल्या नांवें 'प्रवरपुर' नामक नगर स्थापून तेथे आपली राजधानी नेली होती असें दिसतें.

आता या राजधानीच्या नगरांचा शोध करूं. या बाबतींत प्रथमच हें सांगितलें पाहिजे की कोणत्याहि ताम्रपटांत किंवा शिलालेखांत राजधानीच्या चतुःसीमांचा उल्लेख नसतो. त्यामुळे राजधानीचा स्थलनिश्चय अवान्तर प्रमाणांवरून करावा लागतो. त्याकरिता नामसादृश्य, कोरीव लेखांतील व वाङ्मयांतील आनुषंगिक उल्लेख, पुरातन अवशेष इत्यादिकांवरून अनुमानें करावीं लागतात. या प्रमाणांचा उपयोग तारतम्याने केला पाहिजे हें उघड आहे.

नन्दिवर्धन—मध्यप्रदेशांतील नन्दिवर्धन या नगराचा उल्लेख अनेक ताम्रपटांत आला आहे. वाकाटकांच्या तीन ताम्रपटांचा निर्देश मागे केला आहेच. त्यानंतर बस्तर जिल्ह्यांत राज्य करणाऱ्या नलवंशी भवदत्तवर्मा नामक राजाने वाकाटक काळींच विदर्भाचा कांही भाग जिंकून नन्दिवर्धन येथेच आपली राजधानी स्थापिली होती. त्याचा ताम्रपट वऱ्हाडांत ऋद्धपुर येथे सापडला आहे.† तोहि नन्दिवर्धनाहूनच दिला होता. वाकाटकांनंतर इ. स. च्या सहाव्या शतकांत माहिष्मतीच्या कलचुरींचें साम्राज्य महाराष्ट्र, कोकण, गुजराथ, विदर्भ इत्यादि प्रदेशांवर पसरलें. त्यांचा मांडलिक राष्ट्रकूटवंशी स्वामिराज याचा एक ताम्रपट पांच वर्षांपूर्वी नगरधन येथे सापडला आहे तोहि नन्दिवर्धनावरूनच दिला होता.* त्यानंतर इ. स. च्या दहाव्या शतकांतील मालखेडच्या राष्ट्रकूटवंशी तृतीय कृष्णराजाचा ताम्रपट वर्धा जिल्ह्यांतील देवळी येथे सापडला आहे.† त्यांत दान दिलेलें तालापुरुपक हें गाव नागपुर–नन्दिवर्धन नामक विषयांत (जिल्ह्यांत) होतें असा उल्लेख आहे. याप्रमाणे एकंदर सहा ताम्रपटांत नन्दिवर्धनाचा उल्लेख आला आहे. या सर्वांचा साकल्याने विचार करून प्राचीन नन्दिवर्धनाचा स्थलनिश्चय केला पाहिजे.

वर निर्दिष्ट केलेल्या अनेक उल्लेखांवरून नन्दिवर्धन हें प्राचीन काळीं अत्यंत प्रसिद्ध शहर होतें यांत संशय नाही. वाकाटक, नल व राष्ट्रकूट या तीन वंशांतील राजांची राजधानी होण्याचें भाग्यहि त्यास लाभलें होतें. पण या नगराच्या चतुःसीमा यांपैकी एकाहि ताम्रपटांत दिलेल्या नाहीत. त्यामुळें त्याचा स्थलनिश्चय करण्यास त्यांचा उपयोग होत नाही. तृतीय कृष्णराजाच्या देवळी ताम्रपटांतील नागपुर–नन्दिवर्धनाचा उल्लेख मात्र या दृष्टीने फार उपयुक्त आहे. एकाच नांवाचीं अनेक गावें पुष्कळ ठिकाणीं आढळतात. म्हणून अशा जोडनांवांनी त्यांतील एका गावाचें ठिकाण तत्कालीं प्रसिद्ध असलेल्या त्याजवळच्या दुसऱ्या गावाचें नांव त्याला जोडून दाखविण्याचा पूर्वी प्रघात होता व तो अद्यापिहि आढळतो. उदाहरणार्थ, अकोला–बाळापूर या नांवाने अकोल्याजवळचें बाळापूर असा अर्थ विवक्षित आहे. या तऱ्हेचींच बार्शी–टाकळी, जळगांव–जामोद इत्यादि नांवें पहा. तेव्हा देवळी ताम्रपटांतील उल्लेखावरून नन्दिवर्धन हें नागपुराजवळ होतें असें अनुमान करण्यास हरकत नाही. पण हें नागपूर कोणतें? सध्याचें नागपूर जाटबा या गोंड राजाने वसविलें व तेथे आपला किल्ला बांधून त्यास बळकटी आणली अशी परंपरागत समजूत आहे. पण त्याने तरी हेंच ठिकाण कां पसंत केलें व नवीन नगराला आपल्या वंशाचें किंवा स्वतःचें नांव न देतां नागपूर हें नांव कां दिलें याची उपपत्ति लागत नाही. तेव्हा सध्या नागपूर आहे

* त्या परिषदेचें इतिवृत्त, (तिरुपति अधिवेशन) पृ. ४५५.

† ए. इं., पु. १९, पृ. १००.

* ए. इं., पु. २८, पृ. १

† ए. इं., पु. ५, पृ. १८८.

त्या ठिकाणीं त्याच नांवाचें प्राचीन शहर होतें व तेंच वरील गोंड राजाने आपला किल्ला बांधण्यास पसंत केलें असें अनुमान करण्यास हरकत नाही. नागपूरच्या आसमंतांत माहुरझरी वगैरे ठिकाणीं वाकाटककालीन मुद्रा सापडल्या आहेत, त्यावरून त्या काळीं नागपूर सभोवारच्या भागांत वस्ती होती यांत संशय नाही. नन्दिवर्धन नागपुराजवळ होतें असें देवळीच्या ताम्रपटावरून दिसत असल्यामुळे सध्याच्या नागपुराजवळच त्या स्थलाचा शोध केला पाहिजे हें उघड आहे.

प्राचीन नन्दिवर्धन सध्याच्या नागपुराजवळ वसलें होतें असें अनुमान होत असलें तरी हा स्थलनिश्चय पक्का झाला असें म्हणतां येणार नाही. त्याकरितां शक्य तर यापेक्षा सबळ पुरावा पुढे मांडला जावा अशी वाचकांची अपेक्षा असणार. सुदैवाने तसा पुरावा देवळीच्या ताम्रपटांतच उपलब्ध आहे. त्या ताम्रपटाने दिलेल्या 'नागपुरनन्दिवर्धन विषयान्तर्गत' तालापुरुषक नामक गावाच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे दिल्या आहेत— पूर्वेस मादाट ढिढर ग्राम, दक्षिणेस कन्हान नदी, पश्चिमेस मोहमग्राम व उत्तरेस वध्रीरग्राम. हा ताम्रपट कै. रामकृष्णपंत भांडारकरांनी प्रकाशित केला आहे. त्यांतील लेखांत मोहमग्राम हें नागपूरपासून ५० मैलांवरचें छिंदवाडा जिल्ह्यांतील मोहगांव व वध्रीर हें नागपूरजवळचें बर्डी (सीतावर्डी) असावें असें त्यांनी म्हटलें आहे. पण हीं गांवें एकमेकांपासून ५० मैलांच्या अंतरावर असल्याने तीं एकाच गावाच्या चतुःसीमा दाखविण्याकरिता निर्दिष्ट केलेलीं असणें शक्य नाही. या विषयावर प्रस्तुत लेखकाने अठरा वर्षांपूर्वी नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल मध्ये एक टिप्पण लिहिलें होतें.* त्यांत दाखविलें होतें की ताम्रपटांत उल्लेखिलेली कन्हान नदी ही सध्याच्या नागपूरजवळची कन्हान असल्याने तिच्या उत्तर तीराजवळ वरील गावांचा शोध केला पाहिजे. नकाशावरून नागपूर जिल्ह्यांतच अशीं दोन गावें आढळतात. नागपूरच्या उत्तरेस सुमारें वीस मैलांवरचें मोहगांव हें प्राचीन मोहमग्राम असावें. कन्हान नदी या गावाच्या दक्षिणेस तीनचार मैलांवर वाहते. मोहगावच्या ईशान्येस पेंध्री नांवाचें गाव दिसतें तें प्राचीन वध्रीर असावें. बाकीचीं गावें मात्र सध्या नकाशांत दिसत नाहीत.

देवळी ताम्रपटांतील कन्हान नदीच्या स्पष्ट उल्लेखावरून नागपूर व नन्दिवर्धन हीं दोन्ही प्राचीन शहरें सध्याचें नागपूर आहे त्या भागांतच होतीं यांत संशय नाही. नागपूरजवळ सध्या नन्दिवर्धन आढळत नाही. पण नागपूरजवळच्या नगरधन गावाचें पूर्वीचें नांव नन्दिवर्धनच होतें असें तेथील लोक सांगतात. किंबहुना इंग्रजी अमदानींत रामटेकला महत्त्व येऊन तें तहसिलीचें ठिकाण होईपर्यंत नन्दिवर्धन हेंच या भागांतील मुख्य गाव होतें असें रामटेकच्या कांही वृद्ध गृहस्थांनी आम्हांस सांगितलें. नगरधनचें प्राचीन नांव नन्दिवर्धन होतें असें क्रॅडॉकच्या सन १८९५ च्या सेटलमेंट रिपोर्टमध्यें (पृ १५) म्हटलें आहे. या गावाचें नगरधन हें नांव नन्दिवर्धन या प्राचीन नामाशीं जुळत नसलें तरी तेंच प्राचीन नन्दिवर्धन होय असें इतरही कांही प्रमाणांवरून दाखवितां येतें. तीं प्रमाणें—

(१) पुरातन काळापासून रामटेकची पुण्यक्षेत्र म्हणून प्रसिद्धि आहे. तेथील टेकडीवर, गावांत तसेंच त्याच्या चतुःसीमेंत अनेक लहान लहान तीर्थें व देवालयें होतीं. त्यांपैकी कांहींचा उल्लेख रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळांतील रामदेवराव यादवाच्या इ. स. च्या तेराव्या शतकांत कोरलेल्या शिलालेखांत आढळतो.* या तीर्थांचें वर्णन करण्याकरितां 'सिन्दूरगिरि माहात्म्य' नामक संस्कृत ग्रंथ प्राचीनकाळीं लिहिला होता. त्यांत 'समीपे नन्दिवर्धनम्' सिन्दूरगिरीच्या म्हणजे रामटेकच्या जवळच नन्दिवर्धन आहे असा नन्दिवर्धनाचा उल्लेख दोन तीन ठिकाणीं आला आहे व त्या नांवाच्या उत्पत्तीविषयी कथाहि दिली आहे. रामटेक जवळ नगरधनशिवाय 'नन्दिवर्धन' हें प्राचीन नांव असलेलें दुसरें गाव आढळत नाही.

(२) भोंसल्यांचा सुप्रसिद्ध मुत्सद्दी देवाजीपंत चोरघडे याच्या आश्रयास दूरदूरचे संस्कृत पंडित येत असत. त्यांपैकी एक मैथिल ब्राम्हण कृष्णदत्त याने 'पुरञ्जनचरित' नांवाचें संस्कृत नाटक रचलें होतें. त्याचा पहिला प्रयोग देवाजीपंताच्या वाड्यांत श्रीबालाजीच्या नवरात्राच्या महोत्सवप्रसंगीं झाला असें दिसतें.† संस्कृत नाटकाची अशी पद्धत आहे की

* नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल, नं. १, पृ. ३.

* सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. ११५.

† सरदेसाई स्मारक ग्रंथ, पृ. १४३

प्रस्तावनेंत सूत्रधार तें नाटक ज्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलें त्याचा उल्लेख करतो व नंतर स्वकालीन एखादा काल्पनिक प्रसंग वर्णन करून त्यायोगानें मुख्य नाटकांतील पहिल्या प्रवेशाशीं ह्याचा संबंध जोडून देतो व अशा रीतीनें त्या प्रवेशांतील पात्रांचा परिचय करून देतो. 'पुरज्जनचरितां'-तील प्रस्तावनाहि याच प्रकारची आहे. या नाटकाच्या आरंभीं देवाजीपंतांचें वर्णन करून त्याच्या येथील श्रीव्यंकटेश बालाजीच्या उत्सवप्रसंगीं हें नाटक दाखविलें जात आहे असें सूत्रधार सांगतो. तेव्हा नटी विचारते, 'मग विलंब कां ?'. त्यावर सूत्रधार म्हणतो, 'माझा गुणाकर नांवाचा मित्र व्यापाराकरिता नन्दिवर्धन नगराला आला आहे. पण तेथे कामकन्दला नामक एका स्त्रीच्या नादीं लागल्यामुळे त्याचें लक्ष दुसऱ्या कशांतहि लागत नाही. त्यामुळे मी चिंताग्रस्त झालों आहें.' त्यावर नटी उत्तर करते, 'आपल्या आज्ञेने मीच त्याला आपल्याजवळ घेऊन येतें. आपण चार गोष्टी सांगून ताळ्यावर आणावें.' तेव्हा सूत्रधार म्हणतो, 'मागे पुरज्जन राजा पुरज्जनीच्या आसक्तीमुळे झालेलें दुःख एका भगवद्भक्ताच्या बोधामृताने विसरला त्याप्रमाणे तुझ्या या आश्वासनाने मी चिंतामुक्त झालों आहें.' याप्रमाणे नाटककाराने पुढील प्रवेशांतील पात्र पुरज्जन राजा याचा उल्लेख करून प्रस्तावना संपविली आहे.

या प्रस्तावनेंतील उल्लेखावरून भोसल्यांच्या काळीं नन्दिवर्धन नामक गाव नागपूरजवळ होतें हें स्पष्ट दिसून येईल. हें गाव सध्याचें नगरधन हेंच होय. त्याचें नन्दिवर्धन हें प्राचीन नांव भोसल्यांच्या काळापर्यंत प्रचलित होतें यांत संशय नाही.

(३) नगरधन गावीं अनेक प्राचीन अवशेष आहेत. तेथील किल्ला व जुनीं मंदिरें त्याच्या पुरातन वैभवाची साक्ष देतात. तेथे खणतांना सापडलेल्या विटा मोठ्या आकाराच्या असून त्यावरून तें ठिकाण अत्यंत प्राचीन आहे असें स्पष्ट दिसतें. पांच वर्षांपूर्वी तेथे खणतांना राष्ट्रकूट वंशी स्वामिराजाचा कलचुरिसंवत् ३२२ (इ. स. ५७३) ताम्रपट सापडला होता. त्याचा उल्लेख मागे आला आहेच.

(४) नगरधन हेंच प्राचीन नन्दिवर्धन मानल्यास कालिदासाने आपल्या 'मेघदूतां'तील यक्षाच्या निवासस्थानाकरिता रामगिरि हें ठिकाण कां पसंत केलें याची उपपत्ति लावतां येते. नन्दिवर्धन हें वाकाटकांची आरंभींची राजधानी होतें हें मागे दाखविलें आहेच. द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्याने आपली मुलगी प्रभावतीगुप्ता ही वाकाटकनृपति द्वितीय रुद्रसेन यास दिली होती. या विवाहानंतर लौकरच ४–५ वर्षांनी रुद्रसेन वारला. तेव्हा त्याला दामोदरसेन व दिवाकरसेन ऊर्फ द्वितीय प्रवरसेन असे दोन मुलगे होते. त्यांपैकी दामोदरसेन या वडील मुलाच्या नांवें प्रभावतीगुप्ता राज्यकारभार पाहूं लागली. तिच्या मदतीकरितां द्वितीय चन्द्रगुप्ताने आपल्या दरबारचे अनुभवी मुत्सद्दी पाठविले होते असें दिसतें. त्या काळीं वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें प्रस्थ होतें हें प्रभावतीगुप्तेच्या ताम्रपटांवरून दिसतें. कारण या ताम्रपटांत आरंभीं वाकाटकांची वंशावळ नसून गुप्तांचीच वंशावळ दिली आहे. असो. या मुत्सद्द्याबरोबर कालिदासहि विदर्भांत आला असावा. द्वितीय प्रवरसेनाने लिहिलेलें सेतुबंध नामक प्राकृत काव्य कालिदासाने महाराजाधिराज विक्रमादित्याच्या आज्ञेने रचलें अशी आख्यायिका त्या काव्याच्या एका टीकाकाराने उद्धृत केली आहे. कालिदासाने स्वतः हें काव्य रचलें नसलें तरी प्रवरसेनाला तें रचण्यांत मदत केली असावी व त्याकरितां कालिदासाचा मुक्काम नन्दिवर्धनास कांही काळ झाला असावा. वाकाटक राजे सामान्यतः शिवोपासक होते. पण याला द्वितीय रुद्रसेन हा अपवाद होता. भगवान् चक्रपाणीच्या (विष्णूच्या) प्रसादाने त्याला ऐश्वर्य प्राप्त झालें असें त्याचें वर्णन वाकाटकांच्या ताम्रपटांत आलें आहे. रुद्रसेनाच्या विष्णूपासकत्वाचें कारण त्याची पत्नी प्रभावती गुप्ता ही होय. ती आपल्या पित्याप्रमाणे विष्णूपासक होती. तिने आपला ऋद्धपूरचा ताम्रपट रामगिरीवर श्रीरामचंद्राच्या पादुकांजवळ (रामगिरिस्वामिनः प्रादमूलात्) दिला होता. ही रामगिरि म्हणजे रामटेक हें मी इतरत्र दाखविलें आहे.* रामगिरि नन्दिवर्धनापासून ४–५ मैलांवर असल्याने कालिदास त्या ठिकाणीं वरचेवर जात असावा. अशा एका प्रसंगीं त्यास

* सह्याद्रि, एप्रील, १९४४.

अनुक्रमणिका

'मेघदूता'ची कल्पना सुचलेली दिसते. नगरधन हें प्राचीन नन्दिवर्धन मानल्यास कालिदासानें विदर्भातील रामगिरि हा 'मेघदूतां'तील यक्षाचें निवासस्थान म्हणून कां निवडला याची उपपत्ति याप्रमाणें लावतां येते.

वरील विवेचनावरून नगरधन हेंच प्राचीन नन्दिवर्धन होय याविषयी वाचकांची खात्री पटेल अशी आम्हांस आशा आहे.

आता श्री. काकडे यांच्या मताचा विचार करूं. त्यांनी चांदा जिल्ह्यांतील वरोडा गावापासून चार मैलांवर असलेलें नंदोरी हें गाव प्राचीन नन्दिवर्धन असें म्हटलें आहे व त्याला खालील प्रमाणें दिलीं आहेत–

(१) नंदोरीचें प्राचीन नांव नन्दपुरी असलें पाहिजे. नन्दिवर्धन हें नांव सामान्य लोकांच्या दृष्टीने उच्चारसुलभ नसल्याने त्या गावाला सामान्य व्यवहारांत नन्दपुरी म्हणत असतील.

(२) या गावांत एक फार जुनें घराणें असून त्याचें नांव राजपुरोहित आहे.

(३) नन्दपुरी गाव पूर्वी फार मोठा असावा. वाकाटककाळीं राजधानी हलविल्यामुळे लोक गांव सोडून गेल्यावर दोन टोकांना थोडी थोडी वस्ती राहिली. त्यांना 'छोटी नन्दोरी' व 'मोठी नन्दोरी' अशी नांवें पडलीं असावीं.

(४) नन्दोरीच्या परिसरांत हिंडणाऱ्याला त्या ठिकाणीं पूर्वी फार मोठें शहर असल्याची तत्काळ खात्री पटते.

या प्रमाणांचें परीक्षण केल्यास तीं नन्दोरी हीच पूर्वीचें नन्दिवर्धन असें सिद्ध करण्यास पुरेशी वाटत नाहीत. नन्दिवर्धन हें नांव नन्दपुरी किंवा नन्दोरी या नांवांपेक्षा उच्चारास जास्त कठीण आहे असें दिसत नाही. शिवाय नन्दिवर्धन नांवाचेंच गांव इंग्रजी अमलापर्यंत नागपूरजवळ अस्तित्वांत होतें हें मी वर दाखविलें आहे. नन्दोरीचे राजपुरोहित पूर्वी वाकाटक राजांचेच पुरोहित होते असें मानण्यास आधार नाही. शिवाय हें घराणें वाकाटक कालाइतकें प्राचीन आहे या गोष्टीवर विश्वास बसत नाही. वाकाटकांचा अस्त होऊन आता चौदाशें वर्षें झालीं. या प्रदीर्घ कालांत त्यांचें पुरोहित घराणें त्यांच्या पुरातन राजधानींत टिकून राहिलें असेल ही गोष्ट अगदी असंभवनीय वाटते. उदाहरणार्थ, ब्राह्मणास दिलेलीं दानें पहा. हीं दानें यावच्चन्द्रदिवाकरौ टिकावीं या हेतूनें दिलेलीं असत. 'भावी राजांनी आमच्या दानांत ढवळाढवळ करूं नये, कारण ज्यावेळीं जो राजा असेल त्याला या दानाचें पुण्य मिळेल' असें प्रत्येक ताम्रपटाच्या शेवटीं घातलेल्या शापाशीर्वादात्मक श्लोकांत आवर्जून सांगितलें असतें, तरीहि कालाच्या ओघांत दान दिलेलीं गावें व जमिनीच नव्हे तर त्यांचें ताम्रपटहि दुसऱ्या कोणाच्या तरी ताव्यांत गेलेले आढळतात, उदाहरणार्थ द्वितीय प्रवरसेनाचा वडगांवचा ताम्रपट घ्या.* त्या राजाने तो वाजसनेय शाखी द्विवेदी रुद्रार्य नामक ब्राह्मणास दिला होता. पण तो १९४२ सालीं एका महाराच्या घरीं दृष्टोत्पत्तीस आला. प्रभावतीगुप्तेचा वर्धा जिल्ह्यांतील ताम्रपट पुण्यास एका तांबटाला जुन्या भांड्यांच्या मोडींत मिळाला. तेव्हा नन्दोरीस सध्या एक राजपुरोहित नांवाचें घराणें विद्यमान आहे ही गोष्ट नन्दोरी ही पूर्वीचें नन्दिवर्धन हें सिद्ध करण्यास पुरेशी नाही. राजधानीच्या स्थलांतरामुळे 'छोटी नन्दोरी' व 'मोठी नन्दोरी' अशीं जवळजवळचीं दोन गावें अस्तित्वांत आलीं हें प्रमाणहि तसेंच निर्बल आहे. एकाच नांवाचीं दोन गावें जवळ जवळ असल्यास प्राचीन काळीं त्यांचा निर्देश त्यांच्या विस्ताराप्रमाणे 'लघु' व 'बृहत्' हे शब्द त्यांच्या नांवामागे लावून करण्याचा प्रघात होता. तोच अर्थ अद्यापि मराठींत 'छोटें' व 'मोठें' (फारशी, 'खुर्द' व 'बुद्रुक') अशा विशेषणांनी व्यक्त केला जातो. अशा प्रकारचीं गावें हिंदुस्थानांत सर्वत्र आढळतात. तीं प्राचीन राजधानीचें स्थलांतर केल्यामुळे अस्तित्वांत आलीं असें म्हणतां येत नाही. श्री. काकडे यांनी नन्दोरी गावाच्या प्राचीन अवशेषांचें सविस्तर वर्णन केलें नाही व मीहि तें गाव स्वतः पाहिलें नाही. त्यामुळे तें किती प्राचीन आहे हें सांगतां येत नाहीं.

प्रवरपुर—वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेनाच्या कारकीर्दीच्या १८ व्या वर्षानंतर दिलेल्या अनेक ताम्रपटांत ते प्रवरपुराहून दिल्याचा निर्देश असल्याने तें त्याचें राजधानीचें शहर होतें यांत संशय नाही. तसेंच त्याच्या मातुःश्रीचा एक व त्याचे स्वतःचेहि आरंभीचे

---

* ११ ए., इं; पु. २६, पृ. ७४.

दोन ताम्रपट नन्दिवर्धनाहूनच दिले असल्याने त्यानें नन्दिवर्धनास कांही काळ राज्य केल्यावर आपल्या नांवें प्रवरपुर नामक नगर स्थापलें व तेथे आपली राजधानी नेली हें उघड आहे. प्राचीन काळच्या अनेक राजांनी आपल्या नांवें नगरें स्थापून तेथे आपली राजधानी केल्याचे उल्लेख कोरीव लेखांत येतात. उदाहरणार्थ शरभराजाचें शरभपुर, मानराजाचें मानपुर व रत्नदेवाने स्थापिलेलें रत्नपुर हीं राजधानीच्या शहरांचीं नांवें पहा.

प्रवरपुर हें द्वितीय प्रवरसेनाच्या राजधानीचें शहर होतें हें माहीत झालें तरी त्याचें ठिकाण निश्चित झालें नव्हतें. सन १९३३ मध्ये कै. रा. ब. का. ना. दीक्षित हे या प्रदेशांतील उत्खननार्ह प्राचीन स्थलांची पाहणी करण्याकरितां या प्रदेशांत आले होते. त्यांनी पवनार गाव व तेथील किल्ला वगैरे पाहून तेंच प्राचीन प्रवरपुर असावें असें आपलें मत प्रदर्शित केलें होतें. पण त्याला उपोद्बलक असा पुरावा त्यांना त्यावेळीं देतां आला नव्हता. त्यानंतर धाम नदीच्या काठीं श्री विनोबांचा आश्रम आहे त्या ठिकाणीं खणतांना कांही प्राचीन मूर्ति सापडल्या. त्यांपैकी दोन मूर्ति बऱ्याच शाबूत असल्याने श्री विनोबांनी त्यांच्याकरता कुटी बांधून त्यांत त्या ठेवल्या आहेत. त्या सापडून कित्येक वर्षें झालीं तरी त्या कोणी पुराणवस्तुसंशोधकाने पाहिल्या नसल्याने त्यांचा काल व महत्त्व हीं माहीत झालीं नव्हतीं. सन १९४९ सालीं मी अमरावतीस असतांना त्या मूर्ति पाहण्याचा योग आला. त्या व तेथील इतर मूर्ति पाहतांच त्या गुप्तवाकाटककालीन असाव्यात असें माझें मत झालें. पुढे महिन्याभराने नोव्हेंबरमध्ये मुंबईत भरलेल्या प्राच्यविद्यापरिषदेच्या अधिवेशनांत मी त्यांचे फोटो अनेक प्राचीन शिल्पशास्त्रज्ञांना दाखविले. त्या सर्वांचें मत त्या मूर्ति इ. स. च्या पांचव्या शतकाइतक्या प्राचीन असाव्या असें पडलें.* त्यानंतर आणखीहि कांही शिल्पें त्या ठिकाणीं सापडलीं आहेत. त्यांपैकी बहुतेक शिल्पें रामायणांतील दशरथनिधन, भरतभेट, वालिवध इत्यादि प्रसंगांचीं दिसतात. त्यांवरून पवनारला सध्या श्री. विनोबांचा आश्रम आहे त्या जागीं पूर्वी श्रीरामचंद्राचें उत्तुंग देवालय होतें यांत संशय नाहीं. पवनार हें प्राचीन प्रवरपूर मानल्यास हें देवालय इ. स. च्या पांचव्या शतकांत तेथे कां बांधलें गेलें याची उपपत्ति लावतां येते. मागे उल्लेखिलेल्या ऋद्धपुरच्या ताम्रपटावरून वाकाटकराज्ञी प्रभावती गुप्ता ही रामोपासक होती असें स्पष्ट दिसतें. नन्दिवर्धनाहून राजधानी प्रवरपुरास आणल्यावर प्रवरसेनाने आपल्या मातेचें इष्टदैवत श्रीरामचंद्र याचें देवालय आपल्या राजधानींत बांधलें असावें.

प्रवरसेनाच्या राजधानीचें नांव ह्याच्या ताम्रपटांत प्रवरपुर असें येतें. त्याशीं समानार्थक असें 'प्रवरनगर' हें नांवहि प्रचारांत असणें असंभवनीय नाही. कालान्तराने प्रवरनगराचें पवनार असें रूप झालें असावें. या व्युत्पत्तीवर स्थलनामांच्या शेवटीं येणाऱ्या 'नगर'शब्दाचें मराठींत 'नेर' असें रूप होतें (उदाहरणार्थ, पिंपळनेर) असा आक्षेप संभवतो. पण 'नगर' याचें 'नार' असेंहि रूप झाल्याचीं स्थलनामें दुर्मिळ नाहीत. उदाहरणार्थ, वऱ्हाडांतील 'लोणार' हें नांव घ्या. तें लवणनगराचें अपभ्रष्ट रूप मानण्यांत येतें. 'पवनार' हें स्थलनामहि याच प्रकाराने बनलें असावें.

नन्दिवर्धनाप्रमाणे पवनारचेंहि महत्त्व भोसल्यांच्या काळापर्यंत टिकून होतें. तेथे मध्ययुगीन अनेक शिल्पें सापडलीं आहेत. त्यामध्ये मगनवाडींतील संग्रहालयांत ठेवलेल्या श्रीविष्णूच्या मूर्तीचें कोरीव काम प्रेक्षणीय आहे. मुसलमानी अमदानींत दिल्लीच्या बादशहाचा फौजदार पवनारला राहत असे आणि देवगड व चांदा येथील गोंड राजांकडून बादशहाची खंडणी वसूल करीत असे. मराठ्यांच्या अमदानींत पवनार हें परगण्याचें मुख्य ठिकाण झालें. तेथे एक कमाविसदार राहत असे.

वरील प्रमाणांवरून पवनार हें प्राचीन प्रवरनगर किंवा प्रवरपुर होय असें वाचकांचेंहि मत होईल अशी आशा आहे. पवनारला उत्खनन झाल्यास यापेक्षाहि बलवत्तर पुरावा मिळण्याचा संभव आहे.

आता श्री. काकडे यांच्या मताचा विचार करूं. त्यांचें असें म्हणणें आहे की प्रवरपुर हें सध्याचें चांदा

* पोतदार सन्मान ग्रंथ, मराठीविभाग (पृ. १–८) यामध्ये यांचें सविस्तर वर्णन व फोटो पहा.

अनुक्रमणिका

जिल्ह्यांतील वरोरा असावें. याला त्यांनी पुढील प्रमाणें दिलीं आहेत.

(१) वाकाटकांची राजसत्ता नष्ट झाल्यावर प्रवरपुर हें राजधानीचें शहर राहिलें नाही. तेव्हा त्याच्या मोठेपणाचें निदर्शक 'प्र' गाळलें गेलें व लोक त्याला 'वरपुर' म्हणूं लागले. वरपुर याचें अपभ्रष्ट रूप वरोरा होय.

(२) राजधानीकरिता नवीन शहर वसविलें तर तें जुन्या राजधानीपासून चार सहा मैलांच्या अंतरावरच वसविलें जाईल. वरोरा हें नंदोरी (प्राचीन नन्दिवर्धना) पासून चार मैलांचे अंतरावर आहे.

हीं प्रमाणेंहि निर्णायक वाटत नाहीत. प्रवरपुर हें प्रवरसेनाने वसविलेलें नगर. त्याचा अर्थ प्रकृष्ट किंवा मोठें नगर असा केव्हाहि नव्हता. तेव्हा मोठेपणाचा निदर्शक 'प्र' वाकाटकांच्या काळानंतर गाळला गेला असावा हें अनुमान मनाला पटत नाही. 'वरपुर' यापासून 'वरोर' असें स्थलनाम होणें शक्य आहे. पण नन्दोरीजवळच्या या गावाचें खरें नांव कोणते ? 'वरोरा' की 'वरोडा'? श्री. काकडे यांच्या मुद्रित लेखांत दोन्ही नांवें आलीं आहेत पण त्या गावाचें 'वरोडा' हेंच नांव प्रचारांत आहे. व त्याच नांवाने हें गाव श्री. या. मा. काळे यांच्या वऱ्हाडच्या इतिहासांत दिलें आहे. इंग्रजींतील उच्चारपद्धतीप्रमाणे 'वरोडा' याचें 'वरोरा' असें इंग्रजींत रूप बनलें व तें अलीकडे प्रचारांत येऊं लागलें होतें. या ग्रामनामाची व्युत्पत्ति लावावयाची तर त्याचें शुद्ध मराठी रूप वरोडा हेंच घेतलें पाहिजे. पण 'वरोडा' हें रूप 'वरपुर' यापासून साधणें कठीण आहे.

राजधानीचें नवीन नगर जुन्या नगराच्या जवळच चार सहा मैलांवर असलें पाहिजे असें नाही. उदाहरणार्थ, राष्ट्रकूटांची प्राचीन राजधानी मयूरखंडी हिचा उल्लेख तृतीय गोविंदाच्या अनेक ताम्रपटांत आढळतो. ती नाशिकजवळचें मोरखंड होय असें कांही संशोधकांचें मत आहे. तें मान्य न केलें तरी ती उत्तर महाराष्ट्रांतच वेरूळच्या आसपास कोठे तरी असली पाहिजे यांत संशय नाही. कारण या राष्ट्रकूट घराण्याचे आरंभीचे लेख या भागांतच सापडले आहेत. पुढें गोविंदाचा पुत्र प्रथम अमोघवर्ष याने आपली राजधानी हैदराबाद संस्थानच्या कानडी मुलुखांतील मान्यखेड (सध्याचें मालखेड) येथे नेली. वेरूळ व मालखेड या दोन गावांतील सरळ रेषेने अंतर दोनशें मैलांहून अधिक आहे. तेव्हा राजधानीचें नवीन शहर जुन्या शहराजवळच शोधलें पाहिजे असें म्हणतां येत नाही. शिवाय नन्दोरी हें नन्दिवर्धन मानतां येत नाही हें मागे सांगितलें आहेच.

नन्दिवर्धन व प्रवरपुर यांचा प्रस्तुत लेखांतील स्थलनिश्चय अगदी पक्का व अविचाल्य झाला असें आम्हांस म्हणावयाचें नाही. सध्या उपलब्ध असलेल्या प्रमाणांवरून हीं प्राचीन नगरें अनुक्रमें नगरधन व पवनार असण्याचा पुष्कळच संभव आहे, निदान नन्दोरी व वरोडा यांच्यापेक्षा तरी त्यांच्या बाबतींत बलवत्तर प्रमाणें दिसतात असें आम्हांस वाटतें.

अनुक्रमणिका

सुखसाधनांचें समायोजन

श्रीनिवास नारायण बनहट्टी

मानवी प्रगति म्हणजे साधनांचें विकसन व बहूभवन. मानवी मनाला जें सुख होतें तें इंद्रियांना त्यांचें त्यांचें खाद्य पुरविल्यामुळे, इंद्रियाची वासना ज्या ज्या पदार्थांवर जाते ते ते पदार्थ त्या त्या इंद्रियाला अधिकाधिक सुलभ करून देणें, तसे पदार्थ स्वेच्छेनुसार कृत्रिम रीतीनें निर्माण करणें आणि अगोदरच अस-लेल्या पदार्थांची इंद्रियांना सुखदायक अशी जुळणी करणें, हेंच आजवर संचित झालेल्या मानवी संस्कृतीचें सार म्हटलें असतां चालेल. पाहिजे असलेले पदार्थ मिळविण्याबरोबरच नको असलेले, म्हणजे इंद्रियांना दुःखदायक, असे पदार्थ नष्ट करण्यासाठी किंवा दूर लोटण्यासाठीहि मनुष्याची धडपड चाललेली असते. इंद्रियाची वासना ज्या पदार्थावर जाते त्याला विषय म्हणतात. तेव्हा मानवी संस्कृतीचें विधिनिषेधात्मक दोन्ही रीतींनी वर्णन करावयाचें झाल्यास विषयविस्तार आणि अविषयसंकोच असें करतां येईल.

प्रकाश हा डोळ्यांना सुखदायक, शरीराच्या सुखकारक हालचालींस साह्य करणारा आणि दुःखदायक हालचाली टाळण्यास मदत करणारा. म्हणून तो निस-र्गाच्या व्यवस्थेनुसार जेव्हा व जेथे मिळत नाही तेव्हा व तेथे देखील मिळावा यासाठी मनुष्याने धडपड सुरू केली. निसर्गांत दिसून येणाऱ्या आकस्मिक ज्वलनक्रिये-पासून प्रकाश मिळतो हें पाहून तसें ज्वलन स्वतःच्या नियंत्रणांत निर्माण करण्याची साधनांची धडपड सुरू झाली. या धडपडींतून ज्योतीचा दिवा निर्माण झाला. आभाळांत चमकणारी वीज पाहून ती अद्‌भुत प्रभा भूमितलावर स्वतःच्या नियंत्रणांत कशी उतरवितां येईल याविषयी प्रयत्न सुरू झाले. त्यांतून विजेचा दिवा निर्माण झाला. हा इतिहास तर अगदी ताजा आहे. पण इतक्यांतच या सुखसाधनाचा इतका विस्तार झाला आहे की ज्यांचें सर्व आयुष्य शहरांत गेलें आहे अशा आजच्या मुलांना तेलवातीच्या दिव्याची कल्पनाहि असत नाही. जिभेचें सुख अथवा लौल्य पुरविण्यासाठी जमिनीची मशागत व जनावरांची जोपासना करून अधिकाधिक रोचक पदार्थ मानवानें निर्माण केले व त्यांचीं नानाप्रकारचीं मिश्रणें अग्नीच्या साह्याने अथवा कच्च्या स्वरूपांत करून जिभेचे लळे पुरविले.

इंद्रियांच्या विषयोपभोगांतून कला निर्माण झाली. निसर्गांतले कांही विशिष्ट देखावे, कांही विशिष्ट रेखा व रंग आणि त्यांची जुळणी डोळ्यांना सुखदायक वाटते असें आढळून आल्यावर तसे देखावे, तशी रेखांची व रंगांची जुळणी स्वप्रयत्नाने निर्माण करण्याचा यत्न सुरू झाला. यांतून चित्रकला निर्माण झाली. शिल्पकले-च्या उद्भवाचाहि प्रकार तसाच. मनुष्याच्या गळ्यांतून निघणारे कांही सूर, आघात व त्यांची जुळणी कानांना आल्हाददायक वाटते असें आढळून आल्यानंतर तसे सूर, आघात व त्यांची जुळणी कृत्रिम रीतीनें निष्पादित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाला. त्यांतून तत (तारांचीं) घन (घुमटाकार, तबला वगैरे) आणि सुषिर (छिद्र-युक्त, अलगूज, बाजाची पेटी इ०) अशीं नानाप्रकारचीं वाद्यें निर्माण झालीं. मानवी स्वरालापांचें अनुकरण करणें हें त्यांचें ध्येय.

इंद्रियांचा संबंध मनाशीं असतो. इंद्रियांच्या विषयोपभोगामुळे जें सुख वा दुःख होतें तें मनाला होतें असें आपल्या तत्त्वज्ञांनी मानिलें आहे. सुखदुःखाची संवेदना मनाला विषयेंद्रियसंयोगापासून मिळूं शकते; पण मनाचा व्याप तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. स्मरण, मनन, कल्पन या केवळ स्वतःच्या व्यापारांतहि मनाला सुखानुभव येऊं शकतो. तसेंच सुताने स्वर्गास जावें त्याप्रमाणे मन हें विषयेंद्रियसंयोगाच्या स्थूल आधारावर स्वतःची भावनामय रचना करून त्यांतून आनंद निर्माण करूं शकतें. कलात्मक आनंद हा अशाच प्रकारचा आनंद होय. अमक्या गाण्याचे स्वर करुण आहेत, असें आपण म्हणतों, तेव्हा कारुण्य त्या स्वरालापांत नसतें. पूर्व संस्कारांमुळे त्या स्वरालापां-भोवती आपलें मन जें भावनाजाल निर्माण करतें त्यांत कारुण्य असतें. मनाला होणाऱ्या आनंदांत इंद्रिय-विषयसंयोगजन्य अंश जितका कमी तितका तो आनंद अधिक सूक्ष्म व अधिक उच्च दर्जाचा मानला जातो. मनुष्याच्या संस्कृतीचें उच्चनीचत्वहि याच मापानें आजमावलें जातें.

काव्यानंद, वाङ्मयानंद हा सर्व आनंदांत श्रेष्ठ मानला जातो आणि वाङ्मयकला ही सर्व कलांत शेखरीभूत मानली जाते याचें बीज हेंच आहे. वाङ्मय हें शब्दनिष्ठ असतें. आणि शब्द ही एक अशी अद्भुत व चमत्कारिक चीज आहे की तिला इंद्रियभोग्य विषयाचा आधार असून देखील तिचें स्वरूप मुख्यतया मानसिक आहे. शब्द हा उच्चाररूप असतो आणि उच्चार हा कर्णेंद्रियाचा विषय होय. पण तो उच्चार कानांनी ग्रहण केल्यावर त्यापासून अर्थाचें जें उद्भावन होतें तें सर्वस्वी मनाच्या व्यापारांमुळे होतें. हे मनोव्यापार स्मरण, तर्क, भावना इत्यादि स्वरूपाचे फार गुंतागुंतीचे असतात. हा सगळा भाषाशास्त्राचा विषय असल्यामुळे त्याचा येथे विस्तार करणें योग्य होणार नाही. पण उच्चाररूप स्थूल केंद्राभोवती अर्थाचें जें सूक्ष्म वलय निर्माण होतें तें अद्भुत मानसिक शक्तीमुळेच होतें एवढें येथे लक्षांत ठेवणें बस आहे. म्हणूनच वाङ्मयां-तील पदलालित्यामुळे होणारा आनंद जर सोडला तर त्यापासून होणारा बाकीचा सर्व आनंद सूक्ष्म मानसिक वृत्तींच्या उल्लासविलासांमुळे होतो. या आनंदाला ब्रम्हानंदसहोदर म्हटलें आहे तें यामुळेच.

मानवी प्रगति म्हणजे विषयांचा—सुखसाध-नांचा—विस्तार आणि अविषयांचा—दुःखसाधनांचा—संकोच असें मागे सांगितलें. या विस्तार संकोचाचीं दोन विशिष्ट स्वरूपें फार महत्त्वाचीं आहेत. त्यांचा येथे उल्लेख अवश्य केला पाहिजे. एक स्थिरीकरण आणि दुसरें अंतरनिवारण. इंद्रियांचे जे विषय क्षण-विनाशी असतात ते शास्त्रीय शोधांनी निर्माण केलेल्या साधनांच्या योगाने टिकाऊ स्वरूपांत स्थिर करून आपल्याला त्यांचा वाटेल तेव्हा उपभोग घेतां येईल अशी सोय करणें, म्हणजे स्थिरीकरण. मुखांतून उच्चारलेल्या शब्दांना कायम टिकविण्याचें साधन जी लिपि ती या स्थिरीकरणाचें अत्यंत प्रमुख उदाहरण होय. या साधनानें शेकडो, हजारों वर्षांपूर्वी निर्माण झालेले शब्द आज आपण वाचूं शकतों. मुद्रणकला, फोनोग्राफ इ० शोध हे स्थिरीकरणाविषयी मानवाच्या चाललेल्या प्रयत्नांचेच मोठमोठाले विजय होत. सुख-साधनांच्या विस्ताराचें दुसरें अंग जें अंतरनिवारण त्यांचीं उदाहरणें आगगाडी, विमान, तारायंत्र ध्वनिक्षे-पण इत्यादि होत हें सहज समजण्याजोगें आहे. हजारों मैलांवर उच्चारलेले शब्द व गाइलेलें गायन माझ्या रेडियोवर मी तत्क्षणीं ऐकूं शकतों ही अंतरनिवारणाची अद्भुत किमया होय.

वर वर्णिलेलें स्थिरीकरण हें देखील एकप्रकारचें अंतरनिवारण आहे असें म्हणतां येईल. स्थिरीकरणाच्या साधनांच्या योगानें कालकृत अंतर निवारण होतें; आगगाडी, तारायंत्र, रेडियो इत्यादिकांच्या योगानें स्थलकृत अंतर निवारण होतें.

सुखसाधनांच्या होत असलेल्या वाढीमुळे निर्भेळ सुख मिळतें असें मात्र नाही. सुखसाधनांच्या अफाट विस्तारामुळे दोन प्रकारचे प्रश्न उत्पन्न होतात; एक वैयक्तिक व दुसरा सामाजिक, सामाजिक प्रश्न वितरणा-संबंधीचा होय. आजपर्यंत तरी मानवजातीला असा अनुभव आला आहे की सुखसाधनांचें उत्पादन जरी अफाट प्रमाणांत होत असलें आणि सुखसाधनांमध्ये शास्त्रीय शोधांमुळे जरी घोडदौडीने प्रगति होत असली

तरी हीं सुखसाधनें सर्वांना समान प्रमाणांत, किंवा ज्याच्या त्याच्या इच्छेनुसार मिळतात असें नाही. कोणतेंच वाहन जेव्हा निर्माण झालें नव्हतें तेव्हा सर्वत्र लोक चालणारे असल्यामुळे माणसामाणसांत फरक नव्हता. पुढे चाकाचा शोध लागून गाड्या किंवा रथ निर्माण झाले तेव्हा कांही थोडेच लोक गाडींत बसणारे झाले व बाकीचे पादचारी राहिले; म्हणजे माणसामाणसांत वैषम्य निर्माण झालें. आजच्या सुधारणेच्या अवस्थेंत एकजण विमानाने जातो तर दहाजण मोटार बाळगून असतात; या दहाजणांच्या पाठीं शंभर जण पायचाकीवरून जाणारे तर हजारजण पायीं चालणारे असतात. असें वैषम्य हें सर्वच सुखसाधनांच्या बाबतींत आढळून येतें. कांहींच्या पुढ्यांत रोज तीन तीन तासांनी नानापरींचीं सुग्रास अन्नें नको म्हणेपर्यंत येऊन पडतात, तर कांही लोक कोरड्या भाकरीलाहि महाग झालेले असतात.

ही जी विषमता निर्माण होते ती कमी कशी करावी याचा गेलीं शेंदीडशें वर्षे फार जोरांत विचार चाललेला असून त्याजवर उपाय सांगणारे तत्त्वज्ञांचे दोन संप्रदाय मुख्यतया निर्माण झाले आहेत. एक संप्रदाय, ज्या सुखसाधनांमुळे विषमता निर्माण होते त्या साधनांचा त्याग करा आणि नैसर्गिक राहणीचा स्वीकार करा असें प्रतिपादन करतो. रस्किन, टॉलस्टॉय, गांधी, विनोबा हे या पंथाचे प्रमुख आचार्य होत. हा संप्रदाय सामाजिक समतेच्या उद्दिष्टांनी प्रेरित झाला असला तरी त्याबरोबरच त्याची बैठक बरीचशी आध्यात्मिक आहे. आणि ती भारतांतल्या पुरातन आत्मवादी तत्त्वज्ञांच्या विचारांशीं जुळती आहे.

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥

असें म्हणणारी गीता, किंवा

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।

असें घोषित करणारा मनु, यांचा दृष्टिकोण टॉलस्टॉय किंवा रस्किन यांच्या विचारसरणीहून फारसा भिन्न नाही. गांधीजींच्या मध्ये तर या सर्वांचा प्रमाणशीर सुंदर मिलाफ झालेला आहे.

अध्यात्माच्या बैठकीवर वैषम्याचा सामाजिक प्रश्न सोडवूं पाहणारा हा एक संप्रदाय; तर जडवादाच्या बैठकीवर समता प्रस्थापित करूं पाहणारा मार्क्सप्रभृति साम्यवाद्यांचा दुसरा संप्रदाय होय. सुखसाधनांचें सक्तीने समान वितरण केलें पाहिजे असें हा संप्रदाय म्हणतो. सुखसाधनांच्या विस्ताराला कांही मर्यादा घालावी असें हा चुकूनसुद्धा म्हणत नाही.

या दोन पंथांचें ओझरतें दिग्दर्शन करण्यापलीकडे येथे अधिक कांही करण्याचा मानस नाही. त्या विषयाचें खूप मंथन सर्वत्र चाललें आहे. सुखसाधनांच्या विस्तारामुळे जो वैयक्तिक प्रश्न उत्पन्न होतो त्याकडे विशेष रीतीने, लक्ष वेधण्याचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश आहे. कारण या संबंधांत फारसा विचार होतांना दिसत नाही. सुखसाधनांच्या उमाप वाढीमुळे त्या साधनांचा उपभोग घेणारीं इंद्रियेंच उपभोगाला अक्षम, दुबळीं किंवा बोथट होऊन जातात, तेव्हा सुखसाधनांचा उपभोग कसा व कोणत्या रीतीने घ्यावा असा प्रश्न उत्पन्न होतो. याच प्रश्नाची दुसरी बाजू अशी की अनेक प्रकारचीं सुखसाधनें जेव्हा एकाच प्रकारचा आनंद देण्यासाठी योजिलीं जातात, तेव्हा त्यांची परस्पर अतिव्याप्ति ही गोंधळ उत्पन्न करणारी, अतएव मानसिक आनंदाला विघातक ठरूं लागते.

(अपूर्ण)

कांही कविता

जीवनानन्द

बरस बरस हे श्याम सजल घन !
तृषार्त मी लघु क्षुद्र रजःकण

तूं उंचावर नभांत उन्नत
पायदळीं मी पथीं अधोगत
स्नेह अपेक्षी तुझा तरी पण.

प्रशान्त तूं चिरप्रसन्न पावन
मी संतापित दुर्भग दारुण
शीतल कर मम पीडित तनु-मन.

सदा सदय तूं रसमय सहृदय
शुष्क रुक्ष अति मी जड मृण्मय
दे मज तूं निज अन्तःप्रेरण

संजीवक तव प्राशुन अमृत
मृतवत चेतन होइल जागृत
हसेन पुलकित होउन मी तृण.

मोदें मजला हलूं डुलूं दे
अणुरेणू मम फुलूं खुलूं दे
करुं दे सेवन यथेच्छ जीवन

—भवानीशंकर श्री. पंडित

एक चरण येथे

एक चरण धूलींत–आणखी
दुसरा माझा तृणांकुरांत
असा चाललों थबकत नाचत
जगांत रमुनी दिगंतरांत !

एक चरण मृत्यूंत–आणखी
दुसरा हा जीवननृत्यांत
असा चाललों विचकत उसळत
मर्त्य मीच चिरकालांतात !

एक चरण येथे आणखी एक चरण तेथे
अशी मला तारेची कसरत नित्याची येते !

एक चरण मातींत—आणखी
दुसरा माझा अस्मानांत
असा चाललों चाल विलक्षण
बेतालांत नि मी तालांत !

–२–

एक चरण क्रांतींत–आणखी
दुसरा माझा उत्क्रांतींत
असा चाललों बदलत मी स्थित
गात मृत्युजीवनसंगीत !

एक चरण आद्यांत—आणखी
दुसरा माझा अनंततेंत
असाच नश्वर अमर चाललों
कालांतींतच अमरत्वांत !

एक चरण येथे आणखी एक चरण तेथे
असें मला नाचणें नवीनच नित्याचें येतें !

एक चरण भूमीवर—आणिक
दुसरा ब्रह्मांडाबाहेर
असा चाललों छोटा मोठा
साकार नि मी निराकार !

—या. मु. पाठक

देखावे !

बरवरचें वागणें
आणि हवेंत चालणें
कॅमेऱ्याच्या काचेसम
मन दुरून लावणें !

वरवरचें बोलणें
वरवरचें झाकणें
थोडें उघडें पडतां
पुढे करावीं कारणें !

वरवरचा संतोष
वरवरली सभ्यता
स्वत:लाच खाऊनिया
तट्ट फुगली अहंता !

वाऱ्यासम घटनांचे
नुसतेच हेलकावे
एकमेकांत गुंतले
अंतर्गत हेवेदावे !

चेहऱ्याचे रंग खोटे
बोळा घेऊन पुसावे
नख लावून फाडावे
वरवरले देखावे !

—मनोहर म. देशपांडे

शबनम

मुळि न आठवे केव्हां कोठे
शब्द कानि ये माझ्या 'शबनम'
अर्थ जयाचा अगदि न ठाउक
परी कुजबुजे अनेक वेळां अचूक मानस
शब्द तोच तो 'शबनम शबनम'
कधी सकाळीं ऊन गुलाबी
होत रम्यतर करित रम्यतम कांतावदना
वृंदावनासि वेता उजळा—
स्पर्शुन जातां झुळूक सहजच
अंगणांतल्या चांफ्यावरची
फूल चिमुकलें कधि गवताचें
थपापल्यागत झुकतां मागें—
पहिली तारा सान कोंवळी
नभांत येतां चोरपावलीं
मंद मनोहर रंग ढगांचे बघावयाला
मनांत कुजबुज 'शबनम शबनम'
अर्थ कळावा तर्क केवळ
या 'शबनम'चा कसा परी मज
वाळवंटिच्या तांड्यामधली
उंटावरची अरबी रमणी
थावी थकवा टपोर लोचनि तो कां 'शबनम?'
काबाची ती शिला शुभंकर झीज वावि जी
शत शत शत शत ओष्ठचुंबनीं
झीज काय ती सुचवी 'शबनम'
भोवतालचीं अश्रें उजळी
किंचित्‌शीं तो ईद–चंद्रमा ?
कुणी मौलवी प्राथित असतां एकांतांधि
'अल्ला! अल्ला!'
वातावरणीं भरे तेथल्या पवित्रता जो ?
असेलही वा,
समीप अगदी कृतांत दिसतो
नेत्रिं बिंबते अगतिकता जो,
आकाशींची शिला भयंकर
काळा काळा मेघ राक्षसी
वीज ज्यांतुनी उडी घेउनी
उमळुनि पाडी बांग-मनोरा
अभद्र घन तो,
ग्रहणीं भास्कर खिन्न अमंगल
पाडी छाया जी उद्यानीं,
रसुल वचनां अवमानी जो
पागल कोणी त्याची वाणी,

असो कांहिही,
पहा पुनरपि तथापि मानस करीत कुजबुज
'शबनम' 'शबनम'
येथे दिसतां
गुलाबकलिका— शीर्षावरती
बिंदु दवाचे !

—द. चिं. सोमण

सखी किंवा वैरीण

खीर आटीव दूधाची, नको टाकू मध्यें मीठ
कुंभ अमृत रसाचा, सांभाळला आहे नीट १
आंबा असे पिकलेला, अति रसाळ मधुर
लटकला झाडावरी, रंग तांबूस सुंदर २
आहे मस्कति डाळिंब, नाही अजून उललें
भृंग घजेना स्पर्शाया, फूल चाफ्याचें फूललें ३
नाही चिंतणार वैरी, तसें चिंती माझें मन
नसे पटली तुला का ? माझ्या हृदयाची खूण ४
तुझे माझे हितशत्रु, कांही उठविती लोकीं
सूर्यावर थुंकतांना, थुंकी पडे त्यांच्या मुखीं ५
शिमग्याची बोंबाबोंब, चाले दोन दिवसाची
वेळ जाईल रे वाया, आज घडी साधायाची ६
तुझ्यावर आजवरी, ठेविले मी पंचप्राण
कर सखी किंवा मला, तुझ्या जन्माची वैरीण ७

—सौ. सरस्वतीबाई सुभेदार

कवीचे डोळे (एक स्मृतिचित्र)

सदा विनोदी वृत्ति, नयनीं
काव्यसुरेची मधुर खुमारी
गुंगत डोलत अपुल्या तंद्रीं
कविरायाची येई स्वारी ॥१॥

आत्मियता कविचें हें लक्षण
तन्मयता कार्यात विलक्षण
साधे प्रेमळ परी न भोळे
आठवती मज कविचे डोळे ॥२॥

सहारांतल्या वाळवंटि ह्या
लहानशी फुलबाग सुरेख
शुष्क मनाला हिरवें ताजें
करिते जेथें शांति विराजे ॥३॥

शाळेचे ते कॉलेजाचे
गेले रे ते दिन जरि गेले !
प्रेमळ साधे परी न भोळे
आठवती मज कविचे डोळे ॥४॥

—जे. पी. आय. मोजेस

आठवण होतां तुझी

आठवण होतां तुझी
गात्रीं फुलतें चांदणें
उमलतात नक्षत्रें
नवे घालित उखाणे

आठवण होतां तुझी
खाली लवतें गगन
निळ्या सागर–लाटांत
दाटे रेशमी स्पंदन

आठवण होतां तुझी
रात्र भारावते धुंद
मंद वायूंत लहरे
तोच ओळखीचा छंद

आठवण होतां तुझी
फुलें लाजतीं मनांत
सळसळत वाहते
वीज हिरव्या पानांत

आठवण होतां तुझी
माड झुलती झुरती
तळीं हलत्या छायेंत
स्वप्नधारा किनारती

आठवण होतां तुझी
धरा विपते चंदेरी
थरारती अनंतांत
लाल जांभळ्या लहरी

—उ. रा. गिरी

अंकुर

गजर झाला
रेशमी स्वप्नांचा
धागा तुटला
शुक्राचा तारा
हसून लाडीक
देई इशारा
खुले केवडा
प्राजक्त घालतो
फुलांचा सडा
घुमूं लागला
सुगंध वायुचा
वाही दिशेला
प्रभात झाली
विरल्या स्मृतीस
चेतना आली
किरण खुळे
आपुल्या मायेने
धरा उजळे
साकार झालें
निराकारांतून
अंकुर आले.

—तुळशीराम काजे

दूर नगरीचे दिवे शोभने

दूर नगरीचे दिवे शोभने
घेई पाहुन लवलाही
तियेची सुषमा, नवलाई ।
रात्रीं लागीं तारापथि गे
बघ नक्षत्रें चमचमती
विद्युत्पथ हे अवनीवरती
तसे रात्रिला लखलखती
जणू स्पर्धती अंबरअवनी
नक्षत्रांच्या पुरी किती
नगरीनगरी लकाकती
फिक्या त्यापुढे अलका आणि
इंद्राची ती अमरावती ।

दूर नगरीचे दिवे शोभने
घेई पाहुन लवलाही
तयांची सुषमा, नवलाई ।
दीपमालिका नक्षत्रांच्या
नभीं उजळल्या झगझगणाऱ्या
तिथे तयांचें कार्य संपलें
नेत्र दिपविले बघणाऱ्यांचे.
कितीक घटका रात्र उतरली
कधी जाणते सांगायाचे.
परी तुम्हाला आणि अम्हाला
नयन मनोहर नक्षत्रांची
ग्रहगोलांची नी ताऱ्यांची
सुरम्य चित्रें देखाव्यांची,
आणि कशाचीं ?
जणू प्रदर्शनांतिल नित्य मांडली
प्रगूढ चित्रें चौकटीतलीं ।

तिथे त्यांचें कार्य संपलें.
दूर नगरीचे दिवे शोभने ।
दूर नगरीचे दिवे शोभने
मानवतेची अचाट करणी.
लाख विजेचे झोत रुपेरी नी चंदेरी
काचफुग्यांच्या मधून खुणवुन, मधून लचकुन
जणू सुचविती चला फिराया, चला भ्रमाया
अंधाराने हिरावलेले
चक्षु पुनरपि देती मिळवुन
आणि भ्रमविती आणि फिरविती
कुठे विलासी कुठे विरागी
थवे जनांचे इकडे तिकडे
दिनरातीचा अभेद करिती
दूर नगरीचे दिवे शोभने.

दूर नगरीचे दिवे शोभने
बहु उपकारी अनिकेतांना
पदपथ ज्यांना होय आसरा
फुलांखालती वसते दुनिया
अशा तयांना प्रकाश गहिरा
हाच आसरा हाच निवारा
आणि प्रकाशीं कुणी कुंथती,
आणि कण्हती
तिथे थुंकती तिथे भुंकती
वार्तालापीं गुंगुन जाती
प्रणयानंदी जगा विसरती
खुले जगाला विश्वप्रदर्शन ।
ह्या कार्यांना प्रकाश मोठा
बघ उपकारी कार्यरतांना,
दूर नगरीचे दिवे शोभने ।

विद्युन्मय त्या प्रकाशमार्गी
रात्रिंचर कुणि कुणि गुलहौशी
मानुन जीवन केवळ सोडत
परस्परांना करती सोबत
क्षणकाळाची, क्षणिक सुखाची,
दिवसाची परि झडतां नौबत
परत भेटिची ग्वाही देउन
मनांत पुरते समजुन उमजुन
स्वस्थ कुशीला नीज घेउनी
बसती पेंगत दिवसभराला
मानुन जीवन केवळ सोडत
दूर नगरीचे दिवे शोभने ।

दूर नगरीचे दिवे शोभने
तिथे विजेच्या अंध प्रकाशीं
अंत:करणें चाचपडूनी
नित्य शोधती परस्परांचे

प्रणयी प्रियकर.

अनुक्रमणिका

आणि रोजच्या घोटाळ्यांतुनि
घटावुनी गे नवी मोहनी
आणितसे गे नवनवलाई
त्यांना झापड.
त्या तंद्रींतुन दूर सारण्या
हवा विजेरी प्रकाश त्यांना
तूं मी प्रेमळ अंधारांत
वसवूं दुनिया स्वात्मसुखाची,
विश्वासाची
प्रेमाची जो माया पुरती
तुला मला ह्या काळोखांत
आणि ओढुन ठेवी बांधुन
तिची वानवा सजणे तेथें.
दूर नगरिचे दिवे शोभने ।

—मा. नि. गलगलीकर

हवा आजची वाइट आहे

कर्तृत्वाचा अभाव सारा
'परिस्थिती ही प्रतिकुल आहे,'
सत्य 'सुखाचा मार्ग कळेना'
वदती 'जगतीं दुःखच आहे.'
न ये झुंजतां जीवन समरीं
'शस्त्र आमुचें बोथट आहे,'
उडि न पोहचे मधु द्राक्षांना
वदती 'अतिशय अम्बट आहे.'
हाकतां न ये जीवन नौका—
भवसागर हा उथळच आहे.
थैं थैं नाचत घोंघावत ये
धुंद समीरण तया न साहे,
कृशतनु जर्जर अवघे वदती
"हवा आजची वाइट आहे"

—"शरश्चन्द्र"

प्रादेशिक गीत

(मूळ काश्मीरी भाषेंत)

लाल ई साल छह् प्यांल भरनावान
पोशन माल करनवान छह्
शाल मार गोशन छह् वथरावान
पोशन माल करनावान छह् ! १

दूर्यर यार सुन्द छुम वद नावान
बुक बुक आब जन त्रानान छह्
लुक पाम बदनह् जद करनावान,
पोशन माल करनावान छह् २

भजरै प्याठ छह् नजराह् त्रावान
बागह् कुन वछिथ रावान छह्
रोशिर नेराम नछे स्य पोवि वारवान,
पोशन माल करनावान छह् ३

जाह् धुम स्वर्गह् हेर करनावान
हूरन दूर कन ब हावान छह्
जाह् धुम स्नाकह् हेत मिल नावान
पोशन माल करनावान छह् ४

(मराठी गद्य अनुवाद)

माझा प्रियकर येणार आहे
म्हणून मी अमृताने पेले भरले.
त्याच्यासाठी मी शालिमारचे कोपरे सजविले.
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. १

त्याने मला अश्रु गाळायला लावलें
अन् तो माझ्यापासून दूर गेला.
लोकांचे बोल ऐकून माझ्या जिवाची चाळणी झाली;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. २

मी उंचावरून सभोवार पाहिलें
तरी मला बाग दिसत नाही.
फुलांचा तांडा सावकाश सरकतांना तेवढा दिसतो;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ३

जेव्हा सुखदुःखाच्या गोष्टीसाठी तो मला स्वर्गांत नेतो
तेव्हा माझीं कर्णफुलं मी अप्सरांना दाखवितें.
कधी तो मला धरतीवर फेकतो;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ४

अनुक्रमणिका

दम दम गमकुय प्याल धुम जावान
तिम हन याद कर ब थावान छह
मार मार ब्यथि धुम जिन्द करनावान
पोशन माल करनावान छह ५

नूजुम वीर नहि नेरि पोश छानान
कायि वन छायि पान धावान छह
विगन्यन हेत छह हुर्य वननावान
पोशन माल करनावान छह ६

यार हंज कछ छह वार याद थावान
दोन नुठन जाहजि वर भावान छह
गुल वनि बुलबुलह नोजि वाह बागवान
पोशन माल करनावान छह ७

पोशि माल रोशि छह पान पेरावान
मुश्क होत ही तन नावान छह
ओश नथ मान्यम हाज घुमरावान
पोशन माल करनावान छह ८

लोल बाजार छह मोलनावान
नान नान पान परस्नावान छह
रुम छि अथ लालह छुन पावान
पोशन माल करनावान छह ९

यार मुन्द मारमुत हार छुन धावान
ब्यारह लरि पान हावान छह
काम दिन यार छुन जाम मुचरावान
पोशन माल करनावान छह १०

रोशन यार सुंद छुम व्यसरावान
अन्दरी दोद ललनावान छह
महजूर हंद पाठय नाल छुम दिलवान
पोशन माल करनावान छह ११

क्षणाक्षणाला तो मला दु:खाचे प्याले पाजतो;
क्षणाक्षणाला मी त्याचें कृत्य विसरतें;
क्षणोक्षणीं तो मला मारतो आणि जगवतो;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ५

फुलांच्या ताटव्यांत तो माध्यान्हीं मौजेखातर येणार
म्हणून मी झाडाआड चूपचाप लपून बसेन.
जलदेवतांच्या स्वर्गसंगीतांत मी माझा स्वर मिळविला;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ६

तो बोलतो तो प्रत्येक शब्द मी ऐकतें
पण त्यांतलं कांहीहि माझ्या ओठापर्यंत पोचत नाही.
फुलाची बुलबुलाशीं होणारी कुजबूज बागवानाला
कशी कळणार ?
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ७

मी फुलराणी झाली आहे अन्
नार्सिससारख्या माझ्या तनूवर सुवास उधळला आहे.
त्यानं माझा अस्वीकार केल्यास माझं संगीत व्यर्थ ठरेल
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ८

प्रेमाच्या बाजारांत रत्नाचं मोल व्हावं म्हणून
मी दुकानांतून भटकलें व रत्न गमावून बसलें
तें रत्न आता भंगलें; त्याचें मोल संपलें;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ९

माझ्या प्रियकराच्या भक्तीमुळे माझा अंत होत आहे
मी त्याच्या अगदी जवळ पहुडलें आहे;
तरीहि त्या अनंग प्रेमाचें निरावरण दर्शन
मला मिळत नाही;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. १०

माझ्याशीं न बोलतां दूर जाऊन तो मला यातना देतो
माझ्या दु:खाला मी माझ्या मांडीवर झोपवितें;
तो मला महजूरसारखें शोकक्रंदन करायला लावतो;
त्याच्यासाठी माझी फुलबाग सुसज्ज आहे. ११

काश्मिरी कवी महजूर

रशियन साहित्य, कला आणि 'पार्तिनोस्त'

पां. ब. गाडगीळ

Ah! you fouriers failed,
Because not poets enough to understand
That life developes from within.

प्रस्तुत लेखाच्या शीर्षकांतील 'पार्तिनोस्त' या शब्दामुळे वाचक गोंधळून जातील म्हणून प्रथम 'पार्तिनोस्त' या शब्दाचा अर्थ सांगतों. 'पार्तिनोस्त' (Partinost) या शब्दाचें सुटसुटीत इंग्रजी भाषांतर Partyism : that which properly pertains to the party असें करतां येईल. पक्ष (Party) व कार्य (Cause) या शब्दांची कम्युनिस्टांच्या मनावर फार मोहिनी असते. पक्ष (Party) हा शब्द उच्चारतांच त्यांचें अंतःकरण थरारून जातें. पक्षाचें संवर्धन, पक्षाचा मतप्रचार, पक्षाचे आदेश, पक्षाचें साहित्य या गोष्टींचें कम्युनिस्टांना फार महत्त्व वाटतें. पक्षनिष्ठा त्यांच्या जीवनाचें ध्येय असतें. पक्ष हा साधन आहे, साध्य नव्हे याची त्यांना शुद्ध राहत नाही. वर्गयुद्ध, मजूरक्रांति, कामगारशाही (Dictatorship of the Proletariate) नंतर शासनसंस्थेचें निर्माल्य. (सुकून जाणें withering away.—केव्हा कोण जाणे?) व अखेर वर्गविर्राहत समाजरचनेचें 'सुवर्णयुग' पृथ्वीवर अवतरेल हा अदम्य आशावाद आणि हें ईप्सित साध्य करण्यास एक पोलादी पक्ष निर्माण करणें त्यांस इष्ट वाटतें. परंतु पक्ष हाच त्यांचा देव बनतो व या देवाची पूजा करण्यांत हे नवे परम श्रद्धाळू सनातनी जीवनाची इतिकर्तव्यता मानतात. साम्यवादी तत्त्वज्ञानाची विवेकशील उजळणी करणें ह्या आततायी अनुयायांच्या रक्तांतच नाही. पक्ष, राज्य व कामगार या त्रिमूर्तींचें (trinity) पूजन व गुणसंकीर्तन करणें त्यांचें जीवितकार्य होऊन बसलें आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत पक्षाच्या संवर्धनाच्या दृष्टीनें कार्य करणें, पक्षाच्या विचारसरणीचा प्रचार करणें व पक्षाच्या आदेशांचें आज्ञापालन करणें हेंच त्यांचें ध्येय झालें आहे. पक्षनिष्ठेमुळेच राजकारणाप्रमाणे, साहित्यकारणांत त्यांना 'पार्तिनोस्त' धोरणाची अंमलबजावणी करणें इष्ट वाटतें.

तत्त्वज्ञानांतील 'पार्तिनोस्त' म्हणजे भौतिकवादाचा पुरस्कार. तत्वज्ञानाच्या क्षेत्रांत मार्क्स व एंजल्स कडवे पक्षपाती (partyists) होते. धर्म आणि अध्यात्म यांनी सरंजामशाही व भांडवलशाही समाजरचना व राज्ययंत्र दृढमूल केलें अशी त्यांची धारणा होती. अध्यात्मवाद म्हणजे केवळ कल्पनाविहार (speculation) आणि अंतिमसत्य जडात्मक असल्यामुळे जडवाद हेंच शास्त्रशुद्ध (scientific) तत्त्वज्ञान, इतर सर्व प्रणाली अशास्त्रीय असा त्यांचा दावा आहे. साम्यवादी विचारप्रणालींतील विरोध त्रिकासाधिष्ठित जडवाद हा मूलभूत सिद्धांत आहे. या विरोधविकासवादांत आत्मानुभव व धर्मानुभव यांना थारा नाही. या विचारांचें मंडन करण्यांत आणि इतर तत्त्वज्ञानाचें खंडन करण्यांत त्यांची 'पार्तिनोस्त' वृत्ति प्रगट होते. लेनिननें आपल्या पुस्तकांत जडवादाचें (materalism) केवळ मंडन केलेलें नाही तर पक्षाच्या सभासदांना व अनुचरांना शत्रूंचें (अर्थात् वर्गशत्रूंचें) निर्दालन करण्याचा कडकडीत इशारा दिलेला आहे. झॅड्नॉफ

म्हणतो की, Each word (Lenin's) strikes and destroys the adversary

साहित्यांतील 'पार्तिनोस्त' म्हणजे पक्षाच्या विचारप्रणालीचें समर्थन करणारें काव्य, नाटय आणि गद्यसाहित्य निर्माण करणें, पक्षाच्या विचारसरणीचें तात्विक वाङ्मय निर्माण करणें आणि पक्षाच्या अद्यावत् आदेशांचें अनुसरण करून पक्षाची व्यावहारिक गरज भागविणें. 'पार्तिनोस्त'च्या विचारसरणीचें बीजारोपण लेनिनच्या काळांतच झालें, पण तें फारसें अंमलांत आलें नाही. १९२० सालीं प्रोलेट कल्टची स्थापना झाली. प्रसिद्ध भविष्यि (Futurist) कवि मायकॉव्हस्की याने Left Front या संस्थेची स्थापना केली. या संस्थांच्या मतें साहित्य हें बहुजन-समाजासाठी, पक्षप्रचारासाठी व क्रांतीसाठी राबविलें पाहिजे. मायकॉव्हस्कीने पक्षप्रचारासाठी उदंड कविता लिहिली. त्याने स्पष्टच घोषणा केली.

I will lift up
A hundred volumes
of my party books.

मायकॉव्हस्की हा खराखुरा जातिवंत कवि होता पण त्याने आपली कोमल काव्यकला कडव्या प्रचारासाठी राबविली. यांत्रिक कवितांची रचना करण्यांत व पक्षाचा प्रचारक–कवि बनण्यांत त्यानें धन्यता मानली. सुप्रसिद्ध रशियन कवि सर्जी येसेनिन् यानें जेव्हां आत्महत्या केली तेव्हां मायकॉव्हस्की म्हणाला होता की, आमच्या साम्यवादी पुनर्घटनेच्या काळांत मरणें सोपें व जगणें कठीण आहे. पण दैवाने असा सूड घेतला की, मायकॉव्हस्कीला येसेनिन् प्रमाणेंच मरणें सोपें वाटलें व त्याने आत्महत्या केली. मायकॉव्हस्की व प्रोलेट् कल्टच्या कम्युनिस्ट ठोकळेबाजीला ऊत आला होता. पक्षाच्या प्रचारासाठी वाङ्मयाची सामुदायिक पैदास करण्याचा या कट्टर पक्षनिष्ठांचा आग्रह होता. या संकुचित धोरणाला सेरापियन ब्रदर्स या लेखकांच्या संस्थेने विरोध केला. लेनिन व ट्रॉट्स्की यांनी या संस्थेला पाठिंबा दिला व मायकॉव्हस्की आणि प्रोलेट् कल्ट यांना खरमरीत समज दिली. ट्रॉट्स्कीने श्रमजीवी कलेची चिरफाड केली आणि श्रेष्ठ कलेचीं मूल्यें व सृजनशील कलेचें मर्म समजावून सांगितलें. पॅस्टरनॅकच्या सुंदर काव्याचा गौरव होऊं लागला व मायकॉव्हस्की व त्याचे भगनगण त्यांनी लिहिलेलीं तथाकथित क्रांति–गीतें मागे पडलीं. स्टॅलिन सर्वाधिकारी झाल्यानंतर कडव्या पक्षनिष्ठेने पुन्हा उचल खाल्ली. रॅप संस्थेचा अध्यक्ष ॲव्हर्बाक याने प्रचारकार्यासाठी लेखकांना वाङ्मय निर्माण करण्याचा हुकूम दिला. गॉर्कीने या धोरणाचा खणखणीत विरोध केला, व ॲव्हर्बाकची सैबेरियांत रवानगी करण्यांत आली.

१९२८ नंतरच्या काळांत साहित्य आणि कला या क्षेत्रांत कम्युनिस्ट पक्षाने फारसें लक्ष घातलें नाही. पक्षाने कला व साहित्य यांना स्वातंत्र्य दिलेलें होतें. परंतु हा अनाग्रह फार दिवस टिकला नाही. १९३५ सालापासून पुन्हा 'पार्तिनोस्त'ने आपलें स्वरूप प्रगट केलें. स्टॅलिन व त्याचा प्रमुखहस्तक अँद्री झॅड्नॉफ साहित्य, संगीत, नाटय, चित्रपट व चित्रकला या विषयांत मतप्रदर्शन व मार्गदर्शन करूं लागले. पक्षाची शिस्त व नेत्याची गुलामगिरी स्वीकारलेले आंधळे, आज्ञाधारक कम्युनिस्ट साहित्यकार 'पार्तिनोस्त' धोरणाचें समर्थन करून हुकुमशहाच्या आदेशांचें पालन करूं लागले. पक्षनिष्ठेचें पर्यवसान स्टॅलिनची विभूतिपूजा करण्यांत झालें. रशियांतील चित्रकारसंघाचा प्रमुख अलेक्झांडर जेरासिमॉव्ह याला आजचें स्थान प्राप्त होण्यास त्याची विभूतिपूजा कारण झालेली आहे. जेरासिमॉव्हने स्टॅलिन व त्याच्या शिष्यांची देवदूतांसारखीं चित्रें काढलीं आहेत. जेरासिमॉव्ह हा चित्रकार-संघाचा झार झालेला आहे आणि त्याच्या हडेलहप्पीला कंटाळून अनेक चित्रकार अज्ञातवासांत गेले आहेत. झॅड्नॉफनेंच प्रथम स्टॉलिनचें साहित्य आणि संगीत या क्षेत्रांकडे लक्ष वेधलें. त्याच्या मतें छापलेला शब्द फार शक्तिशाली असतो म्हणून पक्षाने साहित्यांत करड्या नजरेने लक्ष घातलें पाहिजे. झॅड्नॉफच्या मार्गदर्शनाखालीं 'पार्तिनोस्त' धोरणाने भयंकर किळसवाणें स्वरूप धारण केलें. आता तर अमेरिका विरोधाचें नवें खाद्य मिळालेलें आहे. क्रेमलिनचें धोरण म्हणजेच 'पार्तिनोस्त' असें समीकरण होऊन बसलें आहे. साहित्यांतील या सोटेशाहीमुळे अनेक प्रतिभावंत लेखक देशोधडीला लागले आहेत, कांहींची सैबेरियांत रवानगी झाली आहे,

अनुक्रमणिका

तर कांहींनी अज्ञातवास पत्करलेला आहे. 'गद्यलेखकांचें मौन व कवींची आत्महत्या' (Silence of prose writers and suicide of poets) असें या काळाचें वर्णन एका टीकाकाराने केलें आहे. सुप्रसिद्ध कादंबरीकार मायकेल शोलाकॉव्हने लेखनसंन्यास घेतलेला आहे तर बोरिस पॅस्टरनॅकसारखा एका काळचा अग्रगण्य कवि शेक्सपीअरचें भाषांतर करण्यांत गुतलेला आहे

रशियांतील आजचा अग्रगण्य साहित्यकार कोण ? कॉन्स्टंटाईन सिमॅनाव्ह ! सिमॅनाव्हने Friends and Foes या सारख्या यांत्रिक कविता लिहिल्या; पण त्या लोकप्रिय झालेल्या नाहीत. उलट त्याची 'माझी वाट पहा' ही कविता फारच लोकप्रिय झाली. सैनिकांच्या, विद्यार्थ्यांच्या, तरुण विवाहित मुलींच्या, सान्यांच्या जिभेवर ती कविता नाचत होती. प्रचारासाठी लिहिलेली Friends and Foes ही कविता मागे पडली पण सिमॅनाव्हचें विरहाचें काव्य मात्र लोकप्रिय झालें. मानवी हृदयांत हेलावणाऱ्या भावनांना आवाहन करणारी कलाच अमर ठरते आणि व्यावहारिक व तात्कालिक ध्येयाचें उद्घाटन करणारी कला नष्ट होते हें पुन्हा एकवार सिद्ध झालें. पक्षाच्या प्रचारासाठी सिमॅनाव्हने आपली प्रतिभा राबविली आहे. अमेरिका विरोध हें पक्षाचें ध्येय ठरल्याबरोबर सिमॅनाव्हने The Russian Question हें नाटक लिहून काढलें. सिमॅनाव्ह हा प्रतिभाशाली लेखक आहे. परंतु 'पार्तिनोस्त' धोरणामुळे त्याने आपली लेखनकला हुकुमशाहीची बटीक बनविली. समाजवादी शासनाचा व पक्षाचा उदोउदो करण्यांत तो नेहेमीच पुढाकार घेतो. क्वचित्समयीं पक्षाचीं पत्रें त्याच्यावरहि टीका करतात. पक्षाचें सर्वांत ताजें धोरण लक्षांत घेऊन तो आपली कादंवरी लिहीत असतो. पण त्याला देखील 'नवा सोव्हियट मानव' निर्माण करतां आला नाही, असा पक्षाच्या पत्रांचा त्याच्यावर आरोप आहे. 'नवा सोव्हियट नायक' चित्रित करणें हेंच आजच्या कादंबरीकारांचें व नाटककारांचें ध्येय झालें आहे. व्हॅसिली अॅझायेव्हच्या Far from Moscow ची अतोनात स्तुती झाली कारण त्याने 'नवा सोव्हियट माणूस' रंगविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कॉन्स्टंटाईन फेडिनच्या Unusual Summer लाहि प्रसिद्धि पुष्कळ झाली कारण त्या कादंबरींत सोव्हियटचें आजचें जीवन उत्कृष्ट तऱ्हेने चित्रित झालें आहे. अलेक्झांडर फेद्येव्ह याची The Young Guard ही कादंबरी सर्व युद्धकालीन कादंबऱ्यांत उत्कृष्ट ठरली. त्या कादंबरीच्या आधारें द्मित्री शास्ताकोव्हिचने एक संगीतिका (opera) रचली व त्या कादंबरीवर एक चित्रपटहि तयार झाला. रशियांतील लाखों लोकांनी त्या कादंबरीची व चित्रपटाची स्तुति केली. फेद्येव्हचें नांव सर्वतोमुखीं झालें. पण टीकाकारांनी या कादंबरीवर टीका करितांना असें म्हटलें की, कादंबरीकाराने डॉनबास विभागांतून लालसेना माघार घेत आहे असें जें दृश्य रेखाटलें आहे त्यांत लोक भीतीनें माघार घेत आहेत असें भासतें. तसें त्याने दाखविण्याऐवजी लालसेनेची माघार एक सुव्यस्थित योजना होती असें दाखवावयास पाहिजे होतें. तसेंच सोव्हियट तरुण-तरुणींनी जर्मनांशीं जो लढा दिला तो पक्षाच्या आदेशानुसार व्यवस्थित योजनेनुसार दिलेला होता, असें दाखवावयास पाहिजे होतें. लेखकाने ही पक्षाची टीका ऐकून उघडपणे आपल्या चुका कबूल केल्या व कादंबरींत फेरफार करण्याचें वचन दिलें. सिमॅनाव्ह-प्रमाणे सगळेच कलावंत पक्षाचें वर्तमान उद्दिष्ट लक्षांत घेऊन लेखन करीत नसतात. सिमॅनाव्ह धंदेवाईक लेखक आहे. पक्षाची कृपा संपादन करून पैसे मिळविणें हें त्याचें ध्येय आहे. आज त्याच्याइतका श्रीमंत लेखक कोणीच नाही. प्रथम तो केवळ प्रेमगीतें लिहीत असे. परंतु एकदा त्याच्या काव्यसंग्रहासंबंधी स्टॅलिन म्हणाला की, सिमॅनाव्हने या काव्यसंग्रहाच्या दोनच प्रति छापावयास पाहिजे होत्या. एक प्रत स्वतःसाठी व एक त्याच्या प्रेयसीसाठी. सिमॅनाव्हने आपल्या लेखनाचें ध्येय बदलविलें. सोव्हियट युनियनच्या राजकीय व सामाजिक उद्दिष्टांशीं सहकार्य करणें, अमेरिकन जीवनाचा उपहास करणें व पाश्चात्य सवगोलंकारी (cosmopolitan) संस्कृतीवर हल्ला करणें हे त्याने आपलें ध्येय ठरविलें. सिमॅनाव्हच्या पावलावर पाऊल ठेवणारा दुसरा नाटककार म्हणजे कम्युनिस्ट पक्षाचा सभासद अॅनाटोली सुरॉव्ह. अमेरिका विरोधाच्या आजच्या काळांत रशियन नाटककार अमेरिकन जीवनाचें व्यंगपूर्ण चित्रण करण्यांत दंग झालेले आहेत,

कारण ' पार्तिनोस्त घोरणास ' तें अनुसरून आहे. सुराव्हचें The Mad Haberdasher व Moscow Character चा लेखक सोफोनोव्हचें Becketov's Career हीं अमेरिका विरोधी प्रसिद्ध नाटकें होत. परंतु पक्षाच्या सेवकांत निकोलाय व्हिर्टा-सारखा आज्ञाधारक लेखक दुसरा कोणीच नाही. या नाटककाराने पक्षाच्या प्रत्येक महत्त्वाच्या घोषणेवर व स्टॅलिनच्या प्रत्येक योजनेवर नाटक लिहिण्याचें ठरविलेलें दिसतें. वानगीदाखल त्याच्या कांही नाटकांचीं उदाहरणें सांगतों. सामुदायिक सहकारी शेतींतील शिस्तीवर त्याने Our Daily Bread हें नाटक लिहिलें. झेको-स्लोव्हाकियाच्या राजकीय लढ्यावर Conspiracy of the Doomed हें नाटक त्याने लिहिलें. त्यांत अमेरिकन कटाचा रशियाने बीमोड केला असें दाखविण्यांत आलें आहे. मार्शल टिटोविरुद्ध प्रचार करणारें एक नाटकहि त्याने लिहिलें आहे. 'पार्तिनोस्त' घोरणानुसार व्हिर्टा नाटकें लिहीत असल्यामुळे पक्षाच्या पत्रांतून त्याची अमाप प्रशंसा येत असते, परंतु त्याचें नाट्य म्हणजे पोकळ प्रचार व नीरस कला यांचें मिश्रण आहे.

झारच्या रशियांत Dead Souls व The Inspector General लिहिणारा गोगोल निर्माण झाला. पण आजच्या रशियांत शासनसंस्थेच्या हुकुमशाहीचें व गुप्त पोलिसी राज्याचें विडंबन करणारा दुसरा गोगोल निर्माण होऊं शकेल काय ? The Inspector General च्या धर्तीवर एखादें नाटक लिहिणें आजच्या एखाद्या नाटककारास शक्य आहे काय ? कदापि नाही. झॅड्नॉफ व त्याचे साहित्यिक सहकारी यांनी वाङ्मय-नियंत्रणाच्या कायम योजना करून टाकल्या आहेत. झोटिंगशाहीच्या व दंडेलीच्या वातावरणांत सोव्हियट नेत्यांचें विडंबन करण्याचें कोण धाडस करेल ? सुप्रसिद्ध विनोदी लेखक झोस्चेंको याने एकदा समाज नियंत्रणाचा व पुनर्घटनेचा अधिनायक म्हणून एका माकडाची गोष्ट लिहिली. झॅड्नॉफला तो उपहास सहन झाला नाही. त्याने झोस्चेंकोवर अतिशय जहरी टीका केली. त्या टीकेंत झोस्चेंकोला ' सबगोलंकारी ' (Cosmopolitan), 'पाश्चात्य ऱ्हासकालीन भांडवलदारी संस्कृतीचा गुलाम' इत्यादि शिव्यांचा आहेर केला ता. तेव्हापासून झोस्चेंकोने लेखन सोडून दिलें. एका काळीं विनोदी लेखक म्हणून प्रसिद्ध असलेल्या झोस्चेंकोला उदरनिर्वाहासाठी कोंबड्या पाळण्याचा धंदा करावा लागत आहे. पक्षाचें घोरण कळत नाही म्हणून, झॅड्नॉफच्या कारकिर्दींत, कवयित्री ॲना ऑखमाटोव्हा हिला लेखक संघांतून काढण्यांत आलें. पक्षाचे सभासद नसलेल्या लेखकांना अनेक यातना भोगाव्या लागतात. पक्षसभासदत्वाची खुणेची अंगठी नसल्यामुळे या लेखकांना ग्वावलित् (Gvav-lit) पासून फार त्रास होतो. रशियांतील साहित्याचें नियंत्रण ग्वावलित् ही सरकारी संस्था, कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार व चळवळ विभाग (Agit Prop), व 'वाङ्मयीन खबर' (The Literary Gazette) व 'संस्कृति व जीवन' (Culture and Life) हीं नियतकालिकें करीत असतात. 'Krokodil' हें विनोदी साप्ताहिक रशियांत फारच लोक प्रिय आहे. सोव्हियट् जीवनांतील अनेक व्यंगांवर व उणीवांवर विनोदप्रचुर टीका या साप्ताहिकांत प्रसिद्ध होत असे. या साप्ताहिकाला नुकताच असा 'आदेश' देण्यांत आला की, त्याने अमेरिकन भ्रष्ट जीवन, मध्यमवर्गीय जीवनांतील विफलता, पाश्चात्य सबगोलंकारी संस्कृति या विषयांवर टीका करावी. विनोदावर व हास्यावरहि हुकुमशाहीने सत्ता गाजवली आहे. झारच्या राज्यांत चेकॉव्ह, टॉल्स्टॉय, बेलिन्स्की हे कला व प्रतिभा यांच्या स्वातंत्र्याचे कट्टे पुरस्कर्ते जगूं शकले पण कामगारशाहीच्या आजच्या काळांत दुय्यम दर्जाचे सिमॅनॉव्ह, सुरॉव्ह, व्हिर्टा हे साहित्यिक, 'पार्तिनोस्त' वृत्तीचे गुलाम बनलेले डेव्हिड झास्लावस्की, व्हलादिमिर येरमिलॉव्ह हे टीकाकार, हुकुमशाहीची लाळ घोटणारे व स्टॅलिनचे पूजक कोलचाव्हस्की, मॅसल्कॉव्ह, बेझीमेन्स्की, रुस्ताव्हेली, गंजेवी निझामी इत्यादि दशम दर्जाचे कवि, व्हलासॉव्ह सारखा शिल्पकार व जेरासिमॉव्हसारखा चित्रकारच जगूं शकतो. मेयरहोल्ड-सारख्या अग्रगण्य नाट्यनिर्मात्याला तुरुंगवास भोगावा लागतो तर व्हलादिमिर याकान्तोव्ह सारख्या भावनाशाली काव्यगायकाला आत्महत्या करावी लागते.

संगीताच्या क्षेत्रांतील जुलुमांचें काय वर्णन करावें ? स्टॅलिन व झॅड्नॉफ यांनी संगीतांत जशी सोटेशाही गाजविली तशी साहित्यांत व इतर ललितकलांच्या क्षेत्रांत

अनुक्रमणिका

गाजवलेली नाही. झॅड्नॉफ हा बऱ्यापैकी संगीतज्ञ होता. परंतु पक्षप्रचाराची त्याची योजना संगीतांतील स्वातंत्र्याला मारक होती. संगीतांतून व मुख्यतया संगीतिकेंतून (opera) पक्षप्रचार करण्याचा झॅड्नॉफने आग्रह धरला व रशियांत संगीतविषयक गोंधळ (musical muddle) माजला. इटलीप्रमाणेच रशिया संगीतासाठी व संगीतनाट्यासाठी प्रसिद्ध आहे. महान् संगीतज्ञ चैकाव्हस्कीची परंपरा प्राप्त झाल्यामुळे अलिकडील काळांत रशियांत उत्कृष्ट संगीत नाट्याचे निर्माते निर्माण झाले. परंतु त्यांची कला पक्षप्रचाराच्या पोलादी साच्यांत गुदमरून गेली. पक्षाच्या कोंडवाड्यांत संगीत-कलेला डांबून टाकण्यांत आलें. संगीतिका (opera) चांगली किंवा वाईट ठरविण्याचा अधिकार मर्मज्ञांना राहिला नाही. स्टॅलिन व झॅड्नॉफ यांच्या लहरीवर त्या संगीतिकेचे प्रयोग चालू ठेवणें अगर बंद करणें अवलंबून राहात असे. १९४८ सालापासून संगीताच्या क्षेत्रांत पक्षाची पाच्छाई सुरू झाली. द्मित्री शास्ताकोव्हिच, सर्जी प्रोकोफिव्ह, पोपोव्ह व व्हॅनो मुरादेली इत्यादि संगीतज्ञांना गणवेषधारी बनविण्याचा खटाटोप झॅड्नॉफने सुरू केला. या संगीतज्ञांचें एकाकाळीं अपार कौतुक करणारें 'वाङ्मयीन खबर' एकदम पक्षाच्या धोरणानुसार या संगीतज्ञांवर निर्बुद्ध टीका करूं लागलें. त्यांच्या संगीतांत त्यांना Formalism, पाश्चात्य ऱ्हासकालीन संगीताचे निनाद व अराजकता आढळूं लागली. एकाकाळीं ज्यांच्यावर या टीकाकारांनी स्तुतिसुमनें उधळलीं त्यांनीच पोटभर निंदा करण्यांत हे पक्षाचे गुलाम धन्यता मानूं लागले. शास्ताकोव्हिच हा रशियन लोकांचा अत्यंत आवडता संगीत-नाट्य-निर्माता आहे. त्यांच्या संगीतिकांनी लाखों रशियन लोकांचें मनोरंजन केलें आहे. संगीत रसिकांच्या गळ्यांतला तो ताईत बनला होता. त्याच्या Lady Macbeth of Mtensk या संगीतिकेवी 'प्रवदा' 'इझ्वेस्तिया' आणि नाट्यविषयाला वाहिलेल्या नियतकालिकांनी खूपच स्तुति केली होती. झारकालीन मध्यमवर्गाचा उपहास त्या नाटकांत केला असल्यामुळे पक्षाचे सभासद त्यावर फार खूष होते. एक दिवस स्टॅलिनने तें संगीत-नाट्य पाहिलें. त्याला तें आवडलें नाही. शास्ताकोव्हिचचें संगीत त्याला भयंकर दोषास्पद व बेसूर वाटलें व तसें त्याने डेव्हिड झास्लाव्हस्कीजवळ म्हटलें. मग काय? झास्लाव्हस्कीने 'प्रवदां'त स्टॅलिनच्या मताला प्रसिद्धि दिली. शास्ताकोव्हिचचें संगीत–नाट्य बंद झालें. त्याच्यावर 'भांडवलदारी आदर्शांचा अनुयायी' 'प्रजातंत्र विरोधी', 'प्रतिक्रांतिकारक', अशा ठोकळेबाज, निर्बुद्ध शिव्यांचा हल्ला सुरू झाला. पुढे शास्ताकोव्हिचने 'सुवर्णयुग' ही संगीतिका लिहिली आणि 'पक्षाचें म्हणणें योग्य आहे. सोव्हिएटच्या वास्तववादी, जनताप्रिय, सृजनशील कलेकडे नेणारा मार्ग मला शोधून काढला पाहिजे' अशी अपमानास्पद कबुली दिली, तेव्हा त्याच्या संगीतावरचा बहिष्कार उठला. पक्षाच्या प्रचारासाठी त्याने आपल्या कलेला दासी बनविलें. पक्षाच्या आज्ञेनुसार त्याने वनमहोत्सवावर (reforestation) Cantata of the Forests हें संगीत नाट्य रचलेलें आहे.

प्रोकोफिव्हने सुरवातीला बाणेदारपणा दाखविला पण पुढे पक्षाची सेवा करण्यासाठी तो तयार झाला. अनेक दिवस परिश्रम करून Tale of a Real Man हें संगीतनाट्य त्याने रचलें. त्या संगीतिकेंत सोव्हियट युद्धनायक रंगविलेला होता. पक्षाच्या टीकाकारांकडून खूप स्तुति होईल असें प्रोकोफिव्हला वाटत होतें, पण अनुभव वेगळाच आला. The Literary Gazetteनें पक्षाने पुरस्कारिलेल्या वास्तववादी कलेचें भ्रष्ट स्वरूप त्याने दर्शविल्याबद्दल टीका केली तर पक्षाच्या साहित्यिक नियतकालिकांनी 'a typical recurrence of formalism असा आहेर केला. प्रोकोफिव्हची जाहीर नाचक्की झाली. पक्षाच्या सेवेसाठी व आदर्श सोव्हियट नागरिक होण्यासाठी त्याने आपल्या प्रिय पत्नीला सोडून दिलें, आपल्या संगीतविषयक अभिरुचीला मुरड घातली आणि शेवटीं त्याच्या नशिबीं निरर्गल निंदा फक्त आली. असाच अनुभव नाटककार निकोलाय पोगोडिनला आला. पक्षाचा गणवेष चढविण्याचें त्याने नाकारलें. व पक्षाच्या हस्तक्षेपाबद्दल compulsion that fatally influences the Art of the Theatre अशी जोरांत टीका केली. परंतु पुढे पोगोडिनने आपलें मत बदललें. अमेरिका-विरोधाच्या वावटळींत आपली पक्षनिष्ठा पटवून देण्यासाठी, त्यानें 'Misssourie Waltz' हें नाटक लिहिलें. या नाटकांत अमेरिकेंतील आर्थिक भ्रष्टाकार चित्रित केला होता. त्या नाटकावर अशी टीका करण्यांत आली की,

अनुक्रमणिका

या नाटकांत दुष्ट दाखविलेलीं पात्रेंच माणुसकीला धरून वागतांना दिसतात व अमेरिकन कम्युनिस्टांपेक्षा त्यांचीं स्वभावचित्रें जातिवंत वाटतात. पोगोडिनने कपाळावर हात मारला आणि नाट्यलेखन स्थगित केलें.

वाङ्मयीन ससेहोलपट करणारे टीकाकार आज साहित्यक्षेत्रांत धुमाकूळ घालीत आहेत. त्यांची मार्क्स-वादी निर्बुद्ध ठोकळेबाजी व आंधळी पक्षनिष्ठा कलेच्या स्वातंत्र्याला बंदी घालीत आहेत. एकेकाळीं ट्रॉट्स्कीच्या 'वाङ्मय व क्रांति' या ग्रंथावर टीका करणारा व्हलॅ-डिमिर किरपोटिन् सध्या पक्षाच्या मर्जीतून उतरलेला आहे. फेडोर डॉस्टॉव्हस्कीवर प्रशंसेचीं दोन पुस्तकें लिहिल्यामुळे त्याला मास्कोच्या साहित्य-परिषदेच्या कला-विभागाच्या अध्यक्षपदाला मुकावें लागलें, कारण डॉस्टॉव्हस्की हा पक्षाच्या टीकाकारांना न आवडणारा लेखक आहे. 'वाङ्मयीन खबर'चा संपादक येर-मिलॉव्ह व डेव्हिड झास्लाव्हस्की यांनी डॉस्टॉव्हस्कीच्या साहित्याची भरपूर निंदा केलेली आहे. त्यांच्या मतें डॉस्टॉव्हस्कीचें वाङ्मय प्रतिक्रांतिकारक (counter revolutionery). मनोवृत्तीला चालना देतें. तसेंच मानवाच्या ठिकाणीं पराकोटीची दुर्बलता कल्पून त्याने आपलें साहित्य लिहिलेलें आहे. (तिकडे रूस देशांत डॉस्टॉव्हस्की प्रतिगामी साहित्यकार ठरलेला आहे हें इकडील कम्युनिस्टांना कळलेलें दिसत नाही. कारण डॉस्टॉव्हस्कीच्या कादंबऱ्यांचें गुणगायन करणारे कांही साम्यवादी टीकाकार अजून दृष्टोत्पत्तीस येतात.) पिल्नॅक, टॉलस्टॉय यांच्या कादंबऱ्यांना कोणी विचारत नाही. या कादंबऱ्यांची प्रशंसा करणें दुरापास्त झालेलें आहे. रशियांतील साहित्यकारांची एक विनोदी गोष्ट प्रसृत झालेली आहे. जेव्हा एखादा लेखक दुसऱ्याला भेटतो तेव्हा तो कसें काय असा प्रश्न करीत नाही तर 'कसें काय संस्कृति आणि जीवन ?' असा प्रश्न करतो.

क्रांतीच्या तिसाव्या वाढदिवशीं बोल्शाई थिएटरांत व्हॅनो मुरादेलीचें Great Friendship हें संगीत-नाट्य रंगभूमीवर आलें. वर्तमानपत्रांतून मुरादेलीची वारेमाप स्तुति झाली. मतलबी प्रशंसकांनी मुरादेलीच्या देशाचा—जार्जियाचा—उल्लेख केला होता; कारण स्टॅलिन जार्जियन होता. परंतु एक दिवस कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ति समितीने या नृत्यनाट्याची निंदा केली. त्या दिवसापासून कांही दिवसांपूर्वी स्तुति करणारे टीकाकार या नाटकांतील दोषांचे जावईशोध लावूं लागले. व 'वाङ्मयीन खबर' चे साहित्य-सारमेय त्याच्यावर भुंकूं लागले. मुरादेलीचें संगीत, पाश्चात्य भ्रष्ट संगीताचें अनुकरण करणारें ठरलें. शास्तकोव्हिच, प्रोकोफिव्ह व मुरादेली यांच्यासारख्या अभिजात कला-वंतांना त्यांच्या स्वतःच्या डोळ्यांनी स्वतःचा नाश पाहावा लागत आहे. आज रशियांत उच्च संगीताचा मृत्यू झालेला आहे, उत्कृष्ट नाट्य परागंदा झालेलें आहे आणि अभिजात सारस्वताने अज्ञातवास पत्करलेला आहे. 'पार्तिनोस्त'ने कलावंतांना पक्षाच्या कवायतींत उभें केलें असून त्यांना पक्षाचा पडघम व नेत्याच्या नांवाचा नगारा वाजविण्याची आज्ञा केलेली आहे.

आजच्या रशियांतील कलावंतांच्या व साहित्य-कारांच्या परवशतेची ही शोककथा सांगण्याचा हेतु हा की, गुलामगिरी ती पक्षाची असो अगर पंथाची असो, आत्म्याचा नाश करणारी असते. दृष्टि असून आंधळ्या-प्रमाणे वागणें, व शृंखलाबद्ध स्थितींत आनंद मानणें ही केवढी भयंकर गोष्ट आहे. जो स्वतंत्र नाही तो श्रेष्ठ कलावंत होऊं शकत नाही. जो स्वतंत्र नाही त्याला दृष्टि नाही, त्याला आत्मा नाही, त्याला ज्ञान नाही, त्याला धारणा नाही, त्याला आशा नाही, श्रद्धा नाही की प्रेम नाही. अशा कलावंताच्या हातून कोणतीहि उत्कृष्ट सृजनशील कलाकृति निर्माण होऊं शकत नाही. जुलूम-शाहीचा इतिहास हा निसर्गसिद्ध मानवी स्वातंत्र्याला प्रतिबंध करणाऱ्या प्रयत्नांचा इतिहास आहे व म्हणून जुलुमशाहीचें निर्दालन करणें आजचें विहित कार्य होऊन बसलें आहे. रशियांतील कलावंतांची गुलामगिरी हें सिद्ध करते आहे की, गुलामगिरी ती तत्त्वांची असो अगर पक्षाची असो, ती कलेच्या अप्रतिहत स्वातंत्र्याला व विचारसंचाराला हानिकारक आहे. स्वतंत्र विचार हें स्फोटक द्रव्य आहे. कोणत्याहि कडव्या पंथाला अगर सत्ताधारी पक्षाला स्वतंत्र विचारच नष्ट करूं शकतो. लोकाच्या अंतःप्रवृत्तींतून क्रांति निर्माण होत असते, जुलूमजबरदस्तीने नव्हे. शासनसत्तेचा जुलुमाला स्वतंत्र निर्भय विचारच नष्ट करूं शकतो व म्हणून **स्वतंत्र विचाराला आजच्या जीवनांत सार्वभौम स्थान प्राप्त करून देणें आजच्या प्रज्ञावंतांचें कार्य आहे.**

'पिचलेल्या पाव्या'पासून 'सुवास आणि रसा'पर्यंत

प्रा. सुरेश डोळके

माझ्या अंगणांत प्राजक्ताचें एक झाड आहे. भल्या पहाटे उठून पाहावें तों अंगणांत फुलांचा सडा शिंपलेला असतो. त्यांतलीं ओंजळभर फुलें घ्यावींत, आपलें तोंड त्यांत लपवावें आणि सुगंधानें धुंद होऊन जावें म्हणजे मला पुष्कळदा प्रा. भवानीशंकर पंडितांच्या कवितेची आठवण होते.

आणि माझ्या तोंडांतून शब्द बाहेर पडतात—

केवर्तकुमारी सत्यवती तूं जणू
पर्जन्यजलानें चिंब भिजे त्वत्तनू
लाभे ना तुजला काय कुणी शंतनू—
प्रेमभरानें जो तुजला ने आलिंगोनी उरीं
आपुल्या भव्य राजमंदिरीं ? (पि.पा.पृ. ४७)

प्राजक्ताचीं फुलें पिचलेलीं असतात. पण त्यांचा सुगंध ?—

पंडितांनी आपल्या भावकुसुमांचा पहिला संग्रह 'पिचलेला पावा' या नांवाने १९३३ सालीं प्रसिद्ध केला. 'पिचलेला पावा' तर खराच ! पण त्यांच्या हृदयाचा नव्हे, त्यांच्या आवाजाचा. ' 'पिचलेल्या पाव्यां'त काव्यगायकाचा खडा सूर ऐकूं येत नसला तरी हृदयाला कळणाऱ्या भावनेच्या संगीताची गोडी मात्र त्यांत भरपूर आहे.

एकावलि घालिन करपाशाची गळां
कटिभवती गुंफिन बाहूंची मेखला
मणिबंधीं वेढिन वलयांसम अंगुला
खरा युवतिचा अलंकार, पति तोच लाभल्यावरी
काय ती इतराची मग सरी ? (पि.पा.पृ. ७४)

असे उद्‌गार ज्यांच्या काव्यांतल्या एका प्रियकराच्या तोंडून बाहेर पडतात, त्यांच्या 'हृदयाचा' पावा पिचलेला आहे हें कुणाला तरी खरें वाटेल का ?—

पंडितांच्या काव्याचा आत्मा भावना, पण त्यांच्या शैलीचा आत्मा पदलालित्य हा आहे.

पापण्याआड राहीन
आसवावरी पोहीन
तव अंतरंग पाहीन
जर ओढाया बचेल मज कुणि तिथुनी
तर आंत दडव कवळोनी (पि. पा. ६०)

किंवा
अयि जीवितेश्वरी प्रियकरणी !
मम अंतरंग बघ पारखुनी
भणंग दिसतो वरवर सागर
उरांत दडवी परि वैरागर
आणिल उपसुनि त्यास काय वर—
गे ! पाणवुड्याविण अन्य कुणी ?—
(पि. पा. ७८)

यांत व्यक्त होणारी भावना किती तरल आहे ! बोलून चालून भावगीतेंत तीं ! भावांची उत्कटता हा भावगीतांचा आत्मा. पण या भावनेच्या उत्कटतेंतहि किती तरलता आहे ! किती हृद्यता आहे !—'वाक्प्रहार' (५८), 'आपांगदर्शन' (५२), 'गांधर्व' (७३) 'अलंकार' (७४), 'वरपरीक्षा' (७८) इत्यादि प्रस्तुत संग्रहांतलीं भावगीतें या दृष्टीने वाचून पाहावींत.

भावमंथनांतूनच कलेचा जन्म होत असतो. त्याकरिता कलावंताचें हृदयहि तितकेंच संवेदनक्षम

अनुक्रमणिका

असायला हवें. १९२९ सालीं पंडित लॉ कॉलेजमध्ये शिकत असतांना सुप्रसिद्ध क्रांतिकारक यतींद्रनाथ दास यांच्या कारावासांतील करुण मृत्यूवर 'फ्री प्रेस'च्या सदानंदांनी अग्रलेख लिहिला होता. पंडितांनी तो अंक लॉ कॉलेजमध्ये वाचला. आणि तिथल्या तिथे, 'फ्री प्रेस'च्या त्या अंकावरच, पंडितांच्या लेखणींतून शब्द उमटले—

संबोधो कुणि बंडखोर म्हणुनी
स्वातंत्र्यवीरास या !
यांना कोणि खुनी अराजक गणो !
देवो शिव्याशाप वा !
राष्ट्राच्या मृत वाहिन्यांत भरला
उत्साह यांनी नवा !
सत्तेला परकी झुगारुन दिलें
स्फूर्तीबलें आपुल्या !!
(उन्मेष आणि उद्रेक; पृ. ४)

नरकेसरी अभ्यंकर यांच्या मृत्यूची बातमी ऐकूनहि पंडितांच्या भावनेचा

ऐकाया मिळणार कोठुनि पुन्हा
सिंहा ! तुझी गर्जना ?
कोठोनि घडणार दर्शन तुझें
आता पुन्हा लोचनां ?
वा होणार प्रतीत कोठून पुन्हा
तो त्वेष, आवेश तो ?
होती निर्भयता पराक्रमपटो !
होतास तूं येथ तों ?

असा उद्रेक झाला होता.

या संस्कारक्षमतेमुळेच 'कृतज्ञतेचे अश्रु' (पि. पा. पृ. ४५), 'दिवंगत जननीस' (पृ. ५५), 'क्षमस्व' (६७), 'पुण्यस्मृती' (७१) इत्यादि-सुनीतांत पंडितांनी स्वतःच्या अंतःकरणांतील सुनीतांचीं चित्रें अत्यंत जिव्हाळ्याने रंगविलीं आहेत.

पंडितांनी आपल्या शब्दसंपत्तीने काव्याचा ताजमहाल उभारला आहे. त्यांच्या शब्दशिल्पांत संगमरवराची सफाई आणि सौंदर्य आढळतें. किंबहुना, तेंच त्यांच्या 'पिचलेल्या पाव्यां'तील कवितांचें वैशिष्टय आणि सामर्थ्य होय, असें मला म्हणावेसें वाटतें. प्रस्तुत संग्रहांतल्या कुठल्याहि कवितेवरून वरवर जरी नजर फिरविली तरी पदलालित्य रसानुकूल वृत्तांची निवड, श्रुतिसुभग शब्दयोजना, नादमाधुर्य आणि शब्दसौष्ठव हे गुण चटकन नजरेंत भरतात. त्यामुळे पंडितांच्या कवितेचें स्वरूप अवखळपणानें झऱ्या मारणाऱ्या स्वच्छंदी झऱ्यासारखें नसून जलविहाराकरिता बांधलेल्या सरोवरासारखें आहे. शेतावर भाकर पोचविणाऱ्या खेडचांतल्या रसरशीत तरुणीसारखें नसून प्रसाधनांनी सौंदर्य प्राप्त करून घेणाऱ्या कॉलेजकन्यकेसारखें आहे.

माझ्या प्रेमळ शाहिरा ! पुरविण्या माझी मनोवांछना
एखादें तव भावगीत मजला गाऊन दाखीवना !
(पि. पा. पृ. ६३)

असल्या उदाहरणांवरून पंडितांच्या पदलालित्याची, शब्दसौष्ठवाची आणि नादमाधुर्याची कल्पना येईल. 'स्वरूपसुंदरी' (२६), 'बलुची तरुणी' (६८) 'बुरखेवाली' (२१) आणि 'मुग्धा' (पृ. १००) हीं या संग्रहांतलीं शब्दचित्रें पहा. वर्णनाची सफाई आणि भाषेचें सौष्ठव हे गुण तर त्यांत दिसतीलच, पण मनांतील मृदुसूक्ष्म भावनांचें हळुवार चित्रण करण्याचें पंडितांचें कौशल्यहि त्यावरून दिसून येईल. परात्मप्रवेशाच्या सिद्धीमुळेच 'अपांगदर्शन' (पृ. ५२), 'वाक्प्रहार' (५८), 'पाळन' (५९), 'चित्रलेखा (पृ. ६०), 'सविकल्प समाधि' (पृ. ६३), आणि 'वंचिता' (पृ. ८६) या कवितांतील तरुणींच्या भावना आपल्याला विद्ध करतात.

दाविसी बुद्धया कशाला हासणें ओठावरी
घे पुरे हासुनि घे ! कां पाहसी मागेंपुढे ?
वेड लावावें पराला, मौज मारावी स्वतां
पंजरीं रावा धरावा स्वैर व्योमीं जो उडे—(पृ.५२)

या ओळींतून व्यक्त होणारी विद्ध हृदयाची आर्त किंकाळी कुणाच्या हृदयाला पीळ पाडल्याशिवाय राहील ?

प्रसाधनाच्या हव्यासामुळे पंडितांच्या अनेक भावगीतांतली भावना मळवटून गेली आहे. त्यांत उन्मेष आहे पण उद्रेक नाही. सौंदर्य आहे पण सामर्थ्य नाही. पंडित सौंदर्याचे उपासक आहेत पण तें सौन्दर्य आकाशांतल्या विद्युल्लतेचें किंवा देवघरांतल्या नंदादीपाचें नसून हॉलमधल्या विद्युद्दीपाचें आहे. कै. तांबे यांच्यासारख्या सौन्दर्यवादी कवीचें शिष्यत्व स्वीकारण्याचा तर हा परिणाम नसेल ? 'वलज हे हले गे सळसळुनी' (पि. पा. ४) या पंडितांच्या कवितेवरून 'घट भरे प्रवाहीं बुडबुडुनी' या कवितेची कुणाला आठवण येणार नाही ? 'बिजली जशि चमके स्वारी' या तांब्यांच्या कवितेंतील 'तिकडलीच बाइ भरारी' पंडितांच्या 'इकडीलच ना महाराजां'त (पृ. ८) संच-

रली आहे. 'लाज लाज लाज गडे! लाज एकदा' (पृ. ४८) —रे! थांब नको गोफण ती उंच उगारूं' (पि. पा. १८), 'तारू कसें तारूं' (पृ. ६) इत्यादि कवितांवर पडलेली तांब्यांची छाप भास्कराच्या प्रकाशाइतकीच स्पष्ट आहे. पुढे पुढे पंडितांचें अंतरंगकमल भास्कराच्या अस्तित्वाशिवायच उमलूं लागलें. भावसौंदर्यापेक्षा शब्दसौष्ठवाला जास्त महत्त्व दिल्यामुळे पंडितांच्या कित्येक सुंदर भावगीतांचा शेवट रसहानिकारक झाला आहे. 'बुरखेवाली' (पृ. २१), 'स्वरूपसुंदरी' (२७) 'अपांगदर्शन' (५२), 'सविकल्प समाधि' (६३) 'वरपरीक्षा' (७८) इत्यादि कविता वाचकांनी या दृष्टीने वाचून पाहाव्या.

पिचलेल्या पाव्यां'त विषयांची विविधता असली तरी तारुण्यसुलभ प्रणयभावनेचाच आविष्कार प्रामुख्यान झालेला आहे 'न्यायासनासमोर' (पि. पा. ६०) 'स्वरूपसुंदरी' (२६), 'उन्माद' (७९), 'मिनाक्षी' (८५) इत्यादि भावगीतांत प्रणयाचा उन्माद आहे; 'गांधर्व' (७३), 'अलंकार' (७४), 'मधुरमीलन' (७७) इत्यादि कवितांत प्रणयसामर्थ्याचा उद्दामपणा आहे तर 'अपांगदर्शन' (५२), 'स्मृति' (८३), 'वंचिता' (८६) 'नको जाऊं—' (७५) इत्यादिकांत वंचित प्रेमाचें आर्त आक्रंदन आहे. प्रणयसाफल्याची सुषमा प्रस्तुत संग्रहांतल्या एकाहि भावगीतांत नाही हे मुद्दाम सांगावेसें वाटतें. काव्यावरून कवीच्या अंतरंगाचा शोध घेतला तर पंडितांनी या संग्रहांतलीं भावगीतें तारुण्याच्या उंबरठ्यावर आणि विवाह होण्याच्या पूर्वी लिहिलेलीं आहेत हें उघड दिसून येतें.

दिव्यावर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणे पंडितांच्या काव्यांतली नायिका प्रीतीकरिता आत्मसमर्पण देखील करायला सिद्ध होते. तिला जणू म्हणायचं आहे—

तूं दिलरुबा दिलाचा, ताईत तूं गळ्याचा
तूं नर या निगेचा, तूं जीव तूं कलीजा
देहा बहार आला, तो यौवनांत न्हाला
तूं आपिका मिळाला, माषूक तोच ताजा
चंदावरी चकोरी, दीपावरी पखेरी
माझी तशी तयारी, तुझ्यावरी जनाजा
खेळे रगीरगी हा, सैतान दाही देहा
रंगेल बादशाहा, ये मारण्यास मौजा
हा रंग लुटण्याला, आस्वाद चाखण्याला
कां वाटती मनाला, त्या व्यथ भीडलाजा
लागो कलंक नांवा, पावो प्रसिद्धि किंवा
ते सारखेच जीवा, दोन्हीहि इष्कबाजा
आस्तेकदम पुढे ये, घे कुनिसात माझा
या आसमापरीचा, तूं इष्कबाज राजा."

—(प्रा. पंडितांचा एक अप्रकाशित गज्जल)

'पिचलेल्या पाव्या'ने मराठी कवितेच्या उद्यानांत एका प्रफुल्ल सुमनाची भर टाकली होती. तें फूल अजूनहि तसेंच प्रफुल्ल आहे, त्याच्या किसलयाची शोभा आणि परागांचा सौरभ अजूनहि तसाच आहे हें त्यांच्या १९५० सालीं प्रसिद्ध झालेल्या 'उन्मेष आणि उद्रेक' या कवितासंग्रहाने सिद्ध केलें. त्यांत कल्पनांचा 'उन्मेष' आहे, भावनांचा 'उद्रेक' आहे, 'बीजेची चंद्रकोर' आहे, 'चवथीचा चांद' आहे आणि 'अष्टमीचं चांदणं'हि आहे. 'पौर्णिमेचा चंद्र' मात्र अजून उगवायचा आहे.

'पिचलेला पावा' या संग्रहाप्रमाणेच 'उन्मेष आणि उद्रेक' यांतील सुरुवातीच्या कविता तारुण्यसुलभ प्रणयभावनेभोवतीच आवर्तनें घेतात. प्रेमभंगाचा निःश्वास टाकणारा 'मायाविनीं' तला नायक म्हणतो—

गोड गोड बोलुनी पाडसी कशास मज मोहिनी ?
भावभाविपण तुझें हें न मज नवें जादुगारिणी !
(उ. आणि उद्रेक पृ. ९)

'विरहविलाप' (पृ. १०), 'गेले! ते दिन गेले!!' (पृ. ११) इत्यादि सुरुवातीच्या कवितांत वंचित प्रेमिकांचें आक्रंदन ऐकू येतें. 'एकजीव होईलना?' (पृ. १९) 'भयविवशा' (पृ. १३), 'कसें धरावें तुज हातीं?' (पृ. ४६) इत्यादि भावगीतांत

एकजीव होईल ना आपुला ? शुभांगे !
जुळतिलना उभयांचीं विलग अंतरंगें ? (पृ. १२)

अशी प्रेमिकांच्या अंतःकरणांतली आशंका व्यक्त झाली आहे.

प्रस्तुत संग्रहांत इतरहि प्रेमगीतें आहेत. It is better to be loved and lost than never to be loved at'all ही काव्यवाणी साऱ्याच कवींना लागू पडते की काय कुणाला ठाऊक! 'उन्मेष आणि उद्रेक' मधल्या इतर प्रेमगीतात प्रीतीची आशंका किंवा हुरहूर, प्रणयभंगाची आतंत

आणि विद्वता व प्रीतीकरिता प्राणार्पण करणाऱ्या पतंगाची आत्मसमर्पणाची हुरहूर नसून सफल प्रेमाचे सुखोन्मेष आहेत. 'पिचलेल्या पाव्यां'त पंडितांची भूमिका एका कलंदर प्रेमिकाची होती; 'उन्मेष आणि उद्रेकां'त ती एका संतृप्त प्रेमिकाची आणि अपत्यवत्सल 'गृहस्थाची' आहे.

तरुणीच्या वेणींतली 'वेणी' पाहून त्यांतला प्रेमिक म्हणतो--

वघुनि गजऱ्यांतल्या
उमलणाऱ्या कळ्या
कल्पिलें-चमकते चांदणी चांदणी (पृ. २४)

तिच्या निळसर पांढऱ्या वस्त्राकडे पाहून त्याला आकाशगंगेची आठवण होते, तिच्या गोल चेहऱ्याकडे पाहून त्याला पूर्णचंद्राची कल्पना सुचते आणि शेवटीं तो म्हणतो--

रम्य अति साम्य हें
पाहुनी संभ्रमें
मानिलें पूर्णिमा तुजसि तनुधारिणी (पृ. २४)

'लावि विलंब न' (पृ. २६), 'शुभमंगल दिन' (पृ. २७), 'निद्रावश रमणी' (पृ. २८) 'माझी प्रिया सावळी' (पृ. २९), 'प्रमयप्रभाव' (पृ. ४४) '-तूंच' (पृ. ४७), 'सहसंचार' (४९) इत्यादि कवितांतून प्रणयपूर्तीचे सुखोन्मेष दिसतील, 'अपत्यसंभवां'तून (पृ. ४२) 'पहिल्या' मुलाची सुखद जाणीव दिसेल तर 'घराकडे परततांना-' (पृ. ५०) 'घराकडे-' (पृ. ६६) इत्यादिकांतून 'घरा'विषयी लागलेली हुरहूर प्रत्ययाला येईल, प्रस्तुत संग्रहांतली 'त्यागी उपेक्षिता' देखील म्हणते--

आनंदें नांद तुझ्या नववधूसवें
भोगा उपभोग्य योग्य जें नवें नवें
लाभो तुज सौख्य सख्या ! हेंच मज हवें,
विसर मला ! छाया परि त्यजि न भानुला !
(पृ. २१)

प्रस्तुत संग्रहांतल्या एका ओजस्वी सुनीताचा उल्लेख मुद्दाम करावासा वाटतो.

नाही ना जडलें पिसें तुज ? अरे चंद्रा कलानायका
पृथ्वीलागि प्रदक्षिणा करित या कां राहसी सारखा ?
* * *
प्रेमाचें तव मोल ना तिजसि, ती सूर्यासभोंती फिरे,
राहे निश्चल तो, तरी उलट ती पायीं तयाच्या झुरे
(पृ. ३३)

'प्रेम व व्यवहार' मधल्या या ओळी वाचून कुसुमाग्रजांच्या 'पृथ्वीच्या प्रेमगीता'ची कुणालाहि आठवण होईल. पंडितांचें हें सुनीत 'ज्योत्स्ना' मासिकांत १९३६ सालीं प्रसिद्ध झालें होतें. त्यानंतर लवकरच कुसुमाग्रजांचें 'पृथ्वीचें प्रेमगीत' बाहेर आलें. कुसुमाग्रजांनी पंडितांची कल्पना उचलली असें मला म्हणायचें नाही. 'पृथ्वीच्या प्रेमगीता'चा उगम 'वसुंधरेच्या वल्लभारावनें'त आहे. (कवि-अरुणोदय; विविधज्ञानविस्तार, एप्रिल १९२५) पण इथे तोहि मुद्दा प्रस्तुत नाही. दोन कवींच्या मनांत साधारणतः एकाच वेळीं सारख्या कल्पना कशा उद्भवूं शकतात हें दाखवावें एवढाच माझा उद्देश आहे. असो.

'पिचलेल्या पाव्यां'तील पंडितांची स्वयंकेंद्रित प्रतिभा 'उन्मेष आणि उद्रेकां'त विकसित झाली आहे. 'कामकन्या'च्या (पृ. ४०) आणि 'श्रमजीव्यां'च्या (पृ. ६४) अंतःकरणाशीं समरस होऊन ती विकलतेचा टाहो फोडते. 'जाति जातिल निघुनि हेहि दिन' (पृ. ५६) असा त्याला दिलासा देते. (पृ.५६,) 'पिढ्यापिढ्यां'च्या भांडवलावर श्रीमंत होऊन बसलेल्या 'कलिकुबेरा'ला--

भाग्यक्षण नच यांचे आता
समतावादी उगवे सत्ता
जिरविल यांचा मद ती पुरता
स्वतंत्र, न्यायी, ती बलवत्तर (पृ. ६)

असा दरडावणीचा इशारा देते आणि

जन्म कुल रूढी हें सर्व कांही नुरे !
पूर्ण समभावना जीवमात्रीं भरे !
जो श्रमी, जो गुणी त्यास लक्ष्मी वरे !
मनुजजीवन सुखी, शांत निर्भय असो ! (पृ. ५३)

असें 'क्रांतिस्तोत्रहि गाते. सौंदर्य, माधुर्य आणि सौकुमार्य यांचा आस्वाद घेतांनाहि स्वतःच्या कुलीनतेचें विस्मरण होऊं न देणाऱ्या 'पिचलेल्या पाव्यां'तील (कुलीनता, पृ. ९०) आत्मनिष्ठ प्रतिभेचा हा सामाजिक आविष्कार अभिनंदनीय नाही असें कोण म्हणेल ? वृक्षाला आधी फूल लागतें, त्यांतून फळ आकारास येतें आणि मग त्याचें पिकलेल्या फळांत रूपांतर होतें. 'पिचलेल्या पाव्यां'त पंडितांची भूमिका फुलाची आहे, 'उन्मेष आणि उद्रेकां'त साकार होऊं लागलेल्या फळाची आहे. पण तें फळ अजून पिकलेलें नाही, पिकलेल्या फळांतील रस चाखायचा असेल तर त्यांच्या 'सुवास आणि रस' या लवकरच प्रसिद्ध होणाऱ्या काव्यसंग्रहाकडे वळावयास हवें. (अपूर्ण)

ग्रंथ समालोचन

श्रीरामदास : वाङ्मय आणि कार्य

महाराष्ट्रांतील एक संतवाङ्मयाभ्यासक व टीकाकार प्रा० नरहर रघुनाथ फाटक यांनी 'मौज-प्रकाशन'च्या संतवाङ्मयमालेंतील हें तिसरें पुष्प गुंफिलें आहे. मलपृष्ठाच्या मागील बाजूस कर्त्याच्या छबीखाली त्याचा परिचय छापण्यांत आलेला आहे. त्यांत प्रस्तुत ग्रंथाच्या कर्त्याने 'टिळक चरित्रा'चें, व चिपळूणकरांच्या कार्याचें केलेलें परीक्षण मार्मिकता व लेखणीचा मर्म-भेदकपणा या गुणांमुळे गाजलें, आणि रामदासांच्या राजकारणाचा जुना वाद (तो या ग्रंथांतहि आलेला आहे) 'समर्थचरित्रां'त त्याने निकालांत काढला असें प्रकाशकाचें मत आहे. लेखकासंबंधी इतकी भाविक पूज्यबुद्धि बाळगणारा प्रकाशक प्रा• फाटक यांस लाभला हें त्यांचें भाग्य !

'ज्ञानेश्वर' व 'एकनाथ' या ग्रंथांप्रमाणेंच 'श्रीरामदास' हा ग्रंथ विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांस मोठा उपयुक्त वाटेल. कर्त्यानें रामदासांच्या कार्याचें व वाङ्मयाचें सांगोपांग विवेचन केलें आहे. विवेचनांत समर्थांनी इतर संतांप्रमाणेच देवकारण केलें, ईश्वरोपासना शिकविली असा सूर सर्वत्र आहे आणि मधून मधून समर्थांच्या 'राजकारणा'वर टीकाहि आहे. समर्थांनी 'राजकारण' केलें काय ? हा मोठा खडेजंगी चर्चेचा विषय आहे. स्वराज्यस्थापनेंत त्यांचें अंग होतें काय ? हा वाद फार वर्षांपूर्वी केसरींत श्री. आठल्ये नांवाच्या गृहस्थांनी उपस्थित केला होता. त्यावर मोठी उद्बोधक चर्चा होऊन केसरीकारांनी 'अस्सल' पत्र-व्यवहार उपलब्ध होईपर्यंत जास्त वाद करणें इष्ट नाही असा निर्णय दिला होता. हाच जुना वाद पुन्हा एकदा निकालांत काढण्याचा नवा प्रयत्न कर्त्यानें केलेला आहे. प्रस्तावनेंत लेखकाने या विषयाचा उहापोह केलेला आहे. तसेंच 'राजकारण' व 'महाराष्ट्र-धर्म' या प्रकरणांत आपलीं जुनींच मतें पुन्हा मांडलेलीं आहेत. फाटकांनी 'रामदासांच्या राजकारणा'वर फार पूर्वी चर्चा केलेली आहे. इतकीं वर्षें लोटल्यानंतरहि त्यांच्या मतांत कांहीहि अंतर पडलेलें नाही. चिपळूणकर, टिळक इत्यादींच्या कार्यासंबंधी फाटकांचीं मतें आहेत तशींच आहेत. सुसंगतपणा हा फाटकांचा गुणधर्म आहेच मुळी !

समर्थ सर्व संतांमध्ये activist संत होते. सामाजिक उच्चनीच भेदांची तीव्रता कमी करून बंधुभावाची व भक्तीची शिकवण ज्ञानेश्वर-तुकारामादि भागवतधर्मीय संतांनी महाराष्ट्र जनतेला दिली. स्वधर्माचा, स्वसंस्कृतीचा व मायभाषेचा—मराठीचा—अभिमान जागृत केला. स्वधर्मावर आलेलीं गंडांतरें पाहून संतकवींना वाईट वाटत असे. एकनाथांना स्वकर्तव्य समजत होतें पण परकीय सत्तेच्या दडपणाखाली बोलून दाखवितां येत नव्हतें. या उलट समर्थांनी स्वधर्माची शिकवण तर दिलीच पण देशस्थितीचा उल्लेख करून स्वराज्यासाठी उघड प्रयत्न केले. बहुजन समाजांत अखंड संचार करून ठिकठिकाणीं मठ व मारुतीचीं देवळें स्थापून त्यांनी स्वधर्माचा अभिमान जागृत केला. अध्यात्माबरोबरच स्वातंत्र्याची जाणीव उत्पन्न केली. स्वराज्यस्थापनेस 'नैतिक बळ' (moral force) निर्माण केलें. 'शिवरायाचा आठवावा प्रताप', 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र-धर्म वाढवावा' हे त्यांचे उद्गार त्यांच्या स्वराज्य-प्रीतीचे द्योतक आहेत. 'आनंदवनभुवन' दुःखांत बुडालेलें पाहून, समर्थांनी बहुजन समाजाला परचक्राची जाणीव करून दिली व लोकजागृतीचा पराकाष्ठेचा प्रयत्न केला. याद‍ृष्टीने इतर संतांचें जीवन निरर्थक होतें. 'स्वराज्या'ची समर्थांना तळमळ लागून गेली होती म्हणून त्यांनी अध्यात्म-विचाराबरोबरच सामाजिक

निःश्रेयस निर्माण करणारा महाराष्ट्र–धर्म शिकविला. समाजाच्या सर्वांगीण जीवनाचें 'दासबोधां'त दर्शन होतें, कारण समर्थांची तीव्र दृष्टि आणि तळमळ. महाराष्ट्राचें गोमटें करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यांचें काव्य त्यांच्या वृत्तीचें सूचक आहे. त्यांचें वर्णन रघुनाथपंडिताने 'जो लेखणीसहित कागद दौती वाहे' असें केलें आहे. अखंड प्रवासांत समर्थ काव्य रचीत असत. अशा या अलौकिक विभूतीच्या वाङ्मयाचें व कार्याचें विवेचन प्रा. फाटक यांनी या ग्रंथांत केलें आहे. समर्थांच्या राजकारणासंबंधीच्या वादांत जिज्ञासूंनी इतर समर्थ–वाङ्मयाच्या अभ्यासकांचें लिखाण वाचावें व विवेकशील मनाने निर्णय घ्यावा.

हा ग्रंथ प्रा. फाटक यांच्या पूर्वीच्या दोन्ही ग्रंथांप्रमाणेच उपयुक्त व अभ्यसनीय आहे.

—पां. ब. गाडगीळ

श्री. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य

[प्रकाशक : मौज प्रकाशन लि., गिरगांव, मुंबई ४; पृष्ठसंख्या ३६०, किंमत सहा रुपये]

१ विद्यापीठांत इतर भाषांतील वाङ्मयाप्रमाणें 'मराठी वाङ्मया'च्या अभ्यासाला मानाचें स्थान मिळून, मराठींतील थोर ग्रंथांचें सोपपत्तिक व चिकित्सक अध्ययन व अध्यापन सुरू झालें, तेव्हापासून गेल्या वीस पंचवीस वर्षांत महाविद्यालयीन अभ्यासाच्या दृष्टीने मार्गदर्शक म्हणून अंगुलिनिर्देश करण्यासारखे जे महत्त्वाचे वाङ्मयसमीक्षेचे ग्रंथ निपजले त्यांत प्राध्यापक न. र. फाटक यांच्या प्रस्तुत ग्रंथाची गणना करावी लागेल. महाविद्यालयीन अभ्यासांत इतर भाषांतील वाङ्मयकृतींचें मोजमाप करतांना जे निकष लावले जातात, ग्रंथाची थोरवी ज्या वाङ्मयगुणदोषांच्या मीमांसेने तोलली जाते, रसग्रहण ज्या रसिकतेने केलें जातें, ते ते निकष, ती ती मीमांसा व ती ती रसिकता मराठी ग्रंथाच्या बाबतींत तुलनात्मकतेने लावून परीक्षण करण्याची इच्छा मराठी वाङ्मयाच्या जिज्ञासु अभ्यासकांना झाल्यास नवल नाही. मराठी वाङ्मयांत 'संतवाङ्मया'ला मानाचें स्थान आहे. मराठी वाङ्मयाला प्रकर्षाला आणण्याची महत्त्वाची कामगिरी संतांनी केली हें सर्वमान्य आहे. त्यामुळे संतवाङ्मयांतील महत्त्वाच्या ग्रंथांचा अभ्यास करणें विद्यार्थ्यांना प्राप्त होतें. तथापि भाविकपणाने व धार्मिकवृत्तीने ग्रंथाचा अभ्यास करणें वेगळें आणि विद्यापीठांतील चिकित्सापूर्ण व सोपपत्तिक अध्ययन वेगळें. वाङ्मयांतील इतर उच्च ग्रंथ वाचतांना मनांत येणाऱ्या शंका किंवा बुद्धीला उघड वाटणारी विसंगति ज्या मोकळ्या मनाने चर्चिली जाते व भावनाविवश न होता, बुद्धीला शरण जाऊन विचारांचें मंथन ज्या निरपेक्षपणे केलें जातें ती मनाची समतोल वृत्ति 'संतवाङ्मया'चा अभ्यास करतांना कशी ठेवावयाची हा महत्त्वाचा प्रश्न आहे. प्राध्यापक फाटक यांनी विद्यार्थ्यांची नाडी नीट पारखून प्रस्तुत ग्रंथांत योग्य मार्गदर्शन केलें आहे याची प्रतीति वाचकांना येईल.

२. ग्रंथांतील प्रस्तावनेवरून प्राध्यापक फाटक यांनी 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाच्या अभ्यासासंबंधी केलेली 'साधना' पाहिल्यास, या विषयासंबंधी बोलण्याचा व मार्गदर्शन करण्याचा त्यांचा केवढा अधिकार आहे याची कल्पना येईल; तसेंच या ग्रंथाच्या जन्मकथेचा वृत्तांत त्यांनी जो दिला आहे त्यावरून त्यांच्या दृष्टीपुढे विद्यापीठांतील मराठीचे जिज्ञासु विद्यार्थीच आहेत हें दिसून येईल. " 'ज्ञानेश्वरी' संबंधाने बी. ए., एम. ए. च्या विद्यार्थ्यांकरिता वेळोवळीं दिलेल्या व्याख्यानांचा सारांश 'सत्यकथे'त प्रथम लेखरूपाने अनुक्रमाने आला. त्यांचा विकास होऊन 'ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी' हें पुस्तक प्रकाशित झालें; नंतर अधिक महत्त्वाची भर घालून प्रस्तुतचा सुमारें ३६० पानांचा विस्तृत ग्रंथ रचला गेला. 'पूर्वीचें पुस्तक पृष्ठसंख्येने अगदी लहान होतें. त्यांतील कित्येक विधानें स्पष्टीकरणाच्या अभावीं अनेकांना संदिग्ध व निराधार वाटतात असा अनुभव आल्यामुळे आता शक्य तेवढ्या विस्तारानें अशीं विधानें स्पष्ट केलीं आहेत. पूर्वी जेथे एखाद्या विषयाचें केवळ दिग्दर्शन होतें, तेथे आता त्याचें विवेचन जोडलें आहे. पूर्वीच्या आवृत्तींत 'अनुभवामृता'चा परामर्श नव्हता, ज्ञानेश्वराचें चरित्र नव्हतें, तें सर्व या आवृत्तींत दाखल केलें आहे. त्यामुळे आताचें पुस्तक मागच्या आवृत्तींच्या चौपट वाढावें यांत नवल नाही" (प्रस्तावना, पान ११),

३. ग्रंथाची रचना करतांना प्राध्यापक न. र. फाटक यांच्या नजरेपुढे विशिष्ट धोरण व हेतु आहे. ज्ञानेश्वरी वाङ्मयाचे निरनिराळे पैलू दाखवितांना, निरनिराळ्या प्रकरणांच्या प्रतिपादनांत त्या धोरणाचा

धागा सर्वत्र अनस्यूत झालेला वाचकांना 'आढळेल. ' ज्या शिकवणुकीमुळे इस्लामी वर्चस्वाखाली महाराष्ट्रांतील हिंदूंचा धर्म जिवंत राहूं शकला, त्या शिकवणीमागे इस्लामी आक्रमणाची उत्कट जाणीव असली पाहिजे. एरव्ही ती शिकवण मुसलमानांच्या तडाख्यांतून वैदिक धर्माचें रक्षण करण्यास समर्थ ठरली नसती हें सहज कळणारें आहे. ही जाणीव ज्ञानेश्वरीमध्ये स्पष्ट शब्दामध्ये नसली तरी त्या ग्रंथांतील उपदेशाचा रोख तपासला म्हणजे तिचा बोध होऊं शकतो....ह्या बोधाची पाहणी व छाननी केली आहे. ' (प्रस्तावना पा. ५, ६). सारांश ज्ञानेश्वरीवाङ्मयाच्या अभ्यासकांना ज्ञानेश्वरीच्या शिकवणीचें ऐतिहासिक, तात्त्विक आणि वाङ्मयात्मक स्वरूप समजावें अशी ग्रंथाची घडण झालेली आहे.

४. ग्रंथांत एकूण दहा प्रकरणें आहेत. संत व त्याचें कार्य, ज्ञानेश्वराची भूमिका, वाङ्मयांतील कथनकौशल्य, कर्मयोग, आदर्श पुरुष, वाङ्मयचातुर्य, गीतार्थ, व्यासंग व स्वभाषाभिमान, अनुभवामृत आणि उपसंहार. यांपैकी कोणतेंहि प्रकरण आपण वाचूं लागलों म्हणजे संतवाङ्मयाचें सूक्ष्म व तौलनिक वाचन, ऐतिहासिक व्यापक दृष्टि, रसग्राही व मार्मिक समीक्षता, 'नामूलं लिख्यते किंचित्' या बाण्याने बळकट पुराव्याच्या आधारावर विधानांची केलेली उभारणी आणि सुबोध व ओघवती भाषा इत्यादि लेखकाच्या अंगच्या गुणांची प्रतीति वाचकांना पदोपदीं येईल.

५. वाङ्मयांतील कथनकौशल्य, वाङ्मयचातुर्य, गीतार्थ, व्यासंग व स्वभाषाभिमान व उपसंहार हीं प्रकरणें वाचकांना विशेष आवडतील. या प्रकरणांतून केलेलें ज्ञानेश्वरांच्या लेखनशैलीचें व गुणांचें सोपपत्तिक विवरण, तसेंच ज्ञानेश्वरांच्या आयुष्यांत घडलेल्या अद्भुत घटनांची व तत्संबंधीच्या आख्यायिकांची ऐतिहासिक दृष्टीने फोड करण्यांत दिसणारें कौशल्य वाचकांचें मन वेधून टाकील. पहिल्या व दुसऱ्या प्रकरणांत संतांवरील आरोप व ज्ञानेश्वरांच्या कार्याची भूमिका यांचें विवेचन करतांना लेखकाचा बहुश्रुतपणा, महत्त्वाच्या ग्रंथांचें सूक्ष्म अवलोकन, इतिहासांतील घडामोडीचा, उपलब्ध ऐतिहासिक साधनांचा व साधनग्रंथाचा खोल अभ्यास इत्यादि गुण प्रशंसनीय व अनुकरणीय वाटतील. विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा ग्रंथ महत्त्वाचा आहे, तसाच तो सामान्य वाचकांच्या वाचनालाहि विशिष्ट वळण व दृष्टि देणारा आहे. अध्यात्माच्या खोल पाण्यांत शिरण्याची ज्यांना शक्ति नाही, व त्या कारणासाठी जे ज्ञानेश्वरीला दुरूनच वंदन करून समाधान मानतात त्या वाचकांना ज्ञानेश्वरीचा आस्वाद घेण्याची पात्रता व मार्ग प्रस्तुत ग्रंथाच्या वाचनाने निःसंशय लाभेल.

प्रस्तुत ग्रंथांतील कांही कांही विधानांबद्दल सर्वच जण सहमत होतील असें नाही. तथापि प्रा. फाटक यांनी आपल्या विधानांना पुराव्याचा आधार देऊन तीं विधानें केलीं आहेत हें लक्षांत घेणें अवश्य आहे. 'मला असें वाटतें' असें केवळ न म्हणतां, आपल्या म्हणण्याची सुसंगति दर्शविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. 'महानुभाव, वीरवैष्णव किंवा वीरशैव यांच्या भक्तिमार्गामध्ये कित्येक बाबतींत जो कडवा आग्रह आढळतो, तो नाथपंथाने टाळला. त्याबरोबरच ब्रह्ममीमांसेंतील स्त्रीशूद्रादि भेदालाहि त्याने टाळा दिला. भेदांतच हिंदु समाजाचें मरण आहे.' (पान ३०) हें विधान चिंतनीय आहे. 'भागवत धर्म प्राचीन खरा पण त्याचा प्रभाव ज्ञानेश्वरीच्या कामगिरीमुळे नव्याने दिसूं लागला' (पान ४०) यासंबंधी पुस्तकांत ज्या तऱ्हेचीं गमकें दिलीं आहेत तशाच प्रकारचीं गमकें महानुभावीय ग्रंथांतून दिलीं तर प्रा. फाटकांना तीं पटतील की नाही हें सांगतां येत नाही. नाथपंथ, महानुभावपंथ व यांसारखे इतर पंथ यासंबंधी पुरेसें वाङ्मय अजून प्रकाशांत आलें नाही. तेव्हा त्यांची उपपत्ति अजून सिद्धांत पदवीला पोचावयाची आहे.

आता अगदी क्षुल्लक पण अनेक ठिकाणीं आढळणारी व खटकणारी एक अनवधानाची बाब दर्शवून हें प्रकरण आटोपतें घेऊं. गी ताशास्त्राचें (पान ३४७, ओ. १), 'गी तातात्पर्यार्थ (पा. ३४७, ओ. ५), 'गी तोक्त' (३४५, ओ. ३) 'गी ताटिकेंत' (पा. ३४३, ओ. ७) इत्यादि जागीं 'गी 'फारच दूर पडलेली आहे. त्यामुळे वाचतांना एकदम अडखळल्यासारखें होतें. असो.

अशा प्रकारें मराठीच्या अभ्यासकांना उपयुक्त अशा ग्रंथाची रचना करून, मराठी वाङ्मयांत अमोल भर टाकल्याबद्दल प्रा. न. र. फाटक यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. पुस्तकाची सुंदर छपाई, मलपृष्ठावरील श्रीसरस्वतीचें दर्शनी चित्र इत्यादि गोष्टींनी ग्रंथाचें बहिरंग आकर्षक केल्याबद्दल प्रकाशकहि स्तुतीस पात्र आहेत.

—ह. ना. नेने

सं घ वा र्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त, नागपूर

मताधिकार सभासदांच्या यादींतील दुरुस्ती

डिसेंबर १९५३ च्या 'युगवाणी'च्या अंकांत १९५४–५५ सालासाठी होणाऱ्या कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीसंबंधी मतदारांची यादी प्रसिद्ध झाली आहे. या यादीसंबंधी आलेल्या तक्रारींचा विचार करून अध्यक्षांच्या निर्णयानुसार, खालीलप्रमाणे दुरुस्ती–पत्रक जोडण्यांत येत आहे.

दिनांत २०–१२–५३
केन्द्रीय कार्यालय,
नागपूर १

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ

मताधिकारी सभासद (अ) विभाग

नागपूर जिल्हा

(१) श्री. वि. श्री. विझे, महाजन चाळ, सितावर्डी, नागपूर, र. क्र. ४५ हें नांव (ब) विभागांत पान २४ वर चुकून पडलें आहे तें (अ) विभागांत आहे, असें समजावें.

(२) श्री. राम शिंदे, र. क्र. १७० पान ७, यांचा पत्ता भाषाविभाग, रामदास पेठ, नागपूर १, आहे.

(३) श्री. ह. कृ. भावे, र. क्र. २२७ रेल्वे कॉलनी, रेलटोली, गोंदिया.
श्री. रा. मा. वाईकर, र. क्र. २२६ सिव्हिल लाईन्स, गोंदिया.

वरील दोन्ही नांवें (अ) विभागांतून गळलीं आहेत. तीं (अ) विभागांत आहेत असें समजावें.

विभाग (अ) पान ९ र. क्र. ८० श्री. रा. य. असेरकर, असें नांव चुकीनें पडलें आहे. त्याऐंवजी श्री. रा. ल. असेरकर असें वाचावें.

विभाग (अ) पान ९, र. क्र. १६०, श्री. व. बा. ग्रामस्थ असें न वाचतां श्री. वा. बा. ग्रामस्थ, असें वाचावें.

विभाग (अ) पान १०, र. क्र. ११३, श्री. वि. या. भागवत असें न वाचतां श्री. चिं. ब. भागवत असें वाचावें.

विभाग (अ) पान १०, र. क्र. १७. श्री. म. मो. मैराळ असें न वाचतां मो. मा. मैराळ, असें वाचावें.

खालील नांवें चुकून (ब) विभागांत पडलीं आहेत तीं (अ) विभागांतील आहेत, असें समजावें.

(१) श्री. म. बा. टेंभेकर, र. क्र. १११, रेलटोली, गोंदिया. (पान २७)

(२) श्री. पु. वि. फडणवीस, र. क्र. ११०, ईस्टर्न रेल्वे, गोंदिया. (पान २७)

श्री. ना. तु. गोसावी, वकील, भंडारा, र. क्र. १७८ (पान ८) हें नांव (अ) विभागांत साधारण सभासदांचे यादींत आहे, त्याऐवजी त्यांचें नांव (अ) विभाग आजीव सभासदांत आहे असें समजावें.

वर्धा जिल्हा

श्री. शंकर बालाजी कुर्वे, शिक्षक, ऑक्सफर्ड हायस्कूल, वर्धा, र. क्र. ५, पान २९, हें नांव (ब) विभागांत साधारण सभासदांत पडलें आहे तें (अ) विभागांत आहे असें समजावें.

आकोला जिल्हा

र. क्र. ४, पान १५ श्री. लालचंद जिनदास जोशी, रहाळकर, वकील, मु. पो. रहाळ, त. वाशीम, जि. आकोला, असें नांव चुकून पडलें आहे. त्याऐवजी श्री. लालचंद जिनदासजी जोगी, हराळकर, एम्. ए., एलएल्. बी., वकील, मु. पो. हराळ, ता. वाशीम असें वाचावें.

मताधिकारी सभासद (ब) विभाग

नागपूर जिल्हा:—

र. क्र. ११०, पान २४, श्री. मधुकर शंकर वावगावकर c/o रमेश वावगावकर, अकाउंटस् ब्रँच, एस्टॅब्लिशमेंट सेक्शन, सिव्हिल सेक्रेटरीएट, नागपूर १ या पत्त्याऐवजी श्री. मधुकर शंकर वावगावकर, पंचवल्ली यांचें घर, जुनी रामदास पेठ, नागपूर १, असें वाचावें.

भंडारा जिल्हा—

र. क्र. १६४, पान २७. श्री. पंढरीनाथ गोपाळराव गायकवाड, शिक्षक, गोंदिया खुद गोंदिया असें नांव चुकून पडले आहे. त्या ऐवजीं श्री. गोपाळराव पंढरीनाथ गायकवाड, असें वाचावें,

र. क्र. ८१, पान २७. श्री. वा. मो. देशपांडे, कॉटेज इंडस्ट्रीज, रेलटोली, गोंदिया असें नांव चुकून पडलें आहे त्याऐवजीं श्री. बा. मे. देशपांडे असें वाचावें.

(१) श्री. आकाशानंद, र. क्र. २२४, c/o कॉटेज इंडस्ट्रीज, आनंदनगर, गोंदिया.

(२) श्री. रा. वा. काटे, र. क्र. २२५, रेलटोली, गोंदिया.

वरील दोन्ही नांवें नजरचुकीनें (ब) विभागांतून गळलीं आहेत. तीं (ब) विभागांतील आहेत, असें समजावें.

र. क्र. १५१ पान २७. श्री. न. द. बोरकर, एजंट, इंपेरिअल बँक, गोंदिया, असें नांव चुकून पडलें आहे. त्याऐवजीं श्री. न. दि. बोरकर असें वाचावें.

श्री. वि. कृ. मोघे र. क. २०४, (पान २६) भंडारा हें नांव (ब) विभागांत साधारण सभासदांचे यादींत आहे, तें नांव (ब) विभाग आजीव सभासदांत आहे, असें समजावें.

श्री. मनोहर यादवराव गणोरकर, शिक्षक, समर्थ विद्यालय, लाखनी यांचा र. क्र. सुटला आहे. तो ११५ आहे, असें समजावें.

वर्धा जिल्हा:—

र. क्र. ७, पान ३०. वरील पत्ता खाली दिल्याप्रमाणे वाचावा —

श्री. अब्दूल अजीज कुरैशी, अध्यापक, काबिल, साहित्यरत्न c/o शेखजमाल व्हॅक्सिनेटर, मटनमार्केटजवळ, हिंगणघाट

र. क्र. ६, पान २९——श्री. नरहर केशव पुराणिक, सबरजिस्ट्रार, रामनगर, वर्धा हें नांव साधारण सभासदांत (ब) विभागांत आहे. पण त्यांचा पत्ता खालीलप्रमाणे बदलला आहे——श्री. नरहर केशव पुराणिक, सबरजिस्ट्रार, डिस्ट्रिक्ट ऑफिस, नागपूर.

अमरावती जिल्हा

र. क्र. १८६ पान ३१——श्री. द. त्र्यं गर्गे, शिक्षक, न्यू हायस्कूल, सोमण कॉन्ट्रॅक्टरचा बंगला अमरावती असें नांव चुकून पडलें आहे. त्याऐवजी श्री. द. ग. गर्गे, शिक्षक, न्यू हायस्कूल, सोमण कॉन्ट्रॅक्टरचा बंगला, बडनेरा रोड, अमरावती असा वाचावा.

र. क्र. ५७, पान २२ श्री. वसंत त्र्यंबक पांडे, कलेक्टर ऑफ सेंट्रल एक्साईज, पोस्ट बॉक्स नं. ८१, नागपूर——हें नांव नागपूर जिल्हा (ब) विभाग—साधारण सभासदांत आहे. हें नांव अमरावती जिल्ह्यांत (ब) विभागांत आहे, असें समजावें. पत्ता—श्री. वसंत त्र्यंबकराव पांडे, विलनपुरा—अचलपूर शहर, जि. अमरावती

(ब) विभाग, र. क्र. २, पान ३८, श्री. रा. के. सराफ c/o श्री. के. आ. सराफ, डी. वाय. एस. पी. रायपूर यांचा बदललेला पत्ता खालीलप्रमाणे वाचावा.

श्री. रा. के. सराफ, c/o श्री. के. आ. सराफ, डी. वाय. एस. पी., अमरावती कॅम्प

*

गोंदिया-शाखावृत्त

दिनांक १६—१२—१९५३ रोजीं वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेला, माननीय विकास मंत्री श्री. रा. कृ. पाटील यांनी भेट दिली; त्यावेळीं त्यांचा सत्कार होऊन, 'भाषावार—प्रांतरचना' यावर त्यांचें अतिशय सुंदर व मुद्देसूद भाषण झालें.

शाखासंमेलन दिनांक १६ व १७ जानेवारी १९५४

शाखेचें वार्षिक संमेलन दिनांक १६ व १७ जानेवारी १९५४ रोजीं संघाध्यक्ष प्रा. भ. श्री. पंडित यांच्या अध्यक्षतेखाली भरणार आहे. त्यावेळीं श्री. पु. ल. देशपांडेकृत 'भाग्यवान' नाटकाचा प्रयोग करण्यांत येईल.

ना. ग. डबीर, चिटणीस
वि. सा. संघ, शाखा—गोंदिया

अनुक्रमणिका

१९५४—५५ सालासाठी

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष आणि कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकीविषयी सूचना

१. या निवडणुकीसाठी मतदानाची तारीख ६ मार्च १९५४ निश्चित झाली आहे.

२. मतदार सभासदांची 'अ' आणि 'ब' विभागांची यादी 'युगवाणी'च्या डिसेंबर १९५३ च्या अंकासोबत सर्व मतदार सभासदांकडे पाठविली आहे.

३. निवडणुकीस उमेदवार म्हणून उभे राहण्याचा अधिकार, सभासद होऊन ज्यांना संघाच्या नियमाप्रमाणे एक वर्ष झालें असेल अशाच सभासदांना आहे. अशीं नांवें 'अ' विभागाच्या यादींत आहेत. तेव्हा मतदारांच्या 'अ' विभागांतील कोणत्याहि व्यक्तीस निवडणुकींत उमेदवार म्हणून उभे राहण्यास पात्र असलेल्या कोणत्याहि व्यक्तींचें नांव तिच्या लेखी अनुमतीसह, कोणाहि मताधिकारी सभासदाला सुचवितां येईल.

४. निवडणुकीसाठी उमेदवारांचीं नांवें २६ जानेवारी १९५४ रोजीं सायंकाळीं ६ वाजेपर्यंत केन्द्रीय कार्यालयाकडे सरचिटणिसांच्या पत्त्यावर पाठविलीं गेलीं पाहिजेत.

५. ३० जानेवारी १९५४ रोजीं सायंकाळीं ६ वाजेपर्यंत कोणाहि उमेदवारास आपली उमेदवारी परत घेतां येईल.

६. कार्यकारी मंडळासाठी एक अध्यक्ष व सोळा सभासद यांची निवडणूक होईल.

दिनांक २०-१२-१९५३
केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता,
सीताबर्डी, नागपूर १.

ना. रा. शेंडे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संमेलन

प्रा. भवानीशंकर श्री. पंडित

यांचें

अध्यक्षीय भाषण

अधिवेशन १६ वें

खामगांव

अनुक्रमणिका

भाऊ–भाऊ

[स्त्रग्विणी–अपूर्ण]

हिंदभू आमुची माउली ही
अन् हिचीं लेंकरें सर्व आम्ही
एक कुक्षींतले भाउ–भाऊ
एक राहूं सदा एक राहूं.

भाउ–भाऊ असूं भिन्न देहीं
अंतरात्मा परी एक राही;
भांडुं–तंडूं पुन्हा एक होऊं
एक राहूं, असूं भाउ–भाऊ.

रक्त नाड्यांतुनी एक वाहे,
मांस पिंडांतलें एक आहे,
आमुचें एक प्रारब्ध आहे
सत्य आम्ही कसें विस्मरूं हें

प्रांतभेदांमुळे भिन्न आम्ही ?
भिन्न भाषांमुळे भिन्न आम्ही ?
कल्पना वाउग्या वा खुळ्या ह्या
जाहल्या वीचि कां वेगळाल्या ?

वेगळाल्या घरालागि खोल्या
त्या घरालागुनीही निराळ्या
तेंवि आम्ही असूं भाउ–भाऊ
एक गेहांतले एक राहूं,

●

नागपूर,
१४–८–४८

प्रकाशन,
'पूजा' स्वातंत्र्य दिनांक सप्टें. ४८

अनुक्रमणिका

आतां, अभिनव वाग्विलासिनी । जि चातुर्यकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥--ज्ञानेश्वरी १.२१

सन्मान्य स्वागताध्यक्ष, स्वागतकारिणीचे सदस्य आणि उपस्थित बंधुभगिनींनो !

१. प्रास्ताविक

विदर्भ साहित्य संमेलनाच्या सोळाव्या अधिवेशनाचें अध्यक्षपद देऊन आपण जो माझा बहुमान केला त्याबद्दल मी आपले अंतःकरणपूर्वक आभार मानतों. माझ्यापेक्षा वयाने ज्येष्ठ, अनुभवाने श्रेष्ठ आणि यशाने वरिष्ठ असे इतर साहित्यिक असतांना केवळ माझ्यावरील लोभाने आपण मला ही संधि दिली याबद्दल मी आपला कायमचा कृतज्ञ आहें.

२. श्रीपादांचें पुण्यस्मरण

आपलें हें खामगांव व्यापारी बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. व्यापार आणि रसज्ञता यांचा कुठला संबंध ? परंतु आपल्या या गांवाने महाराष्ट्राला श्रीपाद कृष्णांसारखा मार्मिक व रसिक साहित्यिक दिला होता. आजच्या या समारोहप्रसंगीं त्यांचें पुण्यस्मरण होणें अनिवार्य आहे. निबंध, कविता, कथा, कादंबरी, नाटक, विनोद आणि टीका या निरनिराळ्या साहित्यप्रकारांत त्यांची लेखणी सहज लीलेनें संचार करीत असे. परंतु त्यांतल्या त्यांत त्यांच्या प्रतिमेचा प्रत्यय शेवटच्या तीन प्रकारांत विशेषत्वाने येतो. नाटकाच्या इतिहासांत त्यांचा एक स्वतंत्र कालखंड आहे. स्वतंत्र कथानकें, नवे विचार, कल्पनासौंदर्य, कोटिबाजपणा आणि उर्दू चालीवरलीं गाणीं या अभिनवतेमुळे एके काळीं त्यांचीं नाटकें महाराष्ट्ररंगभूमीवर गाजलीं होतीं. तोतयाचें बंड हें नाटक आणि रागिणी ही कादंबरी यांवरील त्यांच्या टीका आपल्या मूलगामी व मर्मग्राही स्वरूपांमुळे अभ्यासकांस आजघटकेलाहि आदर्शभूत वाटत आहेत. विनोदाचे तर ते आद्य आचार्य आहेत. गंभीर आणि चिंतनशील प्रकृतीच्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरधरून हसावयास शिकवलें. त्यांच्या सुदाम्याचे पोहे मोठे खमंग, खुसखुशीत व खुमासदार आहेत. त्यांना दिलेली चटकदार फोडणी एके काळीं जुन्या मताच्या रूढिप्रिय सनातनी समाजास चांगलीच झोंबली होती. काळाच्या ओघांत श्रीपाद कृष्णांचें इतर वाङ्मय कदाचित् महाराष्ट्राच्या दृष्टिआड होईल. परंतु त्यांच्या उच्च अभिरुचीच्या अभिजात विनोदाचें त्याला कधीहि विस्मरण पडणें शक्य नाही. श्रीपाद कृष्णांनी मराठी साहित्यांत विनोदाचा पायंडा पाडला. त्याच परंपरेंत पुढे राम गणेश, आचार्य अत्रे, वि. स. खांडेकर आणि चिंतामणराव जोशी निर्माण झाले. विनोदाच्या या संप्रदायाचें आदिपीठ आपलें हें खामगांव आहे. आजच्या या संमेलनप्रसंगीं त्याच्या आद्य आचार्यांच्या पवित्र स्मृतीला मी विनम्र भावाने अभिवादन करतों.

३. प्रांतिक भाषांचें भवितव्य

साहित्यसंमेलनांत साहित्यविषयक विचारांचा खल व्हावा हें केव्हाहि योग्य व इष्ट होय. साहित्यांत त्या त्या काळांतले विचार, कल्पना व भावना यांचें प्रतिबिंब असतें. भाषा या सर्वांचें वाहन आहे. अर्थात् तिच्याविषयीचा विचार साहित्यांत अंतर्भूत होतो. म्हणूनच मी आज तिच्यासंबंधीं आपल्यासमोर थोडेंफार बोलणार आहे. भाषा ही जशी वाङ्मयाचें तशी व्यवहाराचेंहि माध्यम आहे. तिचें

स्वरूप असें दुहेरी आहे. तेव्हा माझ्या विवेचनांत वाङमय व व्यवहार या दोन्ही दृष्टींनी तिचा विचार होणें अपरिहार्य आहे.

पूर्वीच्या आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या आपल्या या भारताच्या परिस्थितींत महदंतर आहे. पारतंत्र्यांत आपल्या प्रांतिक भाषांना इंग्रजीचा सासुरवास व दु:स्वास होता. दारुण दास्याच्या दुर्दशेंत त्यांच्या स्वतंत्र विकासास वाव नव्हता. त्यांच्या प्रगतीस जागजागीं सीमा होत्या; आणि स्वच्छंद व्यापास कायद्याचीं कांटेरी कुंपणें होतीं. आता भारत स्वतंत्र आहे. तेव्हा त्याच्या पोटांतील प्रांतिक भाषांचें भवितव्य भव्य, दिव्य आणि आशादायक आहे याविषयी शंका घेण्याचें कांही कारण नाही.

भारत हें आपलें संघराज्य आहे. त्यांच्या घटनेनुसार हिंदीला संघराज्यभाषा म्हणून मान्यता मिळाली असून अन्य चवदा अभिजात व सुसंस्कृत प्रांतिक भाषांना राज्यभाषा म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. मराठी ही त्यांपैकी एक आहे. इंग्रजीला सध्या संघराज्यभाषा म्हणून पंधरा वर्षांची तात्पुरती सवलत मिळाली आहे. हळुहळू तिचें तें महत्त्व लुप्त होणार आहे.

४. संस्कृत, उर्दू व इंग्रजी

मान्यता मिळालेल्या चवदा राज्यभाषांपैकी संस्कृत, उर्दू व इंग्रजी या तीन भाषा कोणत्याहि एका विवक्षित प्रांताच्या भाषा नाहीत. संस्कृत ही सर्व प्रांतिक भाषांची आजी आहे. ती वयातीत असली तरी उपयोगी व उपकारी आहे. ती जात्याच संपन्न, समृद्ध व समर्थ आहे. ती प्रांतिक भाषांची टांकसाळ आहे. विज्ञानाच्या परिभाषेचा ती जीवंत व अखंड झरा आहे. आमच्यांतील बुद्धिमान वर्गांत तिचा अभ्यास जसा आजवर चालत आला आहे तसाच तो पुढेहि अव्याहत चालत राहणार आहे मात्र यापुढे तिला बहुजनसमाजाची भाषा होतां येणें शक्य नाही. व्याकरणाच्या कांटेकोर नियमांमुळे ती फार पूर्वीं बहुजनसमाजास सोडून गेली होती. तेव्हा पुन्हा तिचा संचार सर्वत्र व सार्वजनीन होईल अशी आशा करणें हें मागील इतिहासास व अनुभवास धरून होणार नाही.

उर्दू वस्तुत: हिंदीचें दुसरें नांव आहे. कारण तिला स्वत:चें व्याकरण नाही. तिचे शब्द जरी फारशी व अरबी असले आणि वाक्यविन्यास विस्कळित असला, तरी वाक्याचे मुख्य घटक जीं क्रियापदें आणि विभक्तिप्रत्यय, ते हिंदीच असतात. ' मी अंत:करणपूर्वक व छातीठोकपणें या गोष्टीस अनुमोदन देत आहे, ' या अर्थाचें वाक्य एकाद्या मौलवीच्या मुखानें पुढीलप्रमाणे बाहेर पडेल; --

" मेरे सीने के सिलसिले और दिल् के वलवले पुरअमन् पुरजोश इस बात की ताहीद करते है. "

या वाक्यांतील विभक्तिप्रत्यय व क्रियापद हिंदी आहे हें कुणाच्याहि सहज लक्षांत येईल. उर्दू, फारशी व अरबीचा अभ्यास इतिहासाच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु संस्कृत-प्रमाणेच तो इतिहासज्ञांच्या व विद्वानांच्या वर्तुळापुरता मर्यादित राहील. उर्दू ही यापुढे मुसलमानबंधूंची भाषा राहील. परंतु ते ज्या प्रांतांत राहतील, तेथील प्रांतिक भाषेंत त्यांना व्यवहार करावा लागेल.

इंग्रजी भाषा ही परक्या राज्यकर्त्यांची होती. ती त्यांच्याबरोबर भारत सोडून गेली नसली, तरी यथावकाश सोयीने जाणार आहे. यापुढे इथे तिचें वर्चस्व राहणार नाही. मात्र

ज्ञानविज्ञानाच्या उपार्जनासाठी आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारासाठी आमच्या देशांतील विद्वानांना तिची उपासना व जोपासना करावी लागेल.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल की, परक्या जेत्यांच्या भाषा जितांच्या भूमींत मूळ धरत नाहीत. त्यांच्यांतील कांही शब्द, कांही वाक्प्रचार व कांही लकबा त्या भूमीच्या भाषांत एकजीव होतील. परंतु त्या स्वत: त्यांत विलीन होणें शक्य नाही. प्राचुर्याने अंत पावणारा भूमीचा जो भाग तो प्रांत. त्या प्रांतांत एक विवक्षित भाषा प्रचलित असते. तिचीं पाळेंमुळें तेथील जमिनींत खोलवर शिरलेलीं व रुजलेलीं असतात. त्या प्रांतांतील कांही रहिवासी पोटापाण्याच्या निमित्ताने अन्य प्रांतांत गेले आणि आपल्या बरोवर त्यांनी आपली प्रांतिक भाषा नेली, तरी ती तेथे फार दिवस टिकत नाही. चारपांच पिढ्यानंतर तत्रस्थ भाषाच या रहिवाशांची भाषा बनते. आमचे पारशीबंधु गुजरातच्या भूमींत स्थायिक झाले. आज गुजराती हीच त्यांची मातृभाषा आहे. आमचे बेनेएस्रायलबंधु मुंबईस व कोकणपट्टींत वस्ती करून राहिले आहेत. हा भूमिभाग मराठी भाषेचा आहे. त्यामुळे आज मराठी हीच त्यांची भाषा झाली आहे.

५. प्रांतांची भाषिक पुनर्रचना

आमच्या या विशाल भारतांत आज अठ्ठावीस लहानमोठीं राज्यें आहेत. भाषांच्या पायांवर त्यांची पुनर्रचना केल्यास त्यांची संख्या निम्म्याने कमी होईल. हिंदी भाषेचा मुलूख फार मोठा आहे. तेव्हा शासनाच्या सोयीच्या दृष्टीने त्याचे भिन्न भिन्न प्रांत असणें आवश्यक आहे. इतर भाषांचे मुलूख मर्यादित आहेत. तेव्हा त्यांच्याबाबत हा प्रश्न उद्‌भवण्याचें कारण नाही. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतांत लोकशाहीची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. स्वतंत्रता, समता व बंधुता हें तिचें ध्येय आहे. तेव्हा प्रत्येक प्रांतांतील बहुजनसमाजास त्यांचा लाभ व्हावा या दृष्टीने तेथील राज्यकारभार त्यांच्या मातृभाषेंतून चालणें आवश्यक आहे. बहुजनसमाजांत जे वयांत आलेले आहेत त्यांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला आहे. हा बहुजनसमाज हळुहळू आपल्या प्रांतिक भाषेंतून शिकून साक्षर व सुशिक्षित होणार आहे. त्याला मूळाक्षरांपासून तों विद्यापीठांतील पदवीपरीक्षेपर्यंतचें शिक्षण त्याच्या प्रांतिक भाषेंतून मिळणें आवश्यक आहे. मातृभाषेचें माध्यम असल्यास विद्यार्थ्याला विषयाचें आकलन सहजगत्या होतें. आणि अन्य भाषेच्या माध्यमांतून शिक्षण घेण्याचे त्याचे श्रम वाचतात, वेळ फुकट जात नाही आणि शक्ति खर्च होत नाही. तेव्हा नवभारताच्या निर्मितीच्या दृष्टीने प्रांतिक भाषांचा मान व महत्त्व ओळखणें अत्यंत आवश्यक आहे. त्यांचा स्वाभाविक विकास व्हावा, त्यांच्या उत्कर्षाच्या आड अडथळे येऊं नयेत आणि दिवसेंदिवस त्यांचा व्याप अधिकाधिक वाढावा अशी इच्छा असेल, तर त्यांची भाषिक पुनर्घटना आवश्यक आहे. आपल्या पंतप्रधानांच्या लक्षांत ही गोष्ट आली आहे. म्हणूनच उच्चाधिकार समितीच्या स्थापनेची वार्ता जाहीर करण्यांत आली आहे. तेव्हा लवकरच या दिशेने प्रगतीचें पाऊल पडेल अशी आशा करण्यास हरकत नाही.

६. सध्याच्या सदोष प्रांत-रचनेचे दुष्परिणाम

इंग्रजी भाषेच्या अनाठायी आणि गैरवाजवी मोठेपणामुळे ज्याप्रमाणे प्रांतिक भाषांच्या वाढीला अवसर सापडला नाही, त्याचप्रमाणे इंग्रजांनी केलेल्या प्रांतरचनेमुळेहि त्यांची वाढ खुरटली व कुंठली. इंग्रजांनी जी प्रांतरचना केली ती बुद्धिपुरस्सर केली नाही. ते जसजसे एकामागून एक प्रांत जिंकत गेले, तसतसे त्यांना एकत्रित जोडत गेले. त्यांचा राज्यकारभार इंग्रजी भाषेंतून चालत होता. तेव्हा त्यांना प्रांतिक भाषांची पर्वा वाटली नाही. त्यांना त्यांचें सोयरसुतक

असण्याचें कांहीच कारण नव्हतें. इंग्रजी भाषेच्या राजवटींत बंगाली, मराठी, गुजराती, हिंदी आदि प्रांतिक भाषांतून वाङमय निर्माण झालें खरें, परंतु तें समाजाच्या खालच्या थरापर्यंत कधीच पोचलें नाही. कारण त्याच्यावर इंग्रजीवाङमयाचें सांवट होतें. शिवाय बहुजनसमाज हा फार मोठ्या प्रमाणांत निरक्षर होता. त्या काळीं बाजारपेठहि इंग्रजी वाङमयाने काबीज केली होती. त्यामुळे प्रांतिक भाषांतील पुस्तकें खपलीं नाहीत व परवडलीं नाहीत. अशा रीतीने त्यांची नैसर्गिक अभिवृद्धि साहजिकच थांबली. यापुढे प्रांतिक भाषांना त्यांचें योग्य स्थान मिळाल्यास वाङमयाची अभिवृद्धि होईल आणि त्यांत त्या त्या प्रांतांतील रहिवाशांचें मनोगत उमटलेलें दिसेल. भाषावार प्रांतांच्या पुनर्रचनेचा विचार करतांना फक्त बहुजनसमाजाच्या प्रांतिक भाषेचाच तेवढा विचार हवा. त्यांत संस्कृत व इंग्रजी भाषांची गर्दीगडबड असण्याचें कारण नाही. कारण बहुजनसमाजाच्या दैनिक जीवनांत त्यांना स्थान नाही.

भारतांतला मुलूख जसजसा इंग्रजांच्या हातीं येत गेला, तसतसे ते त्याचे प्रांत पाडत गेले. याचा दुष्परिणाम असा झाला की निरनिराळ्या भाषांचे मुलूख एका प्रांताच्या दावणींत बांधले गेले. धर्म, परंपरा व उद्दिष्ट या बाबतींत भारतांतील सार्‍या प्रांतांत सामान्यत्व आहे. परंतु भाषेबाबत मात्र भिन्नता आहे. तेव्हा भाषेवरच प्रांतांची पुनर्घटना झाली पाहिजे. भाषेवरूनच प्रांत ओळखण्यांत येतात. फ्रेंच भाषेचा फ्रान्स, इंग्लिश भाषेचें इंग्लंड, जर्मन भाषेचा जर्मनी इत्यादि प्रांतिक नांवें त्या त्या प्रांतांतील भाषांवरूनच पडलीं आहेत. पंजाब, बंगाल इत्यादि भारतीय प्रांतांचीं नांवें भाषांवरूनच पडलीं आहेत. परंतु इंग्रजी राजवटींत सिंध, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रांतांना मुंबई इलाख्याच्या दावणींत बांधण्यांत आलें आणि वर्‍हाड व नागपूर प्रांत यांची महाकोसलबरोबर आंवळचांची मोट बांधण्यांत आली. मद्रास इलाख्यांत आंध्र व तामीलनाड् यांची सांगड घालण्यांत आली आणि निजामाच्या ताब्यांत कांही महाराष्ट्राचा, कांही कर्नाटकाचा आणि कांही आंध्राचा असा संमिश्र प्रदेश ठेवण्यांत आला. आंध्र नुकताच स्वतंत्र करण्यांत आला आहे. बाकी आजमितीला बाकीचे प्रांत जसे पूर्वी होते तसेच ठेवण्यांत आले आहेत. या सदोष प्रांतरचनापद्धतीचा एक वाईट परिणाम झाला आहे. मुंबई इलाख्यांतील गुजराती, मराठी आणि कानडी या बहिणी बहिणी असल्या; आणि मध्यप्रदेशांतील मराठी व हिंदी या एकाच मातेच्या मुली असल्या, तरी त्यांचे आपसांतले संबंध फारसे सख्याचे किंवा सलोख्याचे नाहीत. समाइक कुटुंबपद्धतींत जशी व्यक्तित्वाची कुचंबणा होते तशी ती या पुरातन प्रांतपद्धतींत होत आहे. शिवाय या पद्धतीच्या एकाद्या प्रांतांत एकादी भाषा बोलणारे बहुसंख्य असल्यास कायदेमंडळांत दुसर्‍या भाषेच्या अल्पसंख्यकांस ते अन्याय करतांना दिसतात. त्यामुळे साहजिकच भाषाविषयक भांडण उद्‌भवतें. मध्यप्रदेशाचें वार्तापत्रक फक्त हिंदींत निघतें. कारण ती बहुसंख्यकांची भाषा आहे. पण तिच्यामुळे मराठी मध्यप्रदेशांतील लोकांना अन्याय होतो हें केव्हाहि योग्य नाही. यासाठी सर्व भाषांचे स्वतंत्र प्रांत असलेले फार बरे. भाषेच्या तत्त्वावर प्रांतांची पुनर्घटना झाल्यास भाषिक भाऊबंदक्या बंद होतील.

प्रांतांच्या भाषावार पुनर्रचनेवर अनेक आक्षेप आहेत. पहिला आक्षेप असा की, भाषावार प्रांतरचनेमुळे प्रांतिकता वोकाळेल व वळावेल. परंतु या आक्षेपांत कांही तथ्य

नाही. उलट या प्रांतरचनेने निरनिराळ्या भाषिकांचीं परस्परांत भांडणें लागणार नाहीत.

७. भाषिक प्रांतरचने-विरुद्ध आक्षेप.

दुसरा आक्षेप असा की, भाषावार प्रांतरचनेने नवीन भांडणें व कटकटी उत्पन्न होतील. यावर उत्तर असें की, आज तीं नाहीत की काय ? भाषावार प्रांत म्हणजे कांही राष्ट्रें नाहीत. तेव्हां कटकटी व कलागती लागण्याचें खरोखर कांही कारण नाही. भाषावार प्रांतरचना ही आत्म-विकासाला संपूर्ण वाव मिळावा म्हणून धडपड आहे. भाषावार प्रांतरचनेची मागणी ही कांही पाकिस्तानसारखी स्वतंत्र राष्ट्राची मागणी नाही. भाषावार प्रांतरचनेच्या मागणींत भाषा-भाषांचा भेद आहे; विरोध नाही. भेदांत आणि विरोधांत अंतर आहे. भेदांतून विशेष निर्माण होतात. विरोधांतून संघर्ष उत्पन्न होतात. तेव्हा भाषाभेदाला भिण्याचें कारण नाही. भाषावार प्रांतरचनेविरुद्ध तिसरा आक्षेप असा की, भारताच्या ऐक्याला ती अपायकारक आहे. या आक्षेपकांना राष्ट्राच्या ऐक्यासाठी संपूर्ण भारतांत एक भाषा हवी आहे. परंतु प्रांतिक ऐक्यासाठी त्यांना भाषावार प्रांतरचना नको आहे, हें मोठें आश्चर्य आहे. वास्तविक प्रांतिक ऐक्य हें राष्ट्रीय ऐक्यासाठी आवश्यक आहे. तेव्हा अगोदर तिकडे लक्ष दिलें पाहिजे. संपूर्ण साखळींतील एक एक कडी वळकट असेल, तर साखळी वळकट राहील. राष्ट्रीय ऐक्याचें तसेंच आहे. प्रांतीय ऐक्य असेल, तर राष्ट्रीय ऐक्य आपोआपच टिकेल. भाषावार प्रांतरचने-विरुद्ध शेवटचा आक्षेप असा की, त्यामुळे एखाद्या विवक्षित भाषेच्या प्रांतांत अन्यभाषिकांना त्रास होईल. वस्तुतः हा आक्षेप फोल आहे. एकाद्या विवक्षित भाषेच्या प्रांतांत अन्यभाषिक हे केव्हाहि अल्पसंख्याक असणार. तेव्हा त्यांनी त्या प्रांताशीं समरस होणें आवश्यक आहे. त्या प्रांतांत त्यांच्या भाषेला संरक्षण मिळेल. पण तिचें वर्चस्व राहणार नाही. वास्तविक यासंबंधीं **'जसा देश तसा वेष', 'जिथे भरेल दरा तो देश बरा', 'जिथला वास तिथली भाष'** इत्यादि आपल्या भाषेंतील जुन्या म्हणींत ग्रथित केलेला अनुभव अतिशय उपयुक्त आहे. तो केव्हाहि मार्गदर्शक ठरेल. अन्यभाषिकांना एकाद्या विवक्षित भाषेच्या प्रांतांत जातां येणार नाही अशी कांही जणांना भीति वाटते, ती व्यर्थ आहे. कोणीहि भारतीय आपल्या संघराज्याच्या कोणत्याहि प्रांतांत निःसंकोचपणाने व निर्भय मनाने संचार करूं शकतो. जयपूरचे महाराजे मानसिहजी हे अकबराचे सुभेदार म्हणून जेव्हा काबूलला जाण्यास निघाले तेव्हा त्यांचे रजपूत शिपाई त्या परक्या प्रांतांत जाण्यास मागेपुढे पाहूं लागले. त्या वेळीं मानसिंहांनी जे उद्‌गार काढले ते अन्य प्रांतांत जाणाऱ्यांनी लक्षांत ठेवण्यासारखे आहेत; —

सबै भूमि गोपालकी यामें अटक कहां ? । जाके मन अटक रही वोही अटक रहा !

अन्य प्रांतांत जाणारे तेथील जीवनाशीं मनमोकळेपणाने एकरूप होत नाहीत. स्वतःचा अहंकार व अस्तित्व ते विसरत नाहीत. अद्वैताची ते उपेक्षा करतात. त्यामुळेच गैरसमज पसरतात व तंटेबखेडे माजतात.

भाषावार प्रांतरचनेबाबत महाराष्ट्रासंबंधीं अकारण अनेक गैरसमज आहेत. आज गुजराती, मराठी आणि कानडी या तीन भाषा सोडल्या, तर भारतांत प्रत्येक भाषेला आप-

८. महाराष्ट्रासंबंधीं अकारण गैरसमज

आपला स्वतंत्र प्रांत आहे. भारताच्या विशाल व उदार कुटुंबांत तिच्या अंतर्गत असलेल्या प्रत्येक भाषेला एक स्वतंत्र खोली आहे. वरील तीन प्रौढ भाषांना स्वतंत्र खोल्या नाहीत. त्या त्यांना हव्या आहेत. अर्थात् या खोल्या एकाच घरांत हव्या आहेत. खोली म्हणजे कांही निराळें घर

नव्हे. तेव्हा या न्याय्य मागणीला विरोध कां व्हावा, तें कळत नाही. प्रांतांच्या भाषिक पुनर्रचनेची मागणी फक्त महाराष्ट्रीयच करीत आहेत, असें नाही. आंध्रांना त्यांचा भाषिक प्रांत मिळाल्यापासून शीख पंजाबी भाषेचा, गुर्जर गुजराती भाषेचा, कन्निडग कानडी भाषेचा प्रांत मागत आहेत. मग महाराष्ट्रियांनी मराठीचा प्रांत मागितला तर त्यांत वावगें तें काय आहे? संघराज्याची तिच्यांतील प्रत्येक व्यक्ति ही घटक आहे. तिचा सर्वांगीण विकास म्हणजेच संघराज्याची बळकटी. हा विकास भाषेच्या द्वारें दिलेल्या शिक्षणानेच साधणार. व्यक्तीच्या जन्मकालीं तिच्या कानीं जो पहिला शब्द पडला ती तिची मातृभाषा. ती तिच्या रक्तांत असते. तेव्हा तिच्याच द्वारें त्याला शिक्षण मिळालें पाहिजे; आणि यासाठीच प्रांतांची भाषावार पुनर्रचना झाली पाहिजे. भाषावार प्रांतरचनेची मागणी ही कांही निव्वळ चूष नाही. तिच्या मागें आत्मविकासाची व राष्ट्रकल्याणाची मंगल प्रेरणा आहे. ही मागणी म्हणजे कांही विभक्त होण्याचें भांडण नाही. जाणत्या व कर्त्यासवरत्या मुलानें आपल्या कुटुंबवत्सल व प्रेमळ पित्यापाशीं मागितलेली ही देणगी आहे.

इंग्रजांच्या आगमनापूर्वी भारताच्या कांही भागावर मराठ्यांची सत्ता होती. इंग्रजांना त्यांच्याशीं लढावें लागलें. त्याचा परिणाम असा झाला की, मराठी बोलणाऱ्या मुलुखाचे चार निरनिराळे गट पडले. महाराष्ट्राचा गोमंतक हा भाग फार पूर्वीपासून परक्या पोर्तुगीजांच्या ताब्यांत आहे. नांदेड, परभणी, बीड व औरंगाबाद हे मराठी विभाग निजामच्या सत्तेखाली होते; पण आता ते स्वतंत्र–भारतांत विलीन झाले आहेत. मात्र अजून त्यांचा प्रांत निराळा असून त्यावर निजाम हा राजप्रमुख आहे. वऱ्हाडचा प्रांत निजामच्याच अंमलाखाली होता. परंतु १९०३ पासून तो इंग्रजांनी त्याच्याकडून कायमच्या भाडेपट्टीनें घेतला आणि आता तो मध्यप्रदेशांत अंतर्भूत आहे. इंग्रजांनी पुण्याच्या शनिवार वाड्यावर १८१८ मध्ये आपलें युनियन जॅक फडकावलें. तेव्हा पुणें आणि त्याच्या आसपासचा प्रदेश मुंबईस जोडण्यांत येऊन त्याचा हळुहळू एक स्वतंत्र इलाखा करण्यांत आला आणि पुढे १८५४ मध्ये नागपूर हातीं येतांच त्याला वऱ्हाड व महाकोसल जोडण्यांत येऊन हळुहळू त्याचा मध्यप्रदेश बनविण्यांत आला. त्यामुळे महाराष्ट्राचीं आज चार ठिकाणीं चार शकलें झालीं आहेत. गोवें अजून परक्यांच्या ताब्यांत आहे. तेव्हा तें वगळून इतर तीन मराठी बोलणाऱ्या मुलुखांचा सलग महाराष्ट्रप्रांत करावा अशी महाराष्ट्रियांची मागणी आहे. त्यांना सत्ता नको आहे. इतरांप्रमाणेच भाषिक प्रांत हवा आहे. त्यासाठी कोणत्याहि तऱ्हेची चळवळ करण्याची त्यांची इच्छा नाही. आपली न्याय्य मागणी आपल्या सरकारनें पूर्ण करावी एवढीच त्यांची प्रेमाची विनंती आहे.

त्यांच्या न्याय्य मागणीला विरोध व्हावा याचें आश्चर्य वाटतें. आणि तो करतांना त्यांच्या पूर्वेतिहासाचा विपर्यास व्हावा याचा खेद वाटतो. मराठ्यांनी फार पूर्वीपासून स्वातंत्र्याच्या संग्रामांत भाग घेतला आहे. सोळाव्या शतकाच्या अखेरीपासून तों सतराव्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांपर्यंत शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराज यांनी दक्षिण भारताचें कसें रक्षण केलें तें पुढील कवित्वावरून लक्षांत येईल;——

९. त्यांच्या इतिहासाचा विपर्यास

अरु दच्छिन उत्तर रक्षनको इत शाहजि तो उत शाहजहाँ

शिवाजी महाराजांनी सुरत लुटली या घटनेचा विपर्यास होतो, तो खेदजनक आहे. वस्तुतः त्यांनी सुरतेच्या युरोपीय व्यापाऱ्यांना लुटलें. या परक्या व्यापाऱ्यांनी तेथे वखारी घातल्या होत्या आणि या देशांतील संपत्तीचें हस्तान्तर करण्यास आरंभ केला होता. श्रीकृष्णाच्या काळीं द्वारका ही व्यापाऱ्यांच्या दृष्टीने भारताचें प्रवेशद्वार होती. तिच्या द्वारें व्यापार चालावयाचा. म्हणूनच ती सोन्याची होती. शिवाजी महाराजांच्या वेळीं तें व्यापारी महत्त्व सुरतेस प्राप्त झालें. म्हणून त्यांनी सुरत लुटली. आज तें महत्त्व मुंबईकडे गेलें आहे परक्या इंग्रज व्यापाऱ्यांनी तें वाढवलें, हें नीट लक्षांत घेतलें पाहिजे. शिवाजी महाराजांनी लूट मारली ती परक्या सावकारांची मारली, यासंबंधीं रामचंद्रपंत अमात्य बावडेकर यांच्या आज्ञापत्रांतला एक उतारा मननीय आहे. अमात्य महाराजांच्या वेळीं पंधरा सोळा वर्षांचे होते. पुढे राजाराम महाराजांच्या राजवटींत त्यांनी राज्यकारभार पाहिला आणि त्यांच्या मुलांसाठी आज्ञापत्र तयार केलें. व्यापारी व सावकार यासंबंधीं ते म्हणतात;——

"साहुकार म्हणजे राज्याची व राज्यश्रीची शोभा. साहुकारांमध्ये इंग्रज व वलंदे व फरासीस व डिंगमारादी टोपीकर हेहि सावकारी करतात. परंतु ते वरकड सावकारांसारखे नव्हेत. टोपीकरांस या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें प्रतिष्ठावीं, हा पूर्णाभिमान. त्यास ही हट्टी जात, हातास आलें स्थळ मेल्यानेहि सोडावयाचे नव्हेत. याकरितां यांस जागा देणेंच तर नीच जागा द्यावा. शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारी घालाव्या. त्यांस इमारतीचें घर बांधों देऊं नये. याप्रकारें राहिले तर बरें नाहीतर याविणें प्रयोजन नाही."

तेव्हा शिवाजी महाराजांनी परक्या व्यापाऱ्यांना शासन केलें यांत गैर तें काय केलें? महाराजांनी धर्म, देव व देश यांच्या रक्षणाचें जें कार्य केलें तेंच लक्षांत घेऊन भूषणने,

कासीकी कला जाति, मथुरा मसीद होति । शिवाजी न होता तो सुनत होत सबकी

असे उद्गार काढले आहेत. पहिल्या बाजीरावसाहेबांनी आपल्या पराक्रमाने परक्या राज्यसत्तेला पायबंद घातला हें पाहून एका भाटाने पुढील उद्गार काढले आहेत:——

द्वै सत उपजे ब्राह्मणा, भृगु औ बाजीराव । उन मेटी रजपूतिया, इन मेट्यो तुरकाव

मराठ्यांच्या पराक्रमाचे पोवाडे गाणारे हे शाहीर महाराष्ट्राबाहेरचे आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. शिवाजी महाराजांच्या थोरवीचा आदर तर अजूनहि भारतांतील सर्व प्रांतांत आहे. विश्वकवि कै. रवींद्रनाथ ठाकूर यांनी महाराजांच्या त्रिशत सांवत्सरिक जन्मोत्सवप्रसंगीं वंगबंधूंना चेतना देतांना पुढील ओळी लिहिल्या होत्या:——

माराठीर साथे आजि हे बांगाली, । एककंठे बोलो जयतु शिवाजी ।
माराठीर साथे आजि हे बांगाली, । एकसंगे चोलो महोत्सवे आजी ।
आजि एक सभातले, भारतेर । पश्चिम, पूरब, दक्षिन, ओबामे ।
एकत्रे करुग भोग, एकसाथे । एकही गौरव एक पुन्यनामे ।

कविवर मैथिलीशरण गुप्तांनी महाराजांचा पुढील शब्दांत गुणगौरव केला आहे:——

फिरभी दिखाई देशमें जिसनें महाराष्ट्रच्छटा । दुर्दान्त आलमगीरका भी गर्व जिससे था घटा
उस छत्रपति शिवराजकाही नाम लेना है अलम् । हं सिंह परिचय के लिए बस सिंह कह देना अलम्

अहल्याबाई होळकरणीने आपल्या संपत्तीचा विनियोग भारतांतील देवस्थानांच्या जीर्णोद्धारांत केला आहे. महाराष्ट्राची ही वृत्ति कुणा भारतीयाच्या स्मृतींतून नष्ट होईल? शहाअलम्सारख्या असहाय्य दिल्लीपतीला महादजी शिंद्यांनी आपल्या बळाने पुन्हा तख्तावर

बसवलें हें महाराष्ट्रीय औदार्य इतिहासांत नमूद आहे. १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामांत झांशीच्या राणीनें जें शौर्य प्रकट केलें त्याची ह्यूरोजसारख्या शत्रुपक्षाच्या सेनापतीनेंहि मुक्तकंठानें स्तुति केली आहे. भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांनी देशांत स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीची ज्योत कशी अखंड तेवत ठेवली, हा इतिहास तर आपल्या सर्वांच्या समोरचा आहे. आजहि भारताला महाराष्ट्रानें विनोबांसारखा संत दिला आहे. परमपूज्य महात्मा गांधींनी त्याग, तप, वैराग्य आणि सेवा यांचा आपल्या मागील वारसदार म्हणून त्यांचेंच नांव जाहीर केलें होतें. महाराष्ट्राच्या स्वभावांत दोष नाहीत असें नाही. त्याची त्याला पूर्ण जाणीव आहे. परंतु एकाद्या उन्मत्त माथेफिरूने अविचारानें एकादें घोर कृत्य केलें तर त्यामुळे साऱ्याच महाराष्ट्राकडे संशयाच्या दृष्टीनें पाहणें नीतीचें व न्यायाचें होणार नाही.

१०. महाराष्ट्राच्या मर्यादा व स्वभावविशेष

उत्तरेकडील वरराष्ट्रक म्हणजे वऱ्हाड; दक्षिणेकडील करराष्ट्रक म्हणजे कऱ्हाड; पश्चिमेकडील अपरांतक म्हणजे कोंकण व गोमंतक म्हणजे गोंवें; आणि पूर्वेकडील महाराष्ट्रक म्हणजे मराठवाडा; या महाराष्ट्राच्या स्वाभाविक मर्यादा आहेत. संपन्न वऱ्हाड, त्या मानानें कमी उत्पन्न म्हणून विपन्न कऱ्हाड, कोह् म्हणजे पर्वत आणि कन् म्हणजे खणणें अर्थात् पर्वत खणून केलेलें कष्टाळू कोंकण * आणि प्रतिष्ठित झालेलें प्रतिष्ठान म्हणजे पैठण हे महाराष्ट्राच्या चार बाजूंचे चार स्वभावविशेष आहेत. सोळाव्या शतकापर्यंत पैठण हेंच मराठीचें माहेरघर होतें. पण पुढे पश्चिमेच्या बाजूस शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केलें आणि बाजीरावांनी त्याचें साम्राज्य केलें. त्यामुळे मराठीचें माहेर पैठणहून पुण्याला गेलें. पुढे इंग्रजांचें वास्तव्य पुण्याजवळ मुंबईस असल्यामुळे आज पुणें हेंच तिचें माहेरघर बनलें आहे.

आम्हा महाराष्ट्रीयांची संस्कृति समिश्र आहे. अंमळनेराकडून आमचा गुजरातशीं संबंध येतो. त्यामुळे **पथारी, चोपडी** किंवा **दादर** हे शब्द आम्हांला आमचेच वाटतात. चांद्याकडून आमचा तेलगूशीं संबंध येतो. **उप्प** व **पिंड** म्हणजे **मीठ** व **कणीक** यांच्या मिश्रणानें बनविलेली आमची **उप्परपेंडी** ही तेलंगीण आहे हें आता सांगूनहि खरें वाटणार नाही. बेळगांव–धारवाडकडून आमचा संबंध कानडीशीं येतो. आमची **आई** कानडी आहे आणि तामिलांचे वडील **आर्य** म्हणजेच **अय्यर** आहेत. 'कानडीनें केला मराठी भ्रतार' हें अगदी खरें आहे. उत्तरेकडून आमचा जबलपूरशीं संबंध येतो. आमचा **शंकरपाळा** हा मूळांत तिकडचा **शक्करपारा** आहे हें कुणाला ठाऊक तरी आहे का? तेव्हा भाषावार प्रांतरचनेमुळे आम्ही संकुचित दृष्टीचे होऊं किंवा परस्परांकडे संशयानें व भयानें पाहूं असें समजण्याचें कांही एक कारण नाही.

मुंबई ही भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्रांतच आहे. कलकत्ता हें जसें बंगालचें, मद्रास हें जसें तामिळचें, तसेंच मुंबई हें बंदर महाराष्ट्राचें आहे. **महा+अंबा+आई** म्हणजेच **मुंबई**. हें नांव महाराष्ट्रीय आहे. मुंबादेवी, भुलेश्वर, वाळकेश्वर इत्यादि तेथील देवालयें महाराष्ट्रीयांचीं आहेत. बंबई हें गुजराती नांव मुंबई या मराठी नांवाचा अपभ्रंश आहे. त्याचेंच इंग्रजींत बाँबे झालें आहे.

* [कोंकण हा शब्द कोह् + कन् या फारसी शब्दांपासून आला आहे. हें नांव बहुधा इराणच्या दर्यावर्दी व्यापाऱ्यांनी दिलें असावें. 'अगस्त्य हें नांव 'अग' म्हणजे पर्वत आणि 'स्त्य' म्हणजे 'खणणें' यांपासून आलें आहे. अगस्त्य हे महाराष्ट्रीयांचे पूर्वज त्यांनी विंध्याद्रीला विंधलें आणि समुद्र प्राशन केला या पुराणकथा सर्वश्रुत आहेच. त्यांचा 'कोंकण'च्या या व्युत्पत्तीशीं संबंध लागतो.]

तें महाराष्ट्रांत राहिलें तर तेथील व्यापार करणाऱ्या आमच्या गुर्जर व मारवाडी बंधूंना उपद्रव होण्याचें कांही कारण नाही. महाराष्ट्रांतलाच काय, बहुतेक साऱ्या हिंदुस्थानांतील व्यापार आज युगेंनियुगें त्यांच्याच हातांत आहे आणि पुढे तो तसाच राहील. मुंबई महाराष्ट्राची असली, तरी 'बंबईमें बनेलो माल' त्यांचा आहे. व्यापार हा गुजराती व मारवाडी समाजाचा स्वभाव आहे. आज पिढ्यानिपिढ्या त्यांनी त्याची जोपासना केली आहे, त्यामुळे ते समाज श्रीमंत आहेत. मोतीलाल, हिरालाल, माणकचंद, पन्नालाल, केशरबाई, कस्तुरीबाई इत्यादि त्यांचीं नांवेंच या गोष्टीची साक्ष देतील. महाराष्ट्राने व्यापार कधीच केला नाही, त्यामुळे त्याच्या हातीं पैसा कधीच राहिला नाही. वैराग्य व विक्रम हे त्याच्या स्वभावाचे विशेष आहेत. त्याचा परिणाम असा झाला आहे की, '**आज नगद कल उधार; पहिले दाम पिछे काम; दाम करे काम बीबी करे सलाम; जेनूं काम तेनूं थाय बीजो करे सो गोतो खाय; चमडी जाय मगर दमडी न जाय; सूम के घर धूम; आम के आम और गुठलियों के दाम**' इत्यादि हिंदी व गुजराती म्हणी आम्ही आमच्या भाषणांत सर्रास वापरतों. विरागी वृत्तीमुळे महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत धोंडोपंत, कोंडोपंत, दिगंबरपंत, अवधूत, भिकाजीपंत अशीं नावें आढळतात आणि विक्रमशील प्रवृत्तीमुळे मराठ्यांत हैबतराव, गैबतराव, चंपतराव, श्रीपतराव अशीं नावें दिसतात. हीं नावें अनुक्रमें हयपति, गजपति, चमुपति, श्रीपति इत्यादि संस्कृत नांवांचीं मराठी रूपांतरें आहेत. महाराष्ट्रीयांनी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबांची गाथा व दासबोध यांसारखे अध्यात्मपर ग्रंथ निर्माण केले आणि घोड्यावर बसून पराक्रम केला, त्यामुळे मराठींत वेदांताची परिभाषा रुळलेली आहे आणि '**असा काय घोड्यावर बसून आला आहेस ?; रडतराव घोड्यावर स्वार; वरातीमागून घोडें; आमचें घोडें थकलें; घोडें कोठे पेंड खातें आहे कांही कळत नाही; घोडें अटकेवर पाणी प्यालें; कुर्घोडी; कागदी घोडे नाचवणें; घोडा-मैदान जवळ आहे; घोडदौड; घोडचूक; घोडनवरी**' इत्यादि म्हणी व वाक्प्रयोग रूढ झाले आहेत. भाषावार प्रांतरचनेमुळे आपला वृत्तिच्छेद होईल अशी आमच्या व्यापारी बांधवांना शंका असेल तर ती व्यर्थ आहे. व्यापारव्यवहाराच्या निमित्ताने व्यापारी वर्ग जसा या देशांत सर्वत्र पसरला आहे, तसा पोटापाण्याच्या निमित्ताने अव्यापारी वर्ग जिकडे तिकडे पसरला आहे. जे ज्या प्रांतांत असतील, त्या प्रांतांतील जीवनाशीं ते तद्रूप झाले, तर मग शंकाकुशंकांना जागा राहणार नाही.

उत्तरेकडील आर्यसंस्कृति आणि दक्षिणेकडील द्रवीडसंस्कृति यांना सांधणारा महाराष्ट्र हा मधला दुवा आहे. या दोन्ही संस्कृतींचा त्याच्यांत समन्वय झाला असल्यामुळे तो खरा भारतीय आहे. तो आधी भारतीय आणि मग महाराष्ट्रीय आहे. त्याच्या आटोपसर प्रदेशांत गुर्जर, माळवी, राजपूत, बंगाले, कानडे, तेलंग, दुबे, शुक्ल, अग्निहोत्री इत्यादि आडनांवांचीं घराणीं आहेत. या सर्वांचा त्याच्यांत समावेश आहे, म्हणूनच तो महाराष्ट्र आहे. मात्र या सर्वांची आजची भाषा मराठी आहे. महाराष्ट्रांतील कितीतरी कानडी व तेलंगी कुटुंबें आता महाराष्ट्रीय बनलीं असून मराठी बोलत आहेत. तेव्हा भाषावार प्रांतरचना ही घातक ठरेल ही कल्पना चुकीची आहे.

एका भाषेचे किती प्रांत असावेत हा प्रश्न विरोधाचा, वादविवादाचा किंवा मतभेदाचा नाही. त्याचा विचार अगोदर शासनव्यवस्थेच्या दृष्टीने झाला पाहिजे. अनेकांत

अनुक्रमणिका

एकत्व पाहणारा आमचा धर्म आहे. तेव्हा अनेक मतांतून आम्हांला एक सार काढतां येणें शक्य आहे. या मतभेदांचा त्या त्या प्रांतांतील पुढाऱ्यांनी निरभिमान, निर्मळ, निर्मम आणि निरहंकारी वृत्तीने विचार केला पाहिजे. परस्परांच्या स्नेहाने, सलोख्याने, सहकाराने, सहानुभूतीने व सामंजस्याने हा प्रश्न सहज सुटेल. एकाच भाषेचे वेगवेगळे प्रांत असल्यास एक धोरण राहत नाही व एकसारखी प्रगति होत नाही. इंग्रजी राजवटींत पुण्यामुंबईच्या मानाने नागपूर-वऱ्हाड मागे राहिले, आणि नागपूर-वऱ्हाडच्या मानाने मराठवाडा अगदीच मागे रेंगाळत बसला, हें यासंबंधींचें प्रत्यक्ष उदाहरण आहे. भाषावार प्रांतरचना करतांना वाङमय, चालीरीती, कुळधर्म-कुळाचार, स्वभाव, खाणींपिणीं यांच्या सामान्यत्वाचा आणि कारभार, व्यवहार, व्यापार व शिक्षण यांच्या विशेषत्वाचा विचार आवश्यक आहे. भाषा ही परस्परांतील विचारविनिमयाचें साधन आहे. ती सर्वांना एकत्रित आणते. तेव्हा तिचीं शकलें नसावींत. हिंदी ही अनेक प्रांतांची भाषा आहे ही समजूत ऐतिहासिक दृष्टीने बरोबर नाही. गोस्वामी तुलसीदासजींचें रामचरितमानस अवधींत आहे, सूरदासांचा सूरसागर व्रजभाषेंत आहे, केशवदासांची रामचंद्रिका बुंदेलखंडींत आहे आणि मीराबाईची पदावलि राजस्थानींत आहे. आज जिला आपण हिंदी किंवा खडी बोली म्हणतों ती भाषा इंग्रजी राज्यांत विकास पावली आहे. वरील जुन्या भाषांत कोठेहि 'नहीं है' असा नकारी व होकारी संयुक्त प्रयोग नाही. गोस्वामीजीनी आपल्या रामायणांत—

११. प्रांतिक पुनर्रचनेसंबंधीं मिटणारे मतभेद.

'जो विचार करिहों मनमाहीं। पराधीन सपने हुँ सुख नाहीं'

असा प्रयोग केला आहे. 'नहीं है' हें इंग्रजी 'is not' चें हिंदी भाषांतर आहे.

हिंदी किंवा खडी बोली ही मूळांत दिल्ली आणि मेरठ यांच्या लगतच्या प्रदेशांत जी बोली आहे तिचें विकसित रूप आहे. पूर्वी नर्मदेच्या उत्तरेच्या प्रदेशास हिंदुस्थान म्हणत, आणि खालच्या प्रदेशास दख्खन म्हणत. तेव्हा उत्तरेकडील हिंदुस्थानांत जिचा संचार होता अशा बोलीला 'हिंदी' हें नांव मिळालें आहे. ती सर्वांना सहज व सुलभ आहे म्हणून 'खरी': कांहीजण म्हणतात ती उभी झाली आणि सर्वत्र संचार करूं लागली म्हणून 'खडी'. सध्याचें तिचें ग्रांथिक स्वरूप संस्कृतनिष्ठ आहे. तें तिला कै. महावीरप्रसाद द्विवेदी यांनी दिलें आहे. त्यांनी विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या निबंधमालेपासून स्फूर्ति घेतली होती. म्हणूनच त्यांच्या लेखनांत सौंदर्य, माधुर्य, सौकुमार्य यांसारखे मराठींत रुळलेले कठोर प्रयोग आढळतात. हिंदीच्या स्वभावानुसार वास्तविक ते सुंदरता, मधुरता व सुकुमारता असे कोमल असावयास हवेत. आपल्या स्वतंत्र सरकारने हिंदी ही संघभाषा केली आहे. ती संस्कृतप्रचुर नसावी. परंतु संस्कृतनिष्ठ असणें आवश्यक आहे. कारण अन्य भारतीय भाषांत व तिच्यांत संस्कृत हा दुवा आहे. प्रत्येक प्रांतांत प्रांतिक भाषेचेंच महत्त्व असावें. परंतु आंतरप्रांतीय भाषा म्हणून हिंदीला मान्यता राहील. तेव्हा प्रत्येक प्रांतांतील माध्यमिक शिक्षणांत तिचा सक्तीचा विषय म्हणून, आणि शालान्त शिक्षणांत ऐच्छिक विषय म्हणून अंतर्भाव व्हावा. इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा आहे. तेव्हा प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या व तत्सम मोठ्या शहरांतून ती शिकण्याची सोय असावी. आणि शालान्त शिक्षणांत ऐच्छिक विषय म्हणून ती अंतर्भूत असावी. सर्वांना निसर्गतःच सारखी

१२. प्रांत भाषा, आंतरप्रांतीय भाषा आणि आंतरराष्ट्रीय भाषा

वुद्धि नसते. तेव्हा सरकारने **भारतीय शासनसेवेचा एक वर्ग** निर्माण करावा. त्यासाठी स्पर्धेच्या परीक्षा ठेवाव्या. आणि त्यांत जे उमेदवार अन्य प्रांतीय भाषेंत निपुण ठरतील त्यांना त्या त्या प्रांतांत अधिकाराच्या जागा द्याव्या. प्रांतांतील अधिकारपदासाठी तेथील भाषेचें ज्ञान आवश्यक ठेवावें. अशा रीतीने आंतरराष्ट्रीय इंग्रजी, आंतर प्रांतीय हिंदी आणि स्वप्रांतेतर भाषा जाणणारे उमेदवार अधिकारपदावर येऊं शकतील. मात्र प्रांतिक शासनांत, शिक्षणांत, व्यापारांत व व्यवहारांत तेथील भाषेचेंच वर्चस्व राहील. संघराज्याच्या ऐक्यास ही योजना पोषक होईल.

आंतरप्रांतीय भाषा म्हणून हिंदीला आजच नव्यानें महत्त्व मिळालें आहे असें नाही. महाराष्ट्रीय संतांनी तिचें हें महत्त्व ओळखलें होतें. म्हणूनच त्यांनी त्या भाषेंत पदरचना केली आहे. लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरींत एक कॉलम हिंदी मजकुरासाठी राखून ठेवला होता. ज्या महाराष्ट्रीयाला भारतीय पुढारी व्हावयाचें असेल त्याने हिंदींत वाग्व्यवहार करणें आवश्यक आहे.

१३. हिंदी-मराठीचे स्नेहसंबंध

फार प्राचीन काळापासून हिंदी व मराठी यांचे परस्पर प्रेमसंबंध आहेत. महाराष्ट्रांतील नाथपंथ हा उत्तरेचा होता. महाराष्ट्रांतील महानुभावपंथाने काबुलपावेतों आपल्या तत्वज्ञानाचा प्रचार केला होता. महाराष्ट्रीय उत्तर भारतांत तीर्थयात्रेनिमित्त जात येत. त्यामुळे त्यांचा हिंदीशीं संबंध येई. मराठे हे मूळचे रजपूत होते. १८ व्या शतकानंतर त्यांचें लक्ष सदैव दिल्लीकडे होतें. त्यांच्या फौजेंत अरब, रजपूत, शीख व रांगडे शिपाई असत. त्यांच्यामुळे महाराष्ट्रांत हिंदीचा प्रसार होई. नाभाजीच्या भक्तमालेंत व शिखांच्या ग्रंथसाहेबांत ज्ञानदेव आणि नामदेव या महाराष्ट्रीय संतांना जागा मिळाली आहे. अर्वाचीन काळांतहि कै. माधवराव सप्रे, कै. गणेश शंकर विद्यार्थी, कै. सिद्धनाथपंत आगरकर, श्री. बाबूराव पराडकर, पं. सातवळेकर, श्री. लक्ष्मण नारायण गर्दे, डॉ. दिवेकर, प्रा. तामस्कर, श्री. प्रभाकर माचवे, श्री. श्रीपाद जोशी इत्यादिकांनी हिंदी भाषेची महनीय सेवा केली आहे. बंगाली भाषेची सेवा कै. देऊस्करांनी केली आहे. गुजराथी भाषेची सेवा काका कालेलकरांनी केली आहे आणि कानडी भाषेची सेवा प्रा. वेंद्रे यांनी केली आहे. अन्य प्रांतांतील भाषांना महाराष्ट्रीय स्वत:च्या मातृभाषेप्रमाणेंच मानतात या गोष्टीची हीं जितींजागतीं प्रत्यंतरें आहेत. आमच्या मराठी भाषेंत '**माय मरो व मावशी जगो**' अशी एक म्हण आहे. तिच्यांत आमच्या उदार व नि:स्पृह मनाचें प्रतिबिंब पडलें आहे.

है भव्य भारतभू हमारी मातृभूमि हरीभरी। हिन्दी हमारी संघभाषा और लिपि है नागरी।।

हे कविवर मैथिलीशरण गुप्त यांचे उद्‌गार आम्ही महाराष्ट्रीयांनी आपल्या कृतीनें सार्थ केले आहेत.

मात्र यापुढें हिन्दीची वाढ निरनिराळ्या प्रांतिक भाषांतील वेंचक व चप्खल शब्दांनी होणार आहे. हिन्दीला तिच्या प्रांतिक भगिनी अहेर अर्पण करून संपन्न करणार आहेत. तेव्हा या दृष्टीने विचार केला तरी प्रांतिक भाषांचें भावी महत्त्व सहज लक्षांत येईल. अर्थात् त्यांच्या पायांवर प्रांतांची पुनर्रचना करणें केव्हाहि हितावह होईल. हल्ली बोलपट व रेडिओ या यांत्रिक साधनांच्या द्वारें निरनिराळ्या भाषांचा प्रसार होत आहे. रेडिओवरून हिंदी वार्ता प्रसारित करतांना श्री. देवकीनंदन पांडे हे '**सभापतित्वमें**' याबद्दल '**अध्यक्षतामें**' आणि 'आज के **सभा** में यह **प्रस्ताव** हुआ' याऐवजी जेव्हा 'आज के **बैठक** में यह **ठराव** हुआ' असे प्रयोग करतात तेव्हा मराठीची थोरवी लक्षांत आल्याशिवाय राहत नाही. 'वृद्धि' पासून आलेला 'बधाई' आणि 'सख्य' पासून आलेला 'सगाई' हे शब्द मराठीने हिंदीपासून उचलण्यास कांहीच हरकत नाही.

१४. भावी संघराज्य भाषा

अनुक्रमणिका

यापुढील हिन्दी भाषा संतसाहित्याच्या भाषेप्रमाणे सहज व सुलभ झाली पाहिजे. ती साऱ्या भारताची संघराज्य भाषा होणार आहे. तेव्हा तिचें **हिन्दी** हें नांव बदलून **भारती** हें यथार्थ नांव तिला देण्यांत यावें. संतांच्या साहित्यांतील 'भक्ति' हा विषय अखिल भारतीय होता. त्यामुळे तो सर्वत्र हृदयंगम होत होता. संताची भाषा इतकी लवचिक होती की, एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत तिचें रूपांतर अगदी सहजासहजी होई. नरसी मेहेतांच्या '**वैष्णव जण तो तेण कहो ये । जे परपीडा जाणे रे ।**' या गुजराती पदाचें '**वैष्णव जन तर त्यास म्हणावें जो परपीडा जाणे रे**' असें मराठी रूपांतर अगदी सहज होतें. विद्यापतीच्या '**मधुपुरि गइले श्याम**' या मैथिली पदाचें '**मधुपुरि गेले शाम**' हें मराठीकरण अगदी विनायास साधलें आहे. कबीराच्या '**मालन आवत देखिकर, कलिया करि पुकारि ।**

फूली फूली चुन लिई, कालि हमारी बारि ॥' या हिंदी दोह्याचें

'**माळिण येतां देखुनी करिती कळ्या पुकार । फुलत्या फुलत्या वेंचल्या उद्या आमुचा वार**'

हें मराठी भाषांतर अगदी सहज साध्य आहे. गोस्वामी तुलसीदासजींच्या—

जाकी रहो भावना जैसी । प्रभुमूर्ती देखी तां तैसी

या हिंदी चरणांचा

ज्याची असे भावना जैशी । प्रभुमूर्ती दिसली त्या तैशी

हा मराठी अनुवाद जितका सहजगम्य तितकाच सहजरम्य आहे. संतांच्या युगांत 'भक्ति' हा सार्वभारतीय विषय होता. इंग्रजांच्या राजवटींत 'देशभक्ति' हा विषय अखिल भारतीय स्वरूपाचा होता. आता स्वातंत्र्याच्या काळांत विश्वकुटुंबत्व आणि मानव्यावरील असीम प्रेम हे विषय सार्व-भारतीय झाले पाहिजेत. विश्वप्रेम आणि विश्वशांति यांचा यापुढे प्रचार व प्रसार झाला पाहिजे.

१५. कै. साने गुरुजींची आंतरभारती

हल्ली बोलपट व रेडिओ हीं साहित्याच्या प्रसाराचीं शीघ्र व प्रभावी साधनें उपलब्ध झालीं आहेत. त्यांच्या द्वारें बंगालीतील बंकीम, रवींद्र व शरद्; हिंदींतील प्रेमचंद, उर्दूतील ख्वाजा हसन निजामी व कृष्णचंद्र, कानडींतील कैलासम् व मास्ती व्यंकटेश अय्यंगार; गुजरातींतील मुंशी व जोषी; मराठींतील आपटे, खाडिलकर, गडकरी व कोल्हटकर आणि अन्य भाषांतील आदर्शभूत ग्रंथकारांच्या कृति बहुजन समाजासमोर मोठ्या प्रमाणांत आल्या पाहिजेत. रेडिओ हें निरनिराळ्या प्रांतिक भाषा अवगत करून घेण्याचें एक घरबसलें साधन आहे. आपल्या मध्यप्रदेशाची राजधानी नागपूर ही भारताच्या अगदी मधोमध आहे. पूर्वेकडे कलकत्ता हें तिच्यापासून जितकें दूर आहे, तितकेंच पश्चिमेकडे मुंबई हें दूर आहे आणि उत्तरेकडे दिल्ली जितकी दूर, तितकेंच दक्षिणेकडे मद्रास हें दूर आहे. अशा या मध्यवर्ती ठिकाणीं हिंदी, उर्दू, बंगाली, गुजराती, मराठी, तेलगू, तामील इत्यादि भाषा व त्यांचें वाङ्मय शिकण्याची सोय झाल्यास निरनिराळ्या प्रांतिक भाषांच्या वाङ्मयांत एकसूत्रता राहील आणि एकमेकींना एकमेकींपासून पुष्कळशा गोष्टी घेतां येतील. भारताचें ऐक्य व भाषांचें सख्य कायम राखण्याचा हा एक निरुपद्रवी उपाय आहे. कै. साने गुरुजींचें आंतरभारतीचें स्वप्न तें हेंच ! या दिशेने विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने पुढे पाउलें टाकावींत अशी माझी त्यांना जाहीर विनंती आहे. या दृष्टीने नागपुरांत भारतीय भाषाध्ययन मंदिर काय करीत आहे; पण तें फारच लहान प्रमाणावर आहे.

प्रांतिक भाषांच्या महतीचें हें सविस्तर विवेचन झाल्यावर आता विदर्भांतील गेल्या वर्षींच्या मराठी साहित्याचें समालोचन करणें क्रमप्राप्त आहे. त्यांत साऱ्याच साहित्याचा समावेश होईल असें नाही. क्वचित् एकादा दुसरा ग्रंथ किंवा साहित्यिक यांचा निर्देश चुकून राहिला, तर त्याबद्दल साहित्यिक बंधूंनी गैरसमज करून घेऊं नये, अशी प्रार्थना आहे. माझें हें समालोचन विदर्भांतील साहित्यापुरतेंच मर्यादित आहे. कारण मी विदर्भ साहित्य संघाच्या व्यासपीठावरून बोलत आहे. शिवाय महाराष्ट्राच्या एकंदर साहित्याचें समालोचन नुकतेंच दिवाळीच्या तोंडाशीं महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षांनी केलेलें आहे. तेव्हा पुन्हा त्याचा पुनरुच्चार करून मी व्यर्थ वेळ घेऊं इच्छित नाही. माझ्या या समालोचनांत कांही अप्रसिद्ध साहित्याचाहि निर्देश होणार आहे. तें जरी अद्यापि बाहेर पडलें नसलें, तरी प्रकाशनाची वाटचाल करीत आहे.

१. आरंभीं

महाराष्ट्रांतील एकंदर साहित्याचा विचार करतांना एक मोठी उणीव नजरेंत भरते. ती ही की, मराठींत जसें ललित वाङ्मय उदंड आहे तसें विज्ञान वाङ्मय नाही. आजचें जग हें विज्ञानाचें आहे. तेव्हा त्या प्रकारचें वाङ्मय विपुल प्रमाणांत प्रसिद्ध होऊन समाजांत त्याचा प्रसार होणें आवश्यक आहे. दुसरी एक उणीव सहज दृष्टोत्पत्तींत येते ती ही की, आज जें ललित वाङ्मय प्रसिद्धी पावत आहे, त्यांत लघुकथा व कविता यांचाच बेसुमार भरणा आहे. नाटक व कादंबरी हे प्रौढ प्रकार जवळ जवळ नाहीसेच झाले आहेत. लघुनिबंधाची तीच स्थिति आहे. प्रबंधाच्या व निबंधाच्या स्वरूपांचें वैचारिक गद्य कांही एका विवक्षित प्रमाणांत निर्माण झालें आहे. वस्तुतः त्याची गरज अधिक आहे. दिवाळीच्या सुमारास आमच्या नियतकालिकांना भलतेंच उधाण येत असतें. परंतु त्यांत कथा, कविता, रहस्यमय कादंबऱ्या आणि विनोदी चुटके यांचाच मोठ्या प्रमाणांत भर असतो. पुन्हा या कथाकादंबऱ्यांचा मुख्य विषय स्त्रीपुरुषप्रेम हाच असतो. त्यांतहि ज्यामुळे लिप्सा व जुगुप्सा उत्पन्न होईल अशा मानवी मनांतील पाशवी, हिडीस व ओंगळ अंगांचेंच बीभत्स चित्रण असतें. कांही नियतकालिकें तर केवळ वाचकांच्या लंपटवृत्तीस जागृत करण्यासाठीच अवतीर्ण झालीं आहेत. त्यांनी वेळवारींच स्वतःची जबाबदारी ओळखणें आवश्यक आहे; किंवा वाचकांनी तरी त्यांना पायबंद घातला पाहिजे.

२. प्रचलित साहित्यांतील उणीवा

सध्या वृत्तपत्रीय वाङ्मयाची चलती आहे. शहरानजिकच्या खेड्यापाड्यांतील बहुजन समाजापर्यंत त्याची पोंच असल्यामुळे त्याचा खप वाढला असून त्याला लोकप्रियता लाभत आहे. महाराष्ट्र व तरुण भारत हीं आपल्या प्रांतांतील जुनीं दैनिकें आहेत. त्यांच्या जोडीला मातृभूमि हें आता तिसरें दैनिक झालें आहे. उदय, हिंदुस्थान, लोकमत, नवें जग, मराठी जग, मराठी प्रदेश आदि नवीं जुनीं वृत्तपत्रें आपआपल्यापरीनें लोकजागृतीचें व मतप्रचाराचें कार्य करीत आहेत. समाजाला साक्षर व सुशिक्षित करण्यांत त्यांचा वांटा महत्त्वाचा आहे. वृत्तपत्रांत प्रांजल व प्रामाणिक मतभेद असावा, परंतु अपप्रचार नसावा; आणि फळकट व शिवराळ भाषा असूं नये. निरनिराळ्या पक्षांत कटुता निर्माण होणार नाही अशाच रीतीनें त्यांनी मतभेद व्यक्त करावा. वृत्तपत्रांचें कार्य 'सवषामविरोधेन' अशा वृत्तीचें असावयास हवें.

३. वृत्तपत्रीय वाङ्मय

अलिकडे वृत्तपत्रांतून वाङमयीन टीकेला भरपूर स्थळ मिळत आहे. वृत्तपत्र अनेकांच्या हातीं जातें. तेव्हा त्यांतील टीकेला महत्त्व आहे हें नाकारतां येत नाही. महाराष्ट्रांत

४. वाङमयीन टीका

श्री. बाळशास्त्री हरदास हे समालोचनात्मक टीका लिहीत असतात. त्यांच्या लेखनांत नव्या जुन्याचा समतोल परामर्श असतो. स्वत:चें मत मांडण्याची त्यांची पद्धति निर्भीड व सडेतोड आहे. महाराष्ट्राचे दुसरे टीकालेखक श्री. दि. वा. फडणीस यांचे लेख अद्यावत् असतात. प्रचलित वाङमयीन वादांशीं त्यांचा चांगलाच परिचय आहे. वाङमयीन टीकेंत कुठे कुणी कांही अन्याय केला असल्यास ते त्याची ताबडतोब दखल घेतात. मात्र क्वचित् ते भावनाविवश होतात. तरुण भारतांत श्री. भिशीकर व श्री. पोतदार हे समालोचनें लिहीत असतात. भिशीकरांचें लक्ष ग्रंथकाराच्या कलेकडे, तर पोतदारांचें लक्ष त्याच्या विवेचनाकडे असते. या दोघांच्याहि लेखनांत सामंजस्य व संयम यांचा आढळ होतो. श्री. पां. बा. गाडगीळ हेहि व्यासंगी टीकाकार आहेत. एकाद्या कलाकृतीचें अचूक मूल्यमापन करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. मात्र ते क्वचितच लिहितात. श्री. भा. प्र. मोहरील यांच्या टीका चिकित्सक व मूलगामी असतात. त्यांत त्यांचा चौफेर व्यासंग प्रत्ययास येतो.

या प्रांतांतील प्रमुख मासिकांत सुषमा, युगवाणी व सर्वोदय यांचा निर्देश करावा लागेल. सुषमेचे संपादक श्री. कुंडलराय मोहेकर यांचा दृष्टिकोण विशाल व उदार आहे. आपलें

५. मासिकें

मासिक सबाह्यांतर सुंदर व सरस करण्यासाठी ते सतत झटत असतात. आपल्या सुशील व समाजशील स्वभावामुळे त्यांनी अखिल महाराष्ट्रांतील नामवंत लेखकांचें साहाय्य मिळविलें आहे. युगवाणी हें विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र आहे. त्याच्या संपादकमंडळांत असलेल्या प्रौढ व तरुण सदस्यांनी परस्परांच्या सहकाराने व साहाय्याने गेल्या सबंध वर्षभर एकापेक्षा एक सरस अंक सादर केले आहेत. त्यांतील लेख व कविता यांची पातळी नेहमींच उच्च राहिली आहे. सर्वोदयांत आचार्य विनोबा, आचार्य धर्माधिकारी, कुंदर व प्रभाकर दिवाण, विमल ठकार आणि कला देशपांडे यांचे वैचारिक परंतु भावनात्मक लेख प्रसिद्ध होत असतात. त्यांतील विश्वव्यापी समतेचा व शांततेचा दृष्टिकोण जनतेच्या मंगलाचा व हिताचा आहे.

नागपूरच्या मध्यप्रांत संशोधन मंडळामार्फत लवकरच दोन ग्रंथ बाहेर पडणार आहेत.

६. ऐतिहासिक संशोधनपर वाङमय

एका ग्रंथांत महामहोपाध्याय मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. चट्टे इत्यादिकांच्या संशोधनपर लेखांचें संकलन आहे.दुसरा ग्रंथ श्री. लांडगे यांनी लिहिला आहे. त्यांत इंग्रजी राजवटींतील नागपुरी जीवनाचा निरनिराळ्या क्षेत्रांतला इतिवृत्तान्त आहे. इतिहास व संशोधन या दोन्ही दृष्टींनी या ग्रंथांना महत्त्व आहे.

गेल्या सबंध वर्षांत एकहि नाटक निघालें नाही. नाही म्हणावयास श्री. केशव केळकर व श्री. मनोहर देशपांडे यांनी मात्र आकाशवाणीसाठी कांही नाटिका लिहिल्या. नाटकांत नाट्यास प्रामुख्य आहे. आकाशवाणी श्राव्य असल्यामुळे तिच्या द्वारें फक्त शब्दनाट्यच काय तें प्रतीत होतें. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी १८७४ ते १९०० या कालखंडांतील मराठी रंगभूमीचा इतिहास सिद्ध केला असून तो प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांत त्यांनी नाटकें, नाटककार, नट व रंगभूमि यांची

परिश्रमपूर्वक मिळविलेली माहिती एकत्रित केली असून रंगभूमीच्या उत्कर्षाची मीमांसा केली आहे, आणि तिच्यांतील दोषांचें दर्शन घडवलें आहे. गेल्या वर्षी श्री. द. रा. गोमकाळे यांनी गडकरी स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या नाटकांतील गुणावगुणांची चर्चा करणारा एक विस्तृत निबंध वाचला होता. त्याचप्रमाणे कै. देवलांच्या शारदेला त्यांनी एक विवेचक प्रस्तावना जोडली आहे. हे दोन्ही लेख त्यांच्या नाट्यविषयक दीर्घ व्यासंगाची प्रतीति पटवतात.

नाटकांप्रमाणच गुदस्तां श्री. माडखोलकरांच्या स्वप्नांतरितेशिवाय दुसऱ्या कादंबरीचें नांव ऐकूं आलें नाहीं. श्री. माडखोलकरांची ही कादंबरी त्यांच्या पूर्वीच्या कादंबऱ्यांहून अगदी

८. कादंबरी

वेगळी आहे. या कादंबरींत हैद्राबाद संस्थानांतील मध्ययुगीन वातावरण चित्रित करण्यांत आलें आहे. कादंबरीचा नायक राजीव याची व्यक्तिरेखा अत्यंत कुशलतेने रेखाटण्यांत आली आहे. कर्तव्यपूर्तीसाठी तो प्रेमाचा त्याग करतो. त्याची प्रेयसी रंजना करुणकोमल असली तरी उदात्त आहे. राणीसाहेबांचें चित्र काढण्यांत माडखोलकरांना अपूर्व यश लाभलें आहे. जुन्या खानदानी घराण्यांतील कुलवतीचें तें चित्र महाराष्ट्रीय मनास आकर्षित केल्याखेरीज राहत नाही. संख्यादृष्टया कादंबरीच्या बाबतींत जरी आपली निराशा झाली असली, तरी सौ. कुसुमताई देशपांडे यांच्या 'मराठी कादंवरीचें पहिलें शतक १८५० ते १९५०' या प्रबंधाने ती पार दूर झाली आहे. या विस्तृत प्रबंधांत कुसुमताईंनी कादंवरी या वाङ्मयप्रकाराचें कलेच्या दृष्टीने मूल्यमापन केलें असून तिच्या निरनिराळ्या प्रकारांची ओळख करून दिली आहे. यशस्वी कादंबरीकार या नात्याने त्यांनी कै. हरिभाऊ आपटयांना मानदंड मानलें आहे आणि तो समोर ठेवून त्यांच्या समकालिनांच्या कृतींचें विवेचन केलें आहे. आपली घरांतलीं व बाहेरलीं कामें संभाळून कुसुमताईंनी मराठी वाङ्मयांत एका फार मोठ्या महत्त्वाच्या व मोलाच्या ग्रंथाची भर टाकली आहे. याबद्दल त्यांचें जितकें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे.

प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी यंदा मुंबई साहित्यसंघांत संस्कृत साहित्यशास्त्रावर जीं व्याख्यानें दिलीं तीं लवकरच पुस्तकरूपाने प्रसिद्ध होणार आहेत. दिवसेंदिवस संस्कृतचा

९ प्रबंध

समाजाशीं संबंध सुटत आहे. अशा वेळीं हीं व्याख्यानें त्याच्यासमोर देण्यांत श्री. देशपांडयांनी समयज्ञता दाखविली आहे. हिस्लॉप कॉलेजांतील विद्वान व व्यासंगी प्राध्यापक श्री. अ. ना. देशपांडे यांनी अर्वाचीन मराठी साहित्याचा इतिहास लिहिला असून १९२० पर्यंतचा पहिला खंड सध्या मुद्रणालयांत आहे. पुढील खंड ते लिहीत असून तो लवकरच तयार होईल. या ग्रंथाने मराठी वाङ्मयांत एक उपयुक्त व उपकारक भर पडणार आहे.

गेल्या वर्षी चरित्रपर ग्रंथांत डॉ. कोलते यांनी चक्रधर चरित्राची अमोल भर टाकली आहे. चक्रधरांचे गुरु गोविंद प्रभु यांच्या चरित्रानंतर चक्रधरांच्या चरित्राची आवश्यकता

१०. चरित्रवाङ्मय

होतीच. डॉ. कोलते यांनी महानुभाव पंथांतील सांकेतिक लिपीमधील निरनिराळे ग्रंथ परिश्रमपूर्वक धुंडाळून चरित्रविषयक सर्व साधनें गोळा केलीं आणि मग चक्रधरांचें विवेचक चरित्र सादर केलें. नुकताच त्यांनी दामोदर पंडिताचा 'वछाहरण' हा काव्यग्रंथ विस्तृत प्रस्तावना आणि अर्थनिर्णायक टीपा यांसह प्रसिद्ध केला आहे. डॉ. कोलते म्हणजे निरलसपण व श्रमसातत्य यांची मूर्ति आहे. त्यांचा कष्टाळूपणा आणि कार्यनिष्ठा वाखाणण्यासारखी आहे. विद्यार्थीदशेपासून गेल्या पाव शतकांत त्यांनी महानुभावीय

वाङमयाचें गुप्त भांडार महाराष्ट्रांतील आणि महाराष्ट्राबाहेरील विद्यापीठांना खुलें करून ठेवलें आहे. स्वत: अभ्यास करून त्यांनी महाराष्ट्रवाङमयाच्या आणि भाषेच्या अभ्यासकांना उपकृत केलें आहे. पुढील पिढींतील अभ्यासू वृत्तीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श समोर ठेवण्यासारखा आहे. त्यांचेच शिष्य प्रा. डोळके यांनी अलिकडे महाराष्ट्र-साहित्य-पत्रिकेंत मुकुंदराजांवर एक लेखमाला लिहिली आहे. ती संशोधनदृष्टचा महत्त्वाची आहे. चरित्रपर ग्रंथांत कै. डॉ. केदार आणि डॉ. य. खु. देशपांडे या दोघांच्या चरित्रांची लवकरच भर पडणार आहे. कै. केदार हे या प्रांतांतील यशस्वी वकील, कुशल राजकारणी व विद्वान उपकुल गुरु. त्यांचें साधार चरित्र महाराष्ट्राचे उपसंपादक श्री. जगन्नाथराव जोशी यांनी लिहिलें आहे. डॉ. य. खु. देशपांडे हे आमच्या विदर्भांतील अग्रगण्य संशोधक व इतिहासज्ञ. त्यांच्या चरित्रांत त्यांच्या जीवनाचा व कार्याचा परिचय श्री. ना. ना. हूड यांनीं करून दिला आहे.

गेल्या वर्षांत लघुकथा व कविता यांना मात्र उमाप बहर आला आहे. या बहरांतील कांही फुलांचा सुखकारक सुगंध स्मरणसंपुटांत सदोदित दरवळत राहणारा आहे. लघुकथेच्या

११. लघुकथा

क्षेत्रांत श्री. शंकरराव शास्त्री, सौ. कुसुमताई देशपांडे व श्री. वामनराव चोरघडे या यशवंतांचीं नांवें आताशा फारशीं कानीं पडत नाहीत. नाही म्हणावयास श्री. शास्त्री यांनी सन्मति या मासिकांत प्रबोधकुमार संन्याल यांच्या 'स्त्रियश्चरित्रम्' या लघुकादंबरीचें रूपांतर प्रसिद्ध केलें आहे. सध्या लघुकथाकारांत शांताराम हे आघाडीवर आहेत. कथानक व वातावरण यांपेक्षा पात्राच्या अंतरंगांतील निरनिराळचा सूक्ष्म आणि तरल संज्ञाप्रवाहांचें मार्मिक विश्लेषण करण्याकडे त्यांचा ओढा विशेष आहे. त्यांच्या भाषेची घडणहि त्या वृत्तीला अनुकूल अशीच आहे. श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे हे या प्रांतांतील लोकप्रिय लघुकथालेखक आहेत. भाव्यांच्या भाषेचा थाटमाट आणि कथेचा घाट कांही और आहे. त्यांच्या कथेचा रंग भडक असला, तरी चढता असतो आणि कथन करण्याचा ढंग बेफाम असला, तरी आकर्षक असतो. त्यांच्या कथांचा सांचा सर्वस्वी स्वतंत्र आहे. 'फुलोरा' हा त्यांचा नवा कथासंग्रह नुकताच बाहेर पडला आहे. सौ. इंदुमती शेवडे, सौ. यमुना शेवडे, कु. लीला देशमुख, श्री. गिरडकर, श्री. शांताराम जैन, श्री. पद्माकर निमदेव, श्री. सोइतकर इत्यादि अनेक कथाकार आज कथा लिहीत आहेत. त्यांत एकादी घटना, ती गुंफण्याचें कलाकौशल्य, तिची आकर्षक मांडणी आणि झऱ्याप्रमाणे झुळझुळणारी प्रवाही भाषा या सर्वांचें सुंदर संमेलन असतें.

कवितेच्या प्रांतांत जुने अनिल आजहि नव्या बिनीवर आहेत. वस्तुत: ते भराभर व भाराभर लिहिणारे कवि नाहीत. पण गुदस्तां त्यांच्या आठ दहा कविता वाचनांत आल्या.

१२. कविता

अनिलांच्या काव्यांत मनांतील मूक व सूक्ष्म संवेदनेचें सरस शाब्दिक आविष्करण आहे. थकलेलें शरीर बिछान्यावर विसावलें. परंतु अस्वस्थ जीव बाहेर निघाला. रात्रभर बाहेर हिंडून तो पहाटे पहाटे आपल्या ठिकाणीं माघारीं आला. तेव्हा कवि विचारूं लागले:--

विश्रान्त देहांत जीव हा श्रांत
परत जो आला
कुठे होता गेला ?
सोडून श्रांत ?
धुंडीत अनंत ?

श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध, श्री. वा. रा. कांत आणि श्री. ना. घ. देशपांडे हेहि आघाडीवरील कवि आहेत. मुक्तिबोधांच्या कवितेंत वर्गवाद आहे. आर्थिक विषमतेने ते संत्रस्त आहेत. परंतु ते निराशावादी नाहीत. मानवाच्या मांगल्यावर त्यांची श्रद्धा आहे. कांतांच्या कवितेंत विप्लवाचे विचार असले, तरी तिचें स्वरूप कोमलकांत आहे. त्यांच्या कवितेंतील कल्पना नव्या व निराळ्या असतात. श्री. ना. घ. देशपांडे यांचा 'शीळ' हा कवितासंग्रह नुकताच दिवाळीच्या मंगल मुहूर्तावर प्रसिद्ध झाला आहे. आपल्या या खामगांवचे विख्यात गायक श्री. गोविंदराव जोशी यांनी आपल्या लोललडिवाळ आवाजाने वाजविल्यामुळे श्री. देशपांडे यांची शीळ एके काळीं रानोरानांतच काय, पण महाराष्ट्रांतील कोनोकोनांत घुमली होती. देशपांड्यांच्या वाणींत प्रसन्न प्रसाद आहे आणि प्रसाधनांत कोमल कला आहे. संगीतात्मक भाव म्हणजे काव्य अशी कार्लाइलने काव्याची व्याख्या केली आहे. ती देशपांड्यांच्या कवितेला तंतोतंत लागू पडते. श्री. द. चिं. सोमण यांचा झिमझिम हा नवीन कवितासंग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सोमण हे विचक्षण कवि आहेत. त्यांच्या कवितेंत नित्यनैमिकता आढळणार नाही. तिच्यांत कांही तरी विलक्षण असतें. किंबहुना तेंच तिचें वैशिष्ट्य आहे. सोमण कथा-लेखकहि आहेत. त्यांच्या व श्री. ना. रा. शेंडे यांच्या अद्भुत व रहस्यमय कथा मधून मधून सुषमेंत दिसतात. श्री. वा. ना. देशपांडे हे जुने प्रसिद्ध कवि आहेत. त्यांच्या आराधनेची तिसरी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे; आणि अनामिका हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह गेल्या सालीं प्रसिद्ध झाला आहे. अनामिकेंत कलावाद, जीवनवाद, मानवतावाद, यंत्रवाद, साम्यवाद इत्यादि निरनिराळ्या वादांवरील कविता आहेत. प्रशंसेची गोष्ट अशी की, त्या सर्व कलात्मक स्वरूपाच्या आहेत. त्यांच्यांत काव्यमय केलेले विचार आहेत, पण कोठेंहि प्रचार नाही. कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांचें 'अनंताची हाक' हें काव्य यंदाच निघालें आहे. अण्णासाहेबांची भूमिका ही तत्त्वज्ञ कवीची आहे. अध्यात्म हा त्यांचा आवडता विषय आहे. ते सश्रद्ध आहेत. तेव्हा सर्वसाक्षी अनंताच्या साक्षात्काराचे गूढ अनुभव त्यांनी या काव्यांत उलगडून दाखविले आहेत. यांखेरीज अनेक नवे नवे कवि नित्य उदयाला येत आहेत. त्यांची कविता नवीन धर्तीची आहे. तिच्यांतील संवेदन निवेदनात्मक स्वरूपाचें आहे. तिला छंद आहे; पण तो स्वच्छंद आहे. मनांतील आशय संपला की, तिचा 'चरण' थांबतो. तिच्यांत नवे नवे संकेत आहेत. तिची भाषा सूक्ष्म व तरल भाव विशद करण्यास समर्थ झाली आहे; आणि तिच्यांत नित्य नव्या नव्या सुंदर वागर्थांची भर पडत आहे. या नवकवींत वसंत वऱ्हाडपांडे, मनोहर देशपांडे, गुणाकर देशपांडे, राम शेवाळकर, मोहोड, पु. रा. गिरी, सुरेश भट, कावळे, मोहरील, जामदार, मोझेस, मनोहर सरपटवार, केचे इत्यादि होतकरू कवि आहेत. त्यांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मराठी शारदेचें सौंदर्य वृद्धिंगत करील यांत संशय नाही.

शेवटी, श्री ज्ञानेश्वरांच्या शांतगंभीर वाणीनें 'पसायदान' मागून मी या वाग्यज्ञाचें समापन करतों —

> **आतां विश्वात्मकें देवें । एणें वाग्यज्ञें तोषावें । तोषौनी मज देयावें । पसायदान हें ।।**
> **जें खलांची वांकुडे मोडे । तेया सत्संगीं रति वाढे । भूतां परस्परें पडे । मैत्र जीवाचें ।।**
> **दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यो पाहो । वांछिल तें तें लाहो । प्राणिजात ।।**

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखमाप्नुयात्

काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी शस्यशालिनी
विश्वोऽयं क्षोभरहितो मानवाः सन्तु निर्भयाः

विज्ञप्ति

सुप्रसिद्ध साहित्यिक, नाटककार व विनोदाचार्य कै. वा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना दिवंगत होऊन सुमारें अठरा वर्षें झालीं. अजूनपर्यंत त्यांच्या साहित्यसेवेस अनुरूप व योग्य असें एखादें स्मारक सबंध महाराष्ट्रांत कोठेहि झालेलें नाही. तरी त्यांचें एखादें स्मारक उभारावें अशा उत्कट इच्छेने खामगांव येथे श्री. कृ. कोल्हटकर स्मारकसमिति नुकतीच स्थापन झाली आहे.

सध्या खामगांव नगरांतील द. र. वाचनालयाच्या भवनावर एक भव्य दुमजली प्रशाल (Hall) बांधून त्यास श्री. कृ. कोल्हटकर सभागृह असें नांव द्यावें व त्यांचा अर्ध पुतळा ठेवणें, समग्र कोल्हटकर वाङ्मय ठेवणें, दर वर्षीं त्यांची पुण्यतिथि साजरी करणें, इत्यादि प्रकारचें त्यांचें स्मारक करावें असें ठरलें आहे. यांपैकी एक किंवा अनेक प्रकारचीं स्मारकें करणें हें सर्वस्वी श्रीपाद कृष्णांच्या चाहत्यांच्या दातृत्वावरच अवलंबून आहे.

ही समिति आपल्या परीने श्रीपाद कृष्णांच्या चाहत्यांना समक्ष भेटून, खासगी पत्रद्वारें किंवा वृत्तपत्रांतून प्रकटपणें या सत्कार्यास सक्रिय साह्य करण्याची विनंती करीत आहे. कार्याचें महत्त्व व औचित्य जाणून शक्य तितकें साह्य कोषाधिकारी, श्री. कृ. कोल्हटकर स्मारकसमिति खामगांव, मध्यप्रदेश, या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी ही विनंती.

अनुक्रमणिका

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्र-यांसाठी मंजुरी मिळालेलें
विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक : पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

वार्षिक वर्गणी पांच रुपये : : सभासदांना विनामूल्य : : सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं.च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें काय जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.